सोलापूर तरुण भारत

# आसमंत

**अयोध्येत भव्य राम मंदिर उभे राहू शकले, त्यात प्रभू रामाची प्राणप्रतिष्ठा झाली आणि आता या मंदिराच्या कळसावर धर्मध्वजही फडकला. हे सर्व देशात नरेंद्र मोदी पंतप्रधान असल्यामुळेच होऊ शकले, याबद्दल कोणाच्याही मनात किंचितही संदेह असता कामा नये. अन्य कोणत्याही पक्षाचे वा आघाडीचे सरकार असते, तरी त्या सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही इतक्या वेगाने आणि आस्थेने राम मंदिराची उभारणी केलीच असती, याची खात्री देता येत नाही. 'राजा कालस्य कारणम्' म्हणतात, ते यासाठीच! राममंदिरावर नुकताच उभारलेला धर्मध्वज फक्त एक ध्वज नसून भारतीय सभ्यतेच्या पुनर्जागरणाचा ध्वज आहे.**

# राम मंदिर: संकल्प ते सिद्धी!

समाजभान

प्रतिनिधी

अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या कळसावर काल भगवी धर्मध्वजा डौलात फडकू लागल्यानंतर या मंदिरासाठी केलेला संकल्प खऱ्या अर्थाने सिद्धीस गेला. वेदमंत्रांच्या उद्घोषात झालेल्या या धर्मध्वजारोहणाने राम मंदिराच्या बांधकामाचे सर्व कार्य पूर्ण झाले. हा केवळ मंदिरावर फडकणारा एक ध्वज नाही, तर २०१४ पासून देशात सुरू झालेल्या शतकानुशतकांपासून चालत आलेल्या स्वप्नांचे साकार रूप असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे. रा. स्व. संघाचे सरसंघचालक प. पू. डॉ. मोहनजी भागवत यांनीही या धर्मध्वजारोहणाने मंदिराची शास्त्रीय उभारणी पूर्ण झाल्याचे सांगून, यामुळे मंदिर उभारणीच्या आंदोलनात ज्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले, त्यांच्या आत्म्याला आता शांती लाभेल, असे सांगितले. ज्या राष्ट्राला आपली संस्कृती आणि धर्माचा विसर पडतो, त्या देशाचे भवितव्य अंध:कारमय होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला लाभलेल्या नेतृत्वाला भारताच्या गौरवशाली इतिहासाची ना जाण होती, ना अभिमान. ते नेतृत्व पाश्चिमात्यांच्या मानसिक गुलामगिरीत अडकले होते. त्यामुळेच पाश्चिमात्य संकल्पनांवर आधारित नव्या भारताची उभारणी करण्याचे त्यांचे प्रयत्न फसले. स्वातंत्र्य मिळाल्यावरही अनेक दशके भारत गरीबच राहिला. या परक्या मानसिक गुलामगिरीमुळेच भारताच्या सांस्कृतिक वारशाकडे आणि सनातन परंपरांकडे दुर्लक्ष करण्यात आले. म्हणूनच, 'राम' ही काल्पनिक व्यक्तिरेखा असल्याचे प्रतिज्ञापत्र संपुआ सरकारकडून न्यायालयात सादर करण्यात आले होते. मंदिर उभारणीच्या प्रयत्नांत अनेक प्रकारे अडथळे उभे करण्यात आले. रामललाला झोपडीत ठेवून त्याचा अपमान करण्यात आला. भारताच्या संस्कृतीविषयी पूर्वीच्या सरकारचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन उघड झाला. या सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आणले होते. मात्र, २०१४ नंतर भारताचे आर्थिक पुनर्वसनच झाले असे नव्हे, तर सांस्कृतिक पुनरुत्थानही सुरू झाले. बहुसंख्याकांच्या मनात आपण हिंदू असल्याबद्दलचा न्यूनगंड नाहिसा होऊन, त्याबद्दल

(पान ४ वर)







हिंदू पुनर्जागरणाचेही प्रतीक आहे. राममंदिरावरील धर्मध्वज फक्त एक ध्वज नसून भारतीय सभ्यतेच्या पुनर्जागरणाचा ध्वज आहे. धर्मध्वजाचा भगवा रंग त्यावर अंकित सूर्यवंशाची कीत, वर्णिलेले 'ॐ' आणि कोविदार वृक्ष यांची छटा हे सर्व रामराज्याच्या गौरवाचे प्रतीक आहेत. हा ध्वज संघर्षातून सृजनाची गाथा आहे, हा ध्वज

## असा आहे धर्मध्वज

हा धर्मध्वज त्याग, धर्म, शौर्य आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक असणाऱ्या भगव्या रंगाचा आहे. या ध्वजावर तीन चिन्हे आहेत. यामध्ये सूर्य, ॐ आणि कोविदार वृक्षाचा समावेश आहे. हा धर्मध्वज त्रिकोणी आकाराचा असून साधारण २२ फूट लांबी आणि ११ फूट रुंदीचा आहे. ०त्याच्यावर असलेली सूर्य, ओम आणि कोविदार वृक्ष ही चिन्हे रेशमी धाग्याने बारीक शिलाईकाम करून सजवण्यात आली आहेत. ध्वजासाठी ४२ फूट उंच पोल उभारण्यात आला आहे, ज्यामध्ये ३६० अंशामध्ये फिरणारी यंत्रणा बसवली आहे. यामुळे कोणत्याही दिशेने येणाऱ्या वाऱ्याबरोबर हा ध्वज सहज फिरू शकतो. ध्वजाचे कापड पॅराशूट- ग्रेडपासून बनवले असल्याने ६० किमी प्रति तास वेगाने येणाऱ्या जोरदार वाऱ्यातही ध्वज मुक्तपणे फडकू शकतो. भगवान श्रीराम हे सूर्यवंशीय असल्याने ध्वजावरील सूर्य हा रामवंशाच्या तेजस्वितेची आठवण करून देतो. ॐ हे ब्रह्मांडाचे नादरूप आहे. तर कोविदार वृक्ष हा समृद्धी, शुद्धता आणि रामायणातील सांस्कृतिक संदर्भांचे प्रतीक आहे. वृक्षाचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आढळतो. पौराणिक मान्यतांनुसार हा पारिजात व मंदार या वृक्षांच्या दिव्य संयोगातून बनलेला दिव्य वृक्ष आहे.

# दक्षिण आफ्रिकेत 'जी-२०' सहकार्याचे दक्षिणायन

लक्ष्यवेध

अनय जोगळेकर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी दि. २२-२३ नोव्हेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गमध्ये पार पडलेल्या 'जी-२०' परिषदेत सहभागी झाले होते. आफ्रिका खंडात पहिल्यांदाच ही परिषद पार पडत असल्यामुळे तिच्याकडे सर्वांचे लक्ष होते. 'ऐय, समता आणि शाश्वतता' या ब्रीदवायासह संपन्न झालेल्या 'जी-२०' परिषदेचा आढावा घेणारा हा लेख...**

नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणामध्ये वातावरणातील बदलांमुळे विकसनशील देशांना नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागत असल्याचे सांगून, अंतराळक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या देशांनी नैसर्गिक संकटांबद्दल विकसनशील देशांना माहिती पुरवण्याची यंत्रणा तयार करावी, असे आवाहन केले. दुर्मीळ खनिजांबाबत 'जी-२०'च्या व्यासपीठाने पुढाकार घेण्याची विनंती करत, त्यांनी सुचवले की, इलेट्रॉनिस कचऱ्यापासून ही खनिजे मिळवण्याच्या प्रयत्नांना वेग दिल्यास पर्यावरणासाठी ही चांगली गोष्ट असेल. या परिषदेत मोदींनी मानवजातीच्या विविध पारंपरिक ज्ञानाचा संग्रह, संरक्षण आणि पुढील पिढ्यांना उपलब्धता, यासाठी एक केंद्रीकृत संग्रह करण्याची सूचना केली. प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाद्वारे आफ्रिकेमध्ये कौशल्यवृद्धी करण्यावर त्यांनी भर दिला. याशिवाय, आरोग्य संकटे आणि आपत्तीच्या काळात तत्काळ तैनात होऊ शकणारी तज्ज्ञांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील साखळी तयार करणे, तसेच अमली पदार्थ, संघटित गुन्हेगारी आणि दहशतवादाविरुद्ध सामुदायिक लढाई लढण्याची गरज व्यक्त केली.

भारतात पार पडलेल्या 'जी-२०' परिषदेच्या अखेरीस नेत्यांचे संयुक्त निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते. आजवरच्या अनेक 'जी-२०' शिखर परिषदांमध्ये तीव्र मतभेदांमुळे अशाप्रकारचे निवेदन प्रसिद्ध होऊ शकले नव्हते. दक्षिण आफ्रिकेतील परिषदेत मात्र पहिल्याच दिवशी संयुक्त निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. बुद्धिमत्ता, डेटा-शेअरिंग आणि सर्जनात्मकता या माध्यमातून आर्थिक आणि सामाजिक विकास करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. या निवेदनामध्ये विकासाच्या प्रवासात कोणीही मागे राहू नये, हे घोषवाय महत्त्वपूर्ण आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या परिषदेवर बहिष्कार टाकला. अमेरिकेच्या वतीने सर्वांत दुय्यम राजनयिक अधिकार्यांना तिथे पाठवल्यामुळे ही परिषद चुकीच्या कारणांसाठी लक्षात राहील. गेल्या काही महिन्यांमध्ये अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेतील मतभेद मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. वर्णद्वेषी भ्रष्टाचाराने ग्रासले. दक्षिण आफ्रिकेची घसरण सुरू झाल्यानंतर देशाच्या ढासळत्या परिस्थितीचे खापर तेथील श्वेतवर्णीयांवर फोडण्यात येऊ लागले. तेथील प्रादेशिक पक्षांनी निवडणुकीच्या राजकारणात कृष्णवर्णीयांची मते मिळवण्यासाठी भूतकाळात झालेल्या अन्यायासाठी श्वेतवर्णीयांना जबाबदार धरून त्यांच्याकडून झालेल्या अन्यायाची किंमत वसूल करण्याची भाषा सुरू केली.

ट्रम्प यांच्या जवळचे असणारे उद्योगपती एलॉन मस्क मूळचे कॅनडा आणि दक्षिण आफ्रिकेतील आहेत. दक्षिण आफ्रिकेचे ओढण्याच्या दक्षिण आफ्रिकेच्या निर्णयामुळे ट्रम्प यांच्या मनात सिरिल रामफोसा यांच्याबद्दल राग आहे. अमेरिकेच्या बहिष्कारानंतरही ही परिषद ठरल्याप्रमाणे पार पडली आणि यशस्वीही झाली. पुढील वर्षी अमेरिकेकडे या परिषदेचे यजमानपद आहे. त्यामुळे या परिषदेत दक्षिण आफ्रिका सहभागी होते की, त्यावर बहिष्कार टाकते हे पाहणे महत्त्वाचे आहे; पण यामुळे 'जी-२०' या विकसित आणि महत्त्वाच्या विकसनशील देशांच्या एकत्रित व्यासपीठाला तडे गेले आहेत. १९९९ साली आग्नेय आशियात आलेल्या आर्थिक संकटाचा एकत्रित सामना करण्यासाठी 'जी-२०' या गटाची निर्मिती झाली, तोपर्यंत मुख्यतः 'जी-७' या सर्वांत मोठ्या औद्योगिक देशांकडून जागतिक समस्यांवर धोरणे आणि उपाययोजना ठरवल्या जात असत. गेल्या काही वर्षांमध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत चीनने जगात दुसर्या, तर भारताने चौथ्या क्रमांकावर झेप घेतली असून, अनेक विकसित आणि विकसनशील देशांच्या उत्पन्नातील दरी कमी होत आहे. त्यामुळे या देशांना जागतिक व्यासपीठ मिळणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे २००७ सालापासून ही बैठक अध्यक्षीय पातळीवर पार पडत असून, त्यात मुख्यतः आर्थिक विषयांवर चर्चा होत असली, तरी गेल्या काही वर्षांमध्ये त्यात विस्तार होऊन त्यात व्यापार, वातावरणातील बदल, चिरस्थायी विकास, आरोग्य, कृषी, पर्यावरण आणि भ्रष्टाचाराविरोधात संयुक्त लढा या विषयांचाही समावेश झाला आहे. 'जी-२०' संस्थेचे कायमस्वरूपी मुख्यालय किंवा संघटन नसते. बैठकीचे आजी-माजी आणि होऊ घातलेले यजमान अशा त्रिकुटाद्वारे तिचे नियोजन पार पाडले जाते.

भारताकडे या परिषदेचे यजमानपद असताना, त्यात आफ्रिकन





त्यामध्ये विविध देशांचे एकमेकांवरील अवलंबित्व अधोरेखित करण्यात आले. कोणीही एकट्याने प्रगती करू शकत नाही. विकास आणि संधींच्या बाबतीत सर्वसमावेशकता महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. जगातील सामाजिक-आर्थिक असमानता कमी करणे, लोकांना मागे न राहू देणे आणि स्थानिक समाजांचा सहभाग वाढवणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या निवेदनामध्ये हवामानबदल, नैसर्गिक आपत्ती, अन्न-सुरक्षा आणि ऊर्जा संक्रमण या क्षेत्रांवर विशेष लक्ष दिले गेले आहे. देश कर्जाच्या सापळ्यात अडकू नयेत, यासाठी आंतरराष्ट्रीय आर्थिक-वित्तीय संरचनोवर भर दिला आहे. तसेच, जागतिक शासनव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनामध्ये तंत्रज्ञान, कृत्रिम राजवटीविरुद्ध अहिंसात्मक मार्गाने लढून स्वातंत्र्य मिळवणार्या दक्षिण आफ्रिकेच्या नेल्सन मंडेलांनी महात्मा गांधींना आपले आदर्श मानले होते. वर्णद्वेषी राजवट संपल्यानंतर स्थापन झालेल्या 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेस'च्या सरकारने श्वेतवर्णीय नागरिकांशी भेदभाव न करता, सर्वांना समान वागणूक देण्याचे धोरण स्वीकारले होते; पण नेल्सन मंडेलांनंतरच्या कालखंडामध्ये दक्षिण आफ्रिकेला अध्यक्ष सिरिल रामफोसा डोनाल्ड ट्रम्प यांना भेटायला 'व्हाईट हाऊस'मध्ये गेले असता, ट्रम्प यांनी त्यांच्यावर श्वेतवर्णीयांच्या वंशविच्छेदाचे आरोप केले, दक्षिण आफ्रिकेने ते फेटाळून लावले. दक्षिण आफ्रिकेने रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाचा निषेध न केल्याचा, तसेच इस्रायलला गाझापट्टीतील युद्धामध्ये झालेल्या नरसंहारासाठी जबाबदार धरून त्याला आंतरराष्ट्रीय न्यायालयात महासंघाचा समावेश करून विकसनशील देशांना प्रतिनिधित्व देण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जोहान्सबर्गमध्ये जमलेल्या महत्त्वाच्या जागतिक नेत्यांची भेट घेतली. यामध्ये जपानच्या पंतप्रधान ताकाइची सनाई, ब्राझीलचे अध्यक्ष लुला, जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ, फ्रान्सचे इमॅन्युएल मॅक्रॉन आणि ब्रिटनचे पंतप्रधान सर कीर स्टार्मर अशा नेत्यांचा समावेश होता. या पार्श्वभूमीवर भारत, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा यांनी एकत्र येत, तंत्रज्ञान आणि सृजनशीलता या क्षेत्रात नवीन भागीदारीची घोषणा केली. स्वच्छ ऊर्जा, भक्कम आणि विस्तारित पुरवठा साखळ्या आणि महत्त्वाची खनिजसंपत्ती या क्षेत्रांमध्ये हे देश सहकार्य करतील. भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंधांनी खूप मोठे चढ-उतार अनुभवल्यानंतर

(पान ४ वर)

# द प्रोटोकॉल ऑफ एल्डर्स ऑफ झिऑन

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

> नोव्हेंबर महिना आला की, अनेकांना अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांच्या रहस्यमय खुनाची आठवण होते. २२ नोव्हेंबर १९६३ या दिवशी जॉन केनेडी एका मारेकऱ्याच्या गोळीला बळी पडले होते. त्यांचा खुनी ली हार्वे ओस्वाल्ड हा पकडला गेला. पण दोनच दिवसांनी जॅक रुबी नावाच्या माणसाने पोलिसांच्या देखतच त्याला गोळी घातली. न्यायालयीन प्रक्रिया चालू असताना जॅक रुबी तुरुंगातच मरण पावला. या सगळ्या घटनाक्रमामुळे अमेरिकन जनतेला आजही असे ठामपणे वाटते की, केनेडींच्या खुनामागे मोठे कारस्थान असावे. जाणून घेऊ या, अशा 'कॉन्पिरसी थिअरीं'बद्दल...



प्रस्तावनेत दिलेल्या केनेडींच्या खुनाबद्दलच्या समजुतींप्रमाणेच पाश्चिमात्य जगात अनेक 'कॉन्सिपरसी थिअरीज' कारस्थान सिद्धांत प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहेत. दुसऱ्या महायुद्धात अमेरिका प्रथमपासून सहभागी नव्हती, पण जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बर या नाविक अड्ड्यावर आकस्मिक हल्ला चढवून अमेरिकन नौदलाची जबर हानी केली. मग अमेरिका सर्व शक्तिनिशी महायुद्धात उतरली.

कॉन्स्पिरसी थिअरीवाल्या लोकांचे असे म्हणणे आहे की, जपान असा हल्ला करणार आहे, याची पक्की खबर राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्टला मिळालेली होती. तो या हल्ल्याला प्रतिकारही अर्थातच करू शकला असता; पण त्याने मुद्दाम हल्ला होऊ दिला. त्यामुळे अमेरिकन सैन्य दले आणि जनता पेटून उठली. रुझवेल्टला युद्धासाठी वाटेल तितकी रक्कम खर्चायला अमेरिकन संसदेने एकमुखी संमती दिली. हेच त्याला हवे होते, इत्यादी.

पाश्चिमात्य जनतेला सर्वात आवडणारी आणि सर्वात जास्त भेडसावणारा कारस्थान सिद्धांत म्हणजे, कुणीतरी एक फार मोठ्या शक्तीचा माणसांचा गट जगात कुठेतरी एका

अज्ञात ठिकाणी बसलेला आहे. हा गट छोटा आहे, पण त्यांची कारस्थानी शक्ती अफाट आहे. त्या शक्तीचा वापर करून त्या गटाला संपूर्ण जगावर राज्य करायचे आहे. या गटाचे माहीत असलेले नाव आहे इल्युमिनाटी. पाश्चिमात्यांच्या मते हा गट गेली किमान दोन हजार वर्षे किंवा कदाचित त्यांच्या आधीपासूनही अस्तित्वात आहे. म्हणजेच येशू ख्रिस्ताच्याही पूर्वीपासून या गटाच्या घातक कारवाया चालूच आहेत. मात्र अजून तरी त्यांचे कारस्थान सफल होऊ शकलेले नाही, इत्यादी.

इल्युमिनाटीबद्दल कथा-कादंबऱ्यांमध्ये भरपूर लिहून झालेले आहे. आजही होत असते. अलिकडचा लोकप्रिय लेखक डॅन ब्राऊन याच्या कादंबऱ्यांमध्येही याबाबत बरेच तपशील येत असतात. सन १७७६ मध्ये बव्हेरियामध्ये खरोखरच इल्युमिनाटी नावाची संस्था स्थापन झाली, पण लवकरच बव्हेरियन सरकारने तिच्यावर बंदी घातली. आता या सगळ्याचा ज्यू लोकांशी काय संबंध? उघडपणे काहीच नाही. पाश्चिमात्य समाजाची अशी मनोमन समजूत आहे की, जगावर राज्य करण्याच्या या मनसुब्याच्या पाठी ज्यू लोक आहेत. या समजुतीचा इतिहास येशू ख्रिस्तापर्यंत जातो.

पॅलेस्टाईन ही ज्यू लोकांची भूमी. जेरुलेममधल्या झिऑन या टेकडीवर ज्यू सम्राट डेव्हिड याने ज्यूं चा देव येहोवा याचे देऊळ बांधले. त्याचा मुलगा सम्राट सॉलोमन याने ते आणखी मोठे केले. पुढे पॅलेस्टाईन रोमनांनी जिंकले आणि ज्यू लोकांना गुलाम बनवले. या गुलाम ज्यू समाजातच येशू नावाचा माणूस जन्मला. त्याने शबलित झालेली ज्यू धर्मतत्त्वे जनतेला नव्याने सांगायला सुरुवात केली. ज्यू धर्ममार्तंडांना हा आपला अपमान वाटला. त्यांनी रोमन मालकांचे कान फुंकून येशूला देहान्त शिक्षा देववली. भयभीत झालेले येशूगण दशादिशांना पळाले. तिथे त्यांना ख्राईस्टचे अनुयायी म्हणून ख्रिश्चन असे नाव मिळाले. इकडे आणखी काही काळाने रोमन मालक ज्यू गुलामांवर भयंकर रागावले. त्यांनी संपूर्ण ज्यू जमातीला पॅलेस्टाईनमधून हद्दपार केले. हे हद्दपार ज्यू युरोपातल्या विविध देशांमध्ये जाऊन वसले. आफ्रिकेत, आशियात, अगदी भारतातसुद्धा आले. अशी ३०० वर्षे उलटली. या काळात येशूच्या परांगदा शिष्यांनी ठिकठिकाणी मठ स्थापना करून सर्वसामान्य जनतेत भलतीच लोकप्रियता मिळवली. त्याच सुमारास रोमन साम्राज्याचा डोलारा डळमळू लागला. त्याला आधार देण्यासाठी खुद्द रोमन सम्राटाने, सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय झालेला येशूचा धर्म स्वीकारला. झाले. राजाश्रय मिळाल्यामुळे येशूचा धर्म युरोपातले एका पाठोपाठ एक देश स्वीकारू लागले.

संपूर्ण युरोप खंड अशा प्रकारे ख्रिश्चन झाल्यावर त्यांचे लक्ष ज्यूं कडे वळले. या लोकांमुळे आपला देवपुत्र येशू याला क्रूसावर बळी जावे लागले. मग आता यांच्यावर सूड उगवा. तेव्हापासून म्हणजे सुमारे १०व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंत युरोपातल्या सर्व देशांनी ज्यूं चा कमालीचा छळ केला. त्यांना 'गावकुसाबाहेरचे' ठरवून टाकले.

ख्रिश्चनांपैकी अनेक जाणत्या लोकांना हे आवडत नव्हते. जाहीरपणे तसे कुणी म्हणत नव्हते. अखेर १७९० साली अमेरिका या नवस्वतंत्र राष्ट्राचा अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन याने जाहीर पत्र लिहून ज्यू लोकांवरचा सामाजिक बहिष्कार उठवला.

सन १७९१ साली फ्रेंच क्रांतिकारक राजवटीने आपले 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' हे सूत्र फ्रान्समधल्या सुमारे ४० हजार ज्यू लोकांनाही लागू आहे, असे जाहीर केले. नेपोलियन बोनापार्टनेही ज्यू लोकांना फ्रेंच नागरिकांइतकाच समानतेचा दर्जा दिला. मग युरोपातल्या अनेक सरकारांनी ज्यूं वरची ही बंदी उठवली. या कालखंडाला 'ज्यू मुक्ती काळ' असे म्हणतात. परंतु अनेकांना विशेषतः जर्मन आणि रशियन लोकांना हे आवडत नव्हते. त्यांच्यापैकीच एक जर्मन पत्रकार विल्हेल्म मार याने सन १८०९ साली 'लीग ऑफ अँटिसेमेटिझम' अशी संस्थाच स्थापन केली. हे ज्यू लोक 'सेमाईट' वंशाचे आहेत. म्हणजेच ते परके आहेत. बाहेरचे आहेत. ते कधीच पूर्णपणे युरोपीय होऊ शकणार नाहीत, असे या लीगवाल्यांचे म्हणणे होते.

१९०३ साली रशियातून एक संशोधन बाहेर पडले आणि संपूर्ण ख्रिश्चन जगात पसरले. त्या दस्तऐवजाचे नाव होते, 'द प्रोटोकॉल ऑफ द एल्डर्स ऑफ झिऑन' प्रोटोकॉल म्हणजे बैठकीची मिनिट्स किंवा वृत्त. स्वतःला ज्यूंच्या पवित्र झिऑन तीर्थक्षेत्राचे ज्येष्ठ साधक म्हणवणारे काही ज्यू लोक कुठेतरी एकत्र जमले होते. त्यांच्या बैठकीचे हे वृत्त. संपूर्ण जगाची विविध क्षेत्रे क्रमशः ताब्यात घेत एक दिवस संपूर्ण जगावर आपला अंमल बसवण्याचे हे एक जबरदस्त कारस्थान होते.

जगभरचे लोक थक्क झाले. अमेरिकेतला अग्रगण्य कारखानदार आणि मोटार संशोधक हेन्री फोर्ड याने ज्यू लोकांबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. तेवढ्यात युरोपात महायुद्ध पेटले. १९१७ साली रशियात क्रांती झाली. क्रांतिकारक साम्यवाद्यांनी सत्तेवर आल्यावर जर्मनीशी तह करून युद्धातून अंग काढून घेतले. १९१८ साली जर्मनीच्या पराभवाने युद्ध संपले.

साम्यवादी रशियन्स आणि जर्मन्स दोघांनाही आपल्या हानीचे खापर फोडायला ज्यू हा बळीचा बकरा मिळाला. त्यामुळेच दुसऱ्या महायुद्ध काळात हिटलरने जशा ज्यूं च्या कत्तली केल्या, तशाच रशियनांनीही केल्या.दुसऱ्या महायुद्धानंतर लगेचच इस्रायल देश निर्माण झाला. आता जगभरच्या ज्यू समुदायाचे दोन देश झाले. एक इस्रायल आणि दुसरा अमेरिका. अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेला ज्यू समाज स्वतःला फक्त एक धार्मिक समाज मानत होता तर इस्रायलमधला ज्यू समाज स्वतःला राष्ट्रीय मानत होता.

मध्यंतरी असे सिद्ध झाले की, प्रोटोकॉल ऑफ झिऑन हे संशोधन पूर्णपणे खोटे होते. रशियातील जनमत ज्यू विरुद्धसंतप्त व्हावे म्हणून रशियन गुप्तहेर संघटना 'उखराना' हिने हा भयंकर बनाव घडवून आणला होता.हा सगळा इतिहास पुन्हा आठवण्याचे कारण म्हणजेपाश्चिमात्य जगात सध्या पुन्हा 'अँटिसेमेटिझम' बळावले आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये हमासने गाझा पट्टीत इस्रायली समारंभावर अतिरेकी हल्ला केला. तेव्हापासून आज दोन वर्षे उलटून गेल्यावरही हमास आणि इस्रायल यांच्यात युद्ध सुरूच आहे. इस्रायल त्याच्या खास शैलीत हमासचा हुरडा भाजून काढतो आहे. यावेळी प्रथमच असे घडते आहे की, युरोपात आणि विशेषतः अमेरिकेत ख्रिश्चन नागरिक मोर्चे काढून पॅलेस्टाईनला पाठिंबा देत आहेत नि इस्रायलचा निषेध करीत आहेत.

इंतिफदा म्हणजे इस्रायली दडपशाहीविरुद्धचे बंड हा जगभर पसरवा. 'ग्लोबलाईझ इंतिफदा' अशी त्यांची घोषणाआहे. हे लोक उदारमतवादी आहेत, हे वेगळे सांगायला नकोच. राहून राहून आश्चर्य वाटते की, मूठभर ज्यू लोकांना जगावर राज्य करायचे आहे, या कारस्थान सिद्धांतावर तुम्ही विश्वास ठेवता आणि घातकी हमासला पाठिंबा देता. मग, आम्हाला जगावर राज्य करायचे आहे, असे मुसलमान उघड उघड सांगतायत आणि त्याप्रमाणे वागतसुद्धा आहेत. तरी तुमच्या उदार मनाला तेच आवडतात? विनाशकाळ जवळी येता, मनुजा सुबुद्धि न सुचे! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

# अवरोह

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील




त्या दिवशी ती अतिशय खिन्न होती. काहीतरी झालेय हे माझ्या लगेच लक्षात आले. माझ्याजवळ मन मोकळे करायला तिला आवडते आणि ते मला देखील तितकेच आवडते. संगीत हा समान आवडीचा विषय असल्याने तिच्या त्या वेदनेचा प्रत्येक सूर मला लक्षात आला.

कदाचित ती जे बोलत होती ते तिच्या वयाच्या बऱ्याच स्त्रियांचे प्रतीकात्मक रुदन होते. स्त्रियांचे कशाला, काही प्रमाणात ते पुरुषांनाही लागू पडणारेच होते. अर्थात स्त्रियांच्या बाबतीत त्याची तीव्रता जास्त असते, पण साधारण चाळिशीतील प्रत्येकाला ती बाब लागू पडणारी आहे. जीवन जगत असताना चाळिशीचा एक टप्पा असा येतो की, त्यावेळी ती म्हणाली तसे विचार मनात येतात आणि स्वाभाविकपणे त्या विचारांना व्यक्त करण्याची गरज असते. जीवनाच्या मार्गक्रमणावरील सर्वात महत्त्वाच्या जबाबदारी काही प्रमाणात पूर्ण होणारा हा काळ, संसाराचा व्याप सांभाळताना आपले स्वतःचे अस्तित्व संपूर्णपणे समर्पित करून विसरल्यावर ते अस्तित्व आहे याची पुन्हा जाणीव करून देणारा हा काळ, इतरांसाठी स्वतःला झोकून दिल्यावर माझ्यासाठीही मी असायला हवे, याचे भान निर्माण करणारा हा काळ, संसाराचे सारे व्याप सांभाळताना व त्यासाठी आयुष्यातील अनमोल काळ देताना मला हे आयुष्य एकदाच मिळणार आहे, याची जाणीव करून देणारा हा काळ, आयुष्याचा आरोह जबाबदाऱ्यांची पूर्तता करता करता अचानक आपल्याही आयुष्याचा अवरोह सुरू झालाय, याची आठवण करून देणारा हा काळ. याच संदर्भात ती बोलत होती, खूप वेळ आणि मी शांतपणे ऐकत होतो. ती म्हणाली, खरंच आता अवरोह सुरू झालाय. आरोहात जग फारच वेगळे होते. तारुण्य होते, उमेद होती, काहीही अन् कितीही सहन करण्याची ताकद होती. आद्य सप्तकातील षड्जापासून सुरुवात झाली तरी तार सप्तकातील षड्जापर्यंत मजल मारायचे ध्येय होते आणि त्याच बळावर एकेक सूर लावत आयुष्याची वाटचाल करायला सुरुवात केली. अनेक चांगल्या- वाईट प्रसंगांना तोंड देताना जीवनाच्या आरोहात कधी कधी अनेक आवडत्या गोष्टी वर्ज्य कराव्या लागल्या. एकेक सूर आळवीत निषादापर्यंत पोहोचलेय अन् आता मात्र षड्ज लागेल, असे वाटत नाही. कारण परतण्याची वेळ झाली. इच्छांना बाजूला सारून कर्तव्यांच्या मागे धावत धावत आयुष्याच्या मध्यावर कधी येऊन पोहोचले ते कळलेच नाही.

आता अशा काही स्थितीत पोहोचलेय की पुढे जाता येत नाही आणि मागे फिरण्याची इच्छा होत नाही. कितीही रंगामागे लपविण्याचा प्रयत्न केला तरी एखादा पांढरा केस जाणीव करून देतो की अवरोह सुरू होतोय. पूर्वीसारखा जोर मनात असला, तरी शरीरातील त्राण कमी होतोय. दमायला होते. पूर्वी घरी २० लोकांचा स्वयंपाक लीलया बनवणारी मी, आता दोन लोक जेवायला येणार म्हटले तर दडपण येते. पाठीतून अचानक निघणारी कळ आठवण करून देते तरुणपणी केलेल्या ट्रेकिंगची; आता एक छोटी टेकडी चढताना दमछाक होते अन् शरीरात तर अंतःस्रावी ग्रंथी काय घोळ घालत आहेत ठाऊक नाही. घटकेत चिडायला होते, घटकेत खूप राग येतो, खूप निराश वाटते तर कधी अचानकच आनंदाला उधाण येते. जाणवतंय, अवरोह सुरू झालाय. पण हे काय? अजून षड्ज तर लागलाच नाही. पूर्णत्व, पूर्णत्वाचा आनंद अपुराच आहे.

सर्व इच्छांची पूर्तता होण्यापूर्वीच अवरोह सुरू झाला. निषादापासून षड्जापर्यंतचे थोडेसे अंतर कापता आले नाही. धडपड खूप केली पण जमले नाही. असो. हा अवरोहदेखील मी मनापासून जगायचे ठरवले आहे. निषादापासून परतताना षड्ज न लागल्याची खंत मनात आहे. हरकत नाही. आरोहात जे वर्ज्य केले होते ते सारे अवरोहात करताना एकेक सूर उतरत आनंद घ्यायचा आहे. आता मात्र इच्छा एकच आहे, तार सप्तकातील षड्ज जरी लागला नाही तरी अवरोहात मात्र षड्जानंतरच सम यावी. मनाला स्पर्शून गेलेले हे शेवटचे वाक्य उच्चारता क्षणी तिच्या डोळ्यातून अलगद अश्रू ओघळले.

स्वाभाविकच होते. अंतःस्थ मनाचे ते प्रकटीकरण असल्याने डोळ्यातील अश्रूंना ती तरी किती वेळ थांबवणार? शांतपणे तिच्या हातावर हात ठेऊन मी काही वेळ थोपटत राहिलो. तिलादेखील त्यावेळी मी काही बोलावे, असे अजिबात अपेक्षित नव्हते. माझ्या हाताचा स्पर्श तिला सारे काही सांगत होता. आज पहिल्यांदाच तिने कुणाजवळ तरी आपल्या मनातील हे सारे विचार व्यक्त केलेहोते. अशावेळी मित्रच लागतो. मी मात्र तिच्या बोलण्याचा व तिने उच्चारलेल्या प्रत्येक शब्दाचा विचार करू लागलो. जबाबदारी निभावत असताना काही जणांना कधी कधी किती वेळा मनातील इच्छांना तिलांजली द्यावी लागते, याचा अंदाजच येत नाही. आपले सुखनैव आयुष्य सुरू असताना त्याची जाणीव होत नाही. परंतु काही जणांच्या बाबतीत सर्वच पातळीवर संघर्षाची स्थिती निर्माण होते आणि मग कर्तव्यपूर्ती करताना अनेक गोष्टट राहून जातात. असाच काहीसा जीवन आरोह तिने माझ्यापुढे मांडला व मी सुन्न झालो. तिच्या शेवटच्या बोलण्यातीलसकारात्मक भाग मला आवडला. जीवनाच्या आरोहात राहून गेलेल्या गोष्टी अवरोहात करण्याची तिच्या मनाची तयारी तिच्यातील सकारात्मकता दर्शवून गेली. पण मला खटकतहोते तिचे काही शब्द. तार सप्तकातील षड्ज न लागल्यामुळे तिला भासणारी अपूर्णता. पूर्णत्वाचा आनंद न मिळाल्याची खंत. त्याबद्दल मात्र मला तिला सांगायचे होते. त्यावेळी बोलू शकलो नाहीश पण तेवढाही नकारात्मक भाग मला तिच्या आयुष्यातून काढायचाय. संगीत ही अंतःस्थ आवड असल्याने तिला त्याच स्वरूपात सांगायचेय. सखे, मला आठवते पं. अजय चक्रवर्तींची एक मैफल. त्या दिवशी पंडितजींचा मूड गाण्यासोबतच गाणे समजावण्याचा होता. त्यामुळे सारे रंगतदार होत होते.

एका रागाचे सुरेख सादरीकरण करत असताना पंडितजींनी सुंदर षड्ज लावला. सभागृहात आहाहाचा समूह उद्गार निघाला. त्यानंतर मात्र त्यांनी जे सांगितले ते फार महत्त्वाचे होते. ते म्हणाले, राग आणि जीवन हे जवळपास सारखेच असते. त्यात आपण हवे तसे रंग भरू शकतो आणि त्या रंगानुसार त्याचे सौंदर्य खुलत जाते. सुरावट पुन्हा त्यांनी सुरू केली. काहीतरी वेगळे होत होते. माझ्या बाजूने बसलेल्या जाणकार मित्राला विचारले तर तो म्हणाला, त्यांनी षड्ज बदललेला आहे. षड्ज बदलला? हा काय प्रकार? संगीताचा चाहता असलो, तरी मला काय होत होते ते कळत नव्हते. यावेळी आधीच्या सुरावटीपेक्षाही जास्त आनंद मिळत होता. परत एकदा नवा षड्ज लागला आणि पुन्हा आहाहाचा समूह उद्गार उमटला. पंडितजी म्हणाले, आता यावेळी मी निषादाला षड्ज मानून राग सादर केला व त्याचाही तुम्हाला भरभरून आनंद मिळाला म्हणून तुम्ही प्रतिसाद दिला.

कल्पकता असेल तर कोणत्याही स्वरावर षड्जाच्या पूर्णत्वाचा आनंद मिळू शकतो. गरज असते कल्पक सकारात्मकतेची आणि तेवढ्याच सकारात्मक प्रतिसादाची. सखे, तू निषादापर्यंत पोहोचलीस, त्यालाच षड्ज बनवून पूर्णत्व प्राप्त कर. तुझ्यातील कल्पक विचारक्षमता व सकारात्मक वृत्ती तुला निषादावरील षड्जावरही तेवढाच आनंद देईल. त्यामुळे तार सप्तकातील षड्ज लागला नाही, याची खंत राहणार नाही.

मनापासून त्या निषादावर थांब, त्याला षड्ज बनव, तेथून सुरावटी बांध, भरभरून विविधता आण, प्रतिसाद मिळेल, आनंद मिळेल आणि तुला हवे असलेले पूर्णत्वदेखील तुला बहाल होईल. त्यानंतर अवरोह बघ कसा रंगतदार होईल. कारण जीवनाचा असा आरोहअवरोह गाण्याची संधी एकदाच मिळते. त्यामध्ये तार षड्जाची खंत न बाळगता निषादाचा नवा षड्ज बनव आणि बनव तुझी स्वतःची सुरेल सुरावट. बघ कसा सुंदर प्रतिसाद मिळतो ते!! जमेल ना? मनापासून कर, सहज जमेल!! तुलाच नाही तर चाळिशीतल्या प्रत्येकालाच जमेल!!

---

# विवाह - ५
# अग्निसाक्षी -लाजा होम

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर



एक तरुण जोडपं एकत्र येऊन आयुष्याचा उर्वरित काळ एकमेकांच्या सोबतीनं घालवण्याचा निश्चय करतात, एकमेकांशी संलग्न होतात. त्याला धार्मिक आणि सामाजिक मान्यता देण्याचा प्रसंग आणि त्यासाठी करण्याचा विधी म्हणजे विवाह. त्यांनी एकत्रित होऊन करायचं पहिलं काम म्हणजे लाजा होम.

या विधीची मोठी गंमत आहे. पूर्वी ज्या काळात इंधन म्हणून मातीच्या तेलाचे स्टोव्ह, एलपीजी गॅस, इलेक्ट्रिक मायक्रोव्हेव, ओव्हन, इंडक्शनसारख्या सोयी नव्हत्या; आगपेट्याही नव्हत्या, त्या काळात प्रत्येक स्वयंपाकघराच्या चुलीत राखेखाली एक कोलित (जळतं लाकूड) धुमसत असायचं. सनातनी परंपरेत आपण तेजाची आराधना करतो, याचा धडधडीत पुरावा म्हणजे आपल्याकडे संपन्न होणाऱ्या प्रत्येक शुभ-अशुभ प्रसंगाच्या कर्मकांडात अग्नीत आहुती अर्पण करण्याचा विधी आहे.

प्रत्येक प्रसंगासाठी प्रज्वलित करण्यात येणाऱ्या अग्नीचं नाव वेगवेगळं असतं. सकृतदर्शनी जरी ती आग असली, तरी सनातनी श्रद्धेचा विचार केला तर ते आहेत अग्निदेव. प्रत्येक वेळी त्यांचं कार्य वेगळं असल्यामुळे त्यानुसार त्यांची नावं देण्यात आलेली आहेत. त्या नावानं आवाहन करून तो चेतवतात.

आता हेच पहा नं, ज्यांनी अग्निहोत्र स्वीकारलं आहे त्यांच्याकडे वर्तुळाकार कुंडात गार्हपत्य नावाच्या अग्नीचं स्फुल्लिंग सतत राखेखाली जपावं लागतं. चुलीत जपलेल्या अग्नीचं नाव आहे 'आवसथ्याग्नी.' तर, लग्नात ज्या अग्नीमध्ये लाजा होम करायचा आणि ज्याच्या साक्षीनं साता जन्माच्या शपथा घ्यायच्या त्या अग्नीचं नाव आहे 'योजक.' कन्यादान विधीच्या आधी या योजक अग्नीला आवाहन करून तो चेतवला जातो. इथे 'चेतवणे' हेच क्रियापद जाणीवपूर्वक वापरलं आहे. कारण त्यात सकारात्मकता आणि सृजनात्मकता आहे.

चेतन, चेतना, चेता हे सगळेच शब्द जिवंतपणाशी संबंधित आहेत. सभोवतालच्या वातावरणाविषयी बोध करवून देणारी मेंदूतील यंत्रणा म्हणजे चेतना. सनातनी विचारधारेत आग या महाभूतावर चेतन गुणांचं आरोपण करण्यात येतं आणि त्याचा अग्निदेव होतो. या उलट 'पेटवणे' या क्रियापदात नकारात्मकता ठासून भरलेली आहे. असा हा योजक अग्नी प्रकट झाला की, कन्यादान आणि पुढचे सगळे विधी त्याच्या साक्षीनंच संपन्न होतात. आता या योजक नावातला दूरदर्शीपणा बघा. योजक हा शब्द 'युज्' धातूपासून सिद्ध झालेला आहे. याचा अर्थ होतो 'जोडणे.' विवाह प्रसंगी दोन आयुष्य, काया-वाचा-मन-बुद्धीनं एकत्र होणार.

सनातनी धर्मात सांगितलेले धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ एकत्रितपणे सिद्ध करणार. त्यांची पूर्वी स्वतंत्र असणारी कुटुंब एकमेकांशी जोडली जाणार. त्यांची सुखं-दुःखं, हसू-आसू एक होणार. हे नातं साता जन्मासाठी अतूट, अक्षय, अभेद्य राहण्यासाठीच हा योजक म्हणजे जोडणारा अग्नी तिथे उपस्थित असतो.

आपल्या पूर्वजांना धातुशास्त्र म्हणजे मेटलर्जीचं उत्तम ज्ञान होतं. एका धातूचे दोन तुकडे जोडून त्यांचा एकसंध तुकडा करायचा असेल तर त्यासाठी त्या दोन्ही तुकड्यांना आगीत तावून- सुलाखून जोडावं लागतं, हे त्यांना माहीत होतं. त्यामुळे वेल्डिंग कसं करतात तेही त्यांना चांगलंच माहीत होतं. तसंच हे पती-पत्नीचं नातं आहे आणि ते योजक अग्नीनं सांधलं आहे. 'योजक' या शब्दाशी निगडित अतिशय सुंदर असं सुभाषित संस्कृत भाषेत आहे.

'अमंत्रं अक्षरं नास्ति
नास्ति मूलं अनौषधं ।
अयोग्यः पुरुषो नास्ति
योजकस्तत्र दुर्लभः ।।'

(एकही अक्षर असं नाही ज्याचा मंत्र होऊ शकत नाही. एकही मूळ असं नाही ज्याचा वापर औषधी म्हणून होऊ शकत नाही.

एकही व्यक्ती अशी नाही जी अयोग्य किंवा निरुपयोगी आहे. (जो त्यांचा योग्य विनियोग = कशाचा उपयोग कशासाठी, कुठे, कसा, कधी आणि का करायचा हे नेमकं जाणणारा तो) योजक मात्र दुर्लभ आहे.)

सर्वसाधारणपणे पती आणि पत्नी परस्पर अगदी विरुद्ध तरीही एकमेकांना पूरक स्वभावाचे असतात. दोघेही एकमेकांच्या सोबतीनं एकमेकांच्या उणिवा भरून काढतात आणि गुणवर्धन करतात. लग्नाला काही वर्षं लोटली की, बायको नवऱ्याला 'मी होते म्हणून इतकी वर्षं संसार करतेय.

दुसरी कोणी असती तर कधीच सोडून गेली असती.' हे ऐकवते. तर, नवरा 'आता का पदरी पडलं आणि पवित्र झालंफ म्हणत निभवून न्यायचं. दुसरा पर्याय नाही. विधात्याची हीच योजना कार्यान्वित करण्यासाठी वधू- वर पती-पत्नी म्हणून एकमेकांशी सांधले जायला हवेत. ते महत्त्वाचं काम हा योजक अग्नी करीत असतो.

हे काम करण्यासाठी तो तत्परतेनं उपस्थित झाला म्हणून पहिल्यांदा त्याला आहुती द्यायची. त्यासाठी धानाच्या (सालीच्या) लाह्या आणि तूप हे दोन पदार्थ वापरतात. तांदळाची शेती करणाऱ्या लोकांनी या विधीची परिकल्पना केली असावी. तांदूळ हे एकमेव पीक आहे ज्याची बीजं अंकुरली की ती मुळापासून उपटून दुसरीकडे रोवावी लागतात तरच त्यांची वाढ होऊन पीक येतं. त्यावर योग्य ती प्रक्रिया करून म्हणजेच संस्कार करून लाह्या तयार करण्यात येतात.

आम्लपित्त आणि इतर तक्रारी दूर करणाऱ्या लाह्यांचा मुख्य गुण आहे थंडावा देणं. संसार करताना डोकं थंड ठेवावं या छुप्या संदेशासह वधू जिथे जन्मली तिथेच न राहता दुसऱ्या घरात गेली तरच तिचं आयुष्य समृद्ध होईल, हेच प्रतीकातून सांगण्यात आलं आहे. तर, गायीच्या दुधाला विरजण लावून त्याचं दही आणि त्याचं ताक घुसळून लोणी मिळवून ते तावून म्हणजेच संस्कार करून निर्माण होणाऱ्या तुपाला आयुर्वेदात पृथ्वीवरचं अमृत असंच संबोधलं आहे.

नात्याला अंकुरण्यासाठी, फुलण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या स्नेहाला या तुपाच्या स्निग्धतेतून अभिव्यक्त करण्यात आलं आहे. होम केलेली वस्तू चौपट होऊन परत येते हा सनातनी अनुभव आहे. म्हणून हा लाजा होम करायचा. यात आहुती वधू टाकते; वर तिच्या ओंजळीला आपल्या ओंजळीनं संरक्षक कवच देऊ करतो. ते का ते पाहू या पुढच्या लेखात...

# ते चाळीस दिवस...

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

१ मे २०२३ चा दिवस. आपण सगळे महाराष्ट्रातील लोक महाराष्ट्र दिन साजरा करत असताना कोलंबिया देशातील अमेझॉनच्या जंगलात एक महाभयंकर घटना घडत होती. कधी कधी सत्य हे कल्पनेपेक्षाही भयंकर आणि अद्भुत असतं. एखाद्या चित्रपटाचा विषय व्हावा, अशी ही हकीगत. कोलंबिया देशातील सेस्ना २०६ हे छोटंसं खाजगी विमान एका छोट्या गावातील काही लोकांना घेऊन सॅन जोस डेल ग्वावियारे या शहराकडे निघालं होतं. या विमानात त्या विमानाच्या वैमानिकासह एकूण सातजण प्रवास करत होते. एक स्थानिक नेता होता.

एक आई तिच्या चार लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी निघाली होती. अमेझॉनच्या जंगलातील हितोतो या आदिवासी जमातीतील हे सगळे रहिवासी होते. तेथील सशस्त्र टोळ्यांच्या दहशतीपासून सुटका करून घेण्यासाठी त्यांना आपलं गाव सोडणं भाग पडलं होतं. पण हायरे दैवा! सुरक्षिततेच्या शोधात जाणार्या या निष्पाप जीवांचं विमानच असुरक्षित झालं. विमानानं साधारणपणे ३५० किमीचा पल्ला पार केला असेल नसेल तोच विमानाच्या इंजिनात काहीतरी बिघाड आहे याची वैमानिकाला जाणीव झाली. आता आपल्या सगळ्यांच्या जीवाला धोका आहे हे त्यानं विमानातील सगळ्यांना सांगून टाकलं. थोड्याच वेळात त्या विमानाचा रेडिओ संपर्क तुटला. पुढच्या काही क्षणातच भयानक आवाज करीत ते विमान अमेझॉनच्या घनदाट जंगलात कोसळलं. हे विमान एका झाडावर कोसळलं आणि झाडावरच अडकून पडलं.

या दुर्दैवी अपघातात वैमानिक आणि त्या विमानात असलेला स्थानिक नेता मृत्युमुखी पडले. आपल्या आईसोबत प्रवास करीत असलेल्या त्या छोट्या चार मुलांची जीवनरेखा मात्र बळकट होती. या भयानक अपघातातून ते छोटे जीव आश्चर्यकारकरित्या बचावले. त्या मुलांना सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी निघालेली ती माता मात्र गंभीर जखमी झाली होती. तिची वाचण्याची कोणतीही शक्यता दिसत नव्हती. पण अशाही परिस्थितीत या मातेने चार दिवस मृत्यूशी झुंज दिली. पण कोणतीही मदत वा वैद्यकीय उपचार मिळू न शकल्याने तिने या जगाचा निरोप घेतला. तिचा जीव अडकला होता तिच्या पिलांमध्ये. जाता जाता त्यांना कसं जगायचं हे ती सांगून गेली. मला इथेच सोडून द्या आणि तुम्ही सुरक्षित जागी पोहचण्याचा प्रयत्न करा. स्वतःचा जीव वाचवा. या चार छोट्या मुलांमध्ये होती लेस्ली नावाची एक तेरा वर्षांची मुलगी. तिच्यासोबत होती तिची तीन लहान भावंडं. सोलेनी वय वर्ष नऊ, टिएन वय वर्षे फक्त चार आणि लहानगी क्रिस्टीन. क्रिस्टीन तर अगदीच कोवळी. जेमतेम एक वर्षाची. अपघातातून बचावले तरी जिवंत राहणे या मुलांसाठी सोपं नव्हतं. नियती जणू त्यांची कठोर परीक्षा घेत होती.

अमेझॉनच्या जंगलाचं नुसतं नाव जरी काढलं तरी भल्याभल्यांचा थरकाप होतो एवढं हे भयानक जंगल. या जंगलात दिवसाही सूर्यप्रकाश सगळीकडे पोहोचू शकत नाही. एवढं ते घनदाट आणि उंच. जंगलामध्ये हिंस्त्र प्राण्यांचा सुळसुळाट. डास, विषारी कीटक, साप यांचा वावर. जवळपास कोणतीही मानवी वस्ती नाही. मदत मिळण्याची शक्यता नाही. भरीत भर म्हणजे हे जंगल तस्करांचा आणि दहशतवाद्यांचा अड्डा. अशा या जंगलात ही कोवळी पोरं आपल्या आयुष्याशी झुंजत होती.



अपघात घडल्याचे कळल्यानंतर कोलंबियामध्ये एकच हलकल्लोळ उडाला. कोलंबिया सरकारने विमानाचा शोध घेण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरु केली. तेथील पोलीस दल, सैन्यदल आणि बचाव पथकाची माणसं या विमानातील माणसं, मुलं कुठे आढळताहेत का याचा नियोजितपणे शोध घेऊ लागले. शोधकार्यात अमेझॉनच्या घनदाट जंगलामुळे अनेक अडथळे येत होते. पण नेटाने शोध घेणे सुरूच होते. अखेर झाडावर अडकलेले विमान शोधपथकाला सापडले. विमान अपघातात ठार झालेल्या व्यक्तींचे मृतदेह मिळाले. पण ती चार चिमुकली बालके मात्र कुठे आढळत नव्हती. सगळ्यांना चिंता आणि उत्सुकता होती ती त्यांची. हे बचावकार्य अक्षरशः चाळीस दिवस चालू होते. अतिशय घनदाट असे अमेझॉनचे जंगल ही माणसे पिंजून काढत होती. जमिनीवर म्हणजेच प्रत्यक्ष जंगलात जाऊन शोध घेणारी बचावपथके होती तशीच हेलिकॉप्टरचा वापर करून आकाशातूनही शोध घेणे सुरु होते. इच्छा असली की मार्ग दिसतोच. या शोध पथकाने मुलांच्या आजीकडे जाऊन तिच्या आवाजात आणि त्या मुलांच्या स्थानिक भाषेत एक ऑडिओ मेसेज रेकॉर्ड केला. त्या ऑडिओत आजी म्हणत होती, 'बाळांनो, आहेत तिथेच थांबा. आम्ही तुमचा शोध घेतोय. तुम्ही आम्हाला हवे आहात. आम्ही तुमची वाट पाहतोय.' हा आजीच्या आवाजातील संदेश ती शोधपथके मुलांसाठी मोठ्या आवाजात प्रक्षेपित करत होती. ती मुले एकाच ठिकाणी थांबावी आणि त्यांना शोधणे सोपे जावे हा उद्देश होता. त्या मुलांना खायला मिळावं यासाठी हेलिकॉप्टरमधून खाद्यपदार्थांची पाकिटे टाकण्यात येत होती. इकडे या बालकांचा आयुष्याशी लढा सुरु होता. तशी तेरा वर्षांची लेस्ली लहानच! पण आता ती सगळ्या भावंडांमध्ये मोठी होती. आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी नियतीनं तिच्यावरच टाकली होती. लेस्लीने धीर एकवटला आणि निश्चय केला की या परिस्थितीतही आपण आपल्या भावंडाना वाचवायचं. जगायचं आणि जगवायचं तर खाण्यासाठी काहीतरी व्यवस्था करणं भागच होती. सुरुवातीला विमानातून खाली पडलेल्या अन्नावर त्यांनी कसेबसे दिवस काढले. पाण्याचा शोध घेतला.

जंगलातील फळे खाणे तसे धोक्याचे होते कारण काही फळे विषारीही असतात. पण लेस्ली जंगलकन्या होती. आदिवासी जमातीतील होती. जंगलात कसे राहायचे, आपला बचाव कसा करायचा, काय खायचे आणि काय खायचे नाही याचे ज्ञान तिला लहानपणापासून मिळाले होते. अवघ्या एक वर्षाच्या क्रिस्टीनालाही सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर होती. लेस्ली आणि तिची भावंडे नियतीने घेतलेल्या कठोर परीक्षेत यशस्वी झाली. चाळीस दिवस या मुलांनी जीवनमरणाचा लढा दिला होता. कशी राहिली असतील ही मुलं? त्यांनी काय खाल्लं असेल? पाण्याची तहान त्यांनी कशी भागावली असेल? केवळ एका वर्षाच्या बाळाला त्यांनी कसे सांभाळले असेल असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात.

इकडे शोधपथकाचे कार्य सुरूच होतं. स्निफर डॉगसह १५० सैनिक या मुलांचा शोध घेत होते. अखेर त्यांना या मुलांच्या काही खाणाखुणा मिळायला सुरुवात झाली.

एक दुधाची बाटली, डायपर, कात्री, केस बांधण्याची क्लिप आणि आणखी काही वस्तू मिळाल्या. मुलांच्या पायांचे ठसे आढळले. शोधपथकाच्या आशा पल्लवित झाल्या. त्यांनी आपल्या तपासाचा वेग वाढवला आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आलं. चारही मुलं आश्चर्यकारकरित्या त्यांना जिवंत मिळाली. त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी ही आनंदवार्ता जाहीर केली. ते म्हणाले, ' इतक्या भीषण परिस्थितीतही ही मुले चाळीस दिवस जिवंत राहिली, हे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. ही मुले राष्ट्राचे भूषण आहेत. 'या मुलांना त्यांना चिल्ड्रन ऑफ कोलंबिया म्हणून जाहीर केले. अत्यंत विपरीत परिस्थितीत राहिल्यामुळे ही मुले कमालीची अशक्त आणि आजारी झाली होती. त्यांना पुढील उपचारासाठी कोलंबियाची राजधानी बोगोटा इथे नेण्यात आले.

या घटनेला आपल्या मनोवृत्तीप्रमाणे केवळ 'देव तारी त्याला कोण मारी' असे म्हणून सोडून देता येणार नाही. या घटनेत मुलांची जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती तर आहेच पण विपरीत परिस्थितीतही जीवन जगण्याचं जे ज्ञान आणि कौशल्य त्यांच्याकडे होतं त्यामुळे ती जिवंत राहू शकली. ही घटना आपल्यासमोर अनेक प्रश्न उभे करते.

आपल्याकडील मुले समजा अशा विपरीत परिस्थितीत अपघाताने सापडलीच तर ती कितपत तग धरू शकतील? आपण मुलांना शालेय शिक्षण देत असताना अशी काही कौशल्यं शिकवतो का? पूर, भूकंप, आगीच्या घटना, रोगाच्या साथी,दुष्काळ आणि अन्य काही नैसर्गिक आपत्तीपांसून बचाव करायचे आपण त्यांना शिकवतो का? आपण त्यांना फक्त पुस्तकी किडे बनवत नाही का? घोकंपट्टी करून परीक्षेत उतरवलेले ज्ञान अशा परिस्थितीत कितपत उपयोगी ठरू शकेल? आपण मुलांमध्ये पोहणे, झाडावर चढता येणे, सायकल चालवता येणे, आपल्या वाहनाची दुरुस्ती करता येणे, जंगलातील वनस्पती आणि फळांची माहिती असणे, पाण्याचा शोध कसा घ्यायचा यासारख्या गोष्टींची कौशल्ये विकसित करतो का असा प्रश्न आहे.

दरवर्षी वेगवेगळ्या सहलीमध्ये अनेक विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू अशा प्रकारच्या बातम्या आपण वाचतो. घनदाट अरण्ये, वाळवंट इ. ठिकाणी हरवण्याच्या घटना घडू शकतात. असे प्रसंग सांगून येत नाहीत. अशा प्रसंगी साहस, प्रसंगावधान, जीवन जगण्याची दुर्दम्य इच्छा, आलेल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठीची सकारात्मक आणि कणखर मानसिकतेची आवश्यकता असते. कोलंबियात घडलेल्या अशा घटना आम्हाला विचार करण्यास प्रवृत्त करतात. प्रश्न असा आहे की आपण त्यापासून काही शिकणार का?

## हेच ते कोकण

सळाळत्या सागराचे पायात पैंजण
सागर किनाऱ्यास सुरुचे कुंपण
कुंपणात वाळूचे सोनेरी अंगण
अजूनही ज्याच्या प्रे त माझे मन
हेच ते कोकण...हे ते कोकण ...१
सागर किनारी माडांची वाडी
वाडीच्या काठाशी शिडाची होडी
होडीने घुसळावे दर्याचे पाणी
सोबतील नाखव्याची सु धुर गाणी
आनंदाने न्हाते जिथे माझे मन
हेच ते कोकण...हे ते कोकण ...२
कौलारू घरांचा निराळाच थाट
अंगणात खेळते सागराची लाट
लाल मातीवर ठसे उमटवत
दूरवर नेते नागमोडी वाट
शांत रमणीय अन् उत्साही जीवन
हेच ते कोकण...हे ते कोकण ...३
कोकमचं सरबत अन् फणसाची पोळी
हापूस आंब्याची तर गोडीच निराळी
भाताच्या शेतात साचलेली तळी
सूर्याला अडवते करवंदजाळी
हिरव्या रानांची सर्वत्र उधळण
हेच ते कोकण...हे ते कोकण ...४
पावसातील सौंदर्य अलौकिक फार
धुक्याची दुलई अन् वारा गार
शुभ्र झऱ्याची झळाळती धार
ढगांची शिवाशिवी डोंगराच्या पार
शब्द न पडती पुरे, कसे करावे वर्णन
हेच ते कोकण...हे ते कोकण ...५

प्राजक्ता गोंधळेकर

## सुमनबहार

वर्षाधारा टपटप पडती नभ छेडितो मेघमल्हार
प्रसून उपवनी शोभिवंत सृष्टीस येते नव बहार.
दवबिंदू पर्णापर्णात नाचे साज धरेचा, साक्षात रमणी
मोगरा, गोकर्ण, प्राजक्त,
चाफा शुचिभूर्त, पीयूष जलधारांनी.
झेलुनी सूर्याच्या तप्त झळा
ओढिता पावित्र्याची झळाळी
निशेचा चंद्रप्रकाश प्राशुनी
मोगरा, ग्रीष्मातही सुगंध उधळी.
सांजवेळी प्राजक्त करतो अंगणी सुगंधी बरसात
केशरी नाजूक देठावर शुभ्र सुमने सुस्नात.
नाजूक फुलं नक्षीदार ही झुळुक येता, झेपावती धरा
हरित तृणांच्या मखमलीवर जणू चांदण्यांचा सडा हासरा.
उपवनी सजली निळी, पांढरी
गोकर्ण फुले, वर्षाकाळी बहरती
शांती, समृद्धीचा भासे संगम अनुपम सौंदर्याची परिपूर्ती.
हिरवे कंच पर्ण सुशोभित पिवळा सोनचाफा मनमोहक
पखरण सुगंधाची दीर्घकाळ आरोग्यास असे पोषक.
मंद पावलांनी येत निशा शुभ्र रातराणी प्रसवते
घोसच घोस सुमनांचे नाजुक पाकळी थरथरते.

स्वप्ना जगदळे

# शब्द आणि ज्ञानेश्वरी

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणजे संतश्रेष्ठ कमल दलामध्ये उमललेले एक अलौकिक ब्रह्मकमळ आहे. समाजाने त्यांना काही दिले नाही. दिले असतील तर क्लेशच दिले. ज्या समाजाने त्यांना अतिशय हीन दर्जाची वागणूक दिली, क्लेष दिले, त्या समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी त्यांनी 'ज्ञानेश्वरी'सारखा अद्भुत ग्रंथ लिहिला. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ अद्भुत का आहे, याचे उत्तर या ग्रंथाच्या प्रयोजनात आहे. ज्ञानेश्वरीचे प्रयोजन 'कलिकलित भुतांचा उद्धार' असे स्वतः ज्ञानेश्वरांनीच सांगितले आहे. कलिग्रस्त आर्तांच्या उद्धारासाठी ज्ञानेश्वरीचा जन्म झाला. गीता ही ब्रह्मविद्या आहे. ती उपनिषदांचा अर्क आहे. केनोपनिषदाच्या तिसऱ्या खंडात 'यक्षोपाख्यान' आहे. एकदा ब्रह्म यक्षरूपाने देवांच्या समोर प्रकट होतात; पण एकही देव त्यांना ओळखू शकत नाही.

शेवटी सर्व देवता हतबल होऊन इंद्राला यक्षाकडे पाठवतात. इंद्राला तो यक्ष दिसत नाही. पण एक अतिशय ओजस्वी स्त्री त्याला दिसते. तिचे नाव उमा असते. इंद्र कुतूहलाने तिला विचारतो, 'तो यक्ष कोण होता?' तेव्हा ती सांगते की, तो ब्रह्म आहे आणि मी उमा ब्रह्मविद्या आहे.

ज्ञानेश्वरांनी गीतेला ब्रह्मविद्या म्हटले आहे आणि याच ब्रह्मविद्येचा सुकाळ ज्ञानदेवांना मराठीत करायचा होता. (मराठियेचा नगरी । ब्रह्म विद्येचा सुकाळू करी) ही ब्रह्मविद्या म्हणजे अरूपाचे रूप. ज्ञानेश्वर महाराजांनी याच अरूपाच्या रूपाची अखंड साधना केली आणि त्यांच्या विचक्षण प्रतिभेमुळे मराठी भाषेच्या प्रांगणात 'ज्ञानेश्वरी' नावाचा अलौकिक चैतन्य वृक्ष बहरला.

खरे तर गीतेचे तत्त्वज्ञान अतिशय गूढ, गहन आणि पामर शब्दांना न आकळणारे. श्रीकृष्णाने रणांगणावर सांगितलेली ही गीता प्रत्यक्ष कशी आहे? रक्तरंजित रणांगणावर साक्षात मृत्यू दाही दिशांना थैमान घालीत असताना श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेले गीता तत्त्वज्ञान मानवी देहाच्या जीवनमरण भोगापलीकडचे आहे.

श्रीकृष्णाचे शरीर पांचभौतिक नव्हतेच. त्यांनी शरीर धारण करणे ही त्याची लीला होती. त्यामुळे त्याने रणांगणात सांगितलेले गीतेचे तत्त्वज्ञान ही शब्दांची आहुती नव्हतीच मुळी. अर्जुनाने अनुभवलेली ती एक विलक्षण दिव्यानुभूती होती. ही दिव्यानुभूती सामान्य माणसापर्यंत पोहोचविणे शब्दांना शक्य नव्हते. त्यामुळे ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्माण झाला, असे आपण म्हणू शकत नाही. ज्ञानेश्वरी ज्ञानदेवांच्या मुखातून प्रकट झाली, असे मात्र म्हणू शकतो.

ज्ञानेश्वरीची सुरुवात 'ओम् नमोजी आद्या' अशी होते. ओम् शब्दाला विलक्षण पावित्र्य आहे. ऐतरेय ब्राह्मण ग्रंथात एक प्रसंग आहे. होतृ ऋचांचे आणि गाथांचे उच्चारण करीत आहे आणि अध्वर्यू त्याला प्रतिसाद देतो आहे. तो म्हणतो की, ऋचांना प्रतिसाद देताना मी 'ओम्' म्हणेन आणि गाथांना प्रतिसाद देताना 'तथ' म्हणेन. कारण 'ओम' हा शब्द देव वापरतात.

ऋचा देवनिर्मित आहेत आणि 'तथ' हा शब्द माणसे वापरतात. गाथा मानवनिर्मित आहेत. सर्व पवित्र मंत्रांची सुरुवात आणि शेवटही 'ओम'नेच होतो. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या शब्दाला असा पवित्र गर्भितार्थ आहे. 'ओम' शब्दाने सुरुवात होणारी ज्ञानेश्वरी ही गाथा नाही.दिव्य ऋचा आहे. ज्ञानेश्वरी लिहिली गेली नाही; ती प्रकट झाली. कृष्णार्जुनाची ती दिव्यानुभूती सामान्यजनांपर्यंत ज्ञानेश्वर महाराजांना पोचवायची होती. त्यांना माहीत होते की, गीतेमधील सनातनी तत्त्वज्ञान सर्वकाळ सर्वसामान्य जनांना मार्गदर्शन करणारे राहील. यामुळे ती दिव्य अनुभूती त्यांना फक्त अर्जुनापर्यंत सीमित ठेवायची नव्हती. विविध अर्थगर्भ शब्दकळा वापरून ज्ञानेश्वर माउलींनी सामान्य जनांशी काव्यात्मक संवाद साधला. आई मुलाला जेवू घालते तेव्हा त्याच्या तोंडात मावतील एवढेच घास ती माउली भरविते. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी सर्वसामान्य माणसाला समजेल- उमजेल अशाच प्रकारे प्रकटली. असे वाटते की, आपली ज्ञानेश्वरी ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी आहे. ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी कशी असेल?

शब्दातीत दिव्यानुभवाला शब्दांमधून व्यक्त करण्याचे महान कार्य ज्ञानदेव महाराजांनी केवळ सामान्यजनांसाठी केले. त्यांचे शब्द लावण्य अद्भुत आहे. हा शब्दातीत अनुभव कसा आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

'हे शब्देविण संवादिजें ।
इंद्रियां नेणता भोगिजें
बोलाआधी झोंबिजे ।
प्रमेयासि ।।'

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, हे कैवल्य रसाचे ताट आहे आणि त्याचा स्वाद चाखायचा असेल तर, 'आतां आत्मप्रभा नीचनवी । तेचि करूनि ठाणा दिवी। जो इंद्रियाते चोरूनु जेवी । तेयासी च फावे ।।'

असे हे अतींद्रिय शब्दातीत अध्यात्म शब्दांच्या माध्यमातून अनुभवायचे आहे. संत ज्ञानेश्वरांनी शब्दांच्या सामर्थ्यावर जागोजागी विश्वास प्रकट केला आहे. त्यांचे शब्दकाव्य त्या दिव्य अनुभूतीला जनसामान्यांपर्यंत पोहोचवेल, याची त्यांना खात्री आहे.

'तो शांतु चि अभिनववैल। ते परियसां मऱ्हाटे बोल।
जे समुद्रा ही हूनि खोल। अर्थभरित।।
जैसे बिंब तरि वचके येवड।
परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे।
शब्दाची व्याप्ति तेणे पडे। अनुभवावी
ना तरि कामितेयाचिया इच्छा। फळे कल्पवृक्षु जैसा ।
बोलु व्यापकु होये तैसा। तरी अवधान देयावे ।।'

शब्दाचा अर्थ समुद्राएवढा खोल आहे. सूर्याच्या प्रकाशाएवढा व्यापक आहे. सर्वांना माहितीच आहे की, कल्पवृक्षाजवळ तुम्ही जी इच्छा व्यक्त करता ती पूर्ण होते.

संत ज्ञानेश्वरांनी शब्दाला कल्पवृक्षाचा दृष्टांत देऊन त्यांच्या अफाट प्रतिभेची साक्ष दिली आहे. कल्पवृक्षाप्रमाणेच तुम्ही शब्दात जेवढा अर्थ पहाल आणि कल्पाल तेवढे सामर्थ्य तुम्हाला तुमचा शब्द देतो, असे ज्ञानेश्वरांना म्हणायचे आहे. आणि ही शब्दांची किमया त्यांना मराठमोळ्या भाषेतूनच अभिव्यक्त करायची आहे. मराठमोळ्या परसदारी फुललेली ही शब्दवेल न्याहाळताना त्यांना जिव्हाळ्याचा पाझर फुटला आहे.

'माझा मऱ्हाटा चि बोलु कवतिके।
परि अमृतातें ही पैजेंसीं जींके।
ऐसी अक्षरें चि रसिके। मेळवीन ।।'

ज्ञानेश्वरांना विश्वास आहे की, त्यांची मराठी बोली साजिरी आहे. आकर्षक आहे आणि एवढी रसाळ आहे की, निश्चितच श्रीकृष्णाने अर्जुनाला दिलेली ती दिव्य अनुभूती त्यांचे शब्द जनसामान्यांपर्यंत पोहोचवतील. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, हे मऱ्हाठी शब्द एवढे रसाळ आहेत की ते चाखण्यासाठी आणि त्यातून अनुभूती मिळविण्यासाठी इंद्रियांचे देखील आपसात भांडण होते.

'साहाजे शब्दु तरि विषो श्रवणाचा।
परि रसना म्हणे कां रसुचि हा आमचा।
घ्राणासि भावो जाये परिमळाचा। हा तो चि कां होईल।।'

खरे तर शब्द म्हणजे डोळ्यांनी कृतार्थपणे वाचावे असे शब्द. पणज्ञानेश्वरीतले शब्द म्हणजे दिव्य अनुभूतीची फुले आहेत. या दैवी शब्दांना नुसते कानाने ऐकले तरी शब्द डोळ्यासमोर उभे राहतात. या शब्दांचा गंध आपल्या आजूबाजूला झुलत असतो आणि त्याच क्षणी हे शब्द चाखून आपल्या जिभेची तृप्ती होत असते. म्हणूनच संस्कृत भाषेचे अलंकार नाकारून मराठी मायबोलीतील शब्दकळेचा ज्ञानेश्वरांनी अंगीकार केला. कारण ती दिव्य अनुभूती त्यांना सामान्यांपर्यंत सुलभतेने पोहोचवायची होती.

ज्ञानेश्वरांनी मराठीतले अनेक वाक्प्रचार म्हणी वापरून शब्दांचे सामर्थ्य सांगितले आहे.

'जरि मैत्रें चि वैरी मरे । तरि वायां कां बांधावे कटारे ।
रोगु जाये दुधें ओगरे । तरी नींबू का पियावा ।
तैसा मनाचा मारू न करिता । इंद्रियां दुःख नेंदिता ।
एथ मोक्षु असे आयिता श्रवणांमाझि ।'

जर चांगल्या बोलाने शत्रूचा काटा निघत असेल तर कमरेला कट्यार का बांधायची किंवा दूध पिऊनच रोग जात असेल तर दुधात लिंबू का पिळायचं. याप्रमाणेच इंद्रियांना विशेष कष्ट न देता मराठी रसाळ बोलीमध्येच आपल्याला या ग्रंथाने आत्मज्ञान होते, असा ज्ञानेश्वर महाराजांचा ठाम विश्वास आहे. संत ज्ञानेश्वरांना माहिती आहे की, अध्यात्मशास्त्राचे खरे अधिकारी योगाचार्य असतात.

अंतर्मुख वृत्तीने उपासना करणारे साधक असतात. भगवान श्रीकृष्णाची योगदीक्षा घेण्यास ते कायम तत्पर असतात. त्यांना रसाळ भाषेची गरज नाही. अलंकारिक भाषेचे माध्यम त्यांना नको असते; पण सर्वसामान्य लोकांचे काय? सामान्य माणसाच्या प्रती ज्ञानेश्वरांच्या अंतर्मनात असलेल्या या कळवळ्यामुळेच त्यांनी ज्ञानेश्वरीची भाषा सर्वसामान्य पण अत्यंत ओघवती आणि रसाळ ठेवली.

'तैसे अध्यात्मशास्त्रीं इथ । एक अंतरंगचि अधिकारिये ।
येरि लोक वाक्चातुय । होईल सुखिया ।।'

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, सर्वसामान्य लोकही त्यांच्या भाषेतील संवाद ऐकून सुखी होतील, समाधानी होतील. येथे सुखी होण्याचा अर्थ आत्मज्ञानाशीसंबंधित आहे. मोक्षाशी संबंधित आहे. ज्ञानेश्वरांना फक्त योगाचार्य किंवा ऋषितुल्य गुरुजनांना आत्मज्ञान मिळालेले बघायचे नव्हते. त्यांना सर्वसामान्यांचे सुख बघायचे होते. सामान्यजनांना मोक्षप्राप्ती करवून आपला समाज आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत झालेला त्यांना बघायचा होता.

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला रणांगणात उपदेश केला ते क्षण कसे मोजायचे हे अजूनही कोणाला कळले नाही. काही क्षणच ती दिव्य अनुभूती प्रकट झाली असावी. रणांगणात अर्जुनाच्या जवळ असलेल्या इतर सैनिकांना जाणीवही नसेल की, त्यांच्या आजूबाजूला एक प्रखर आत्मज्योत प्रज्वलित झाली आहे. ज्ञानेश्वरांनी त्या संवादाला 'निराळात केलेली मोकळी गोठी' असे म्हटले आहे.

आसमंत उजळवून टाकणाऱ्या या शब्देवीण संवादाला महर्षी व्यासांनी गीतेचे आवरण दिले. गीता ही श्रीकृष्णाची वांग्मयी मूर्ती आणि तिला प्रतिभेचे कोंदण दिले ते ज्ञानदेवांनी. त्यांच्या असामान्य प्रतिभेने गीता जनसामान्यांपर्यंत पोहोचली. पण शेवटी असेच म्हणावे लागेल, ती दिव्य अनुभूती देणारा एकच तो मुरलीधर भगवान श्रीकृष्ण. त्या दिव्य अनुभूतीला गीतेच्या वेष्टणात अलगद ठेवणाराही महर्षी व्यासांच्या रूपातला तोच या सम हा जगद्गुरू भगवान कृष्ण आणि गीतेला सर्वसामान्य माणसापर्यंत ज्ञानेश्वरीच्या रूपात पोहोचवणारासुद्धा ज्ञानदेवांच्या रूपातला तोच हा सबंध विश्वाचा कर्ताकरविता योगिराज भगवान श्रीकृष्ण. वाच्य तो आणि वाचकही तोच.



ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# वेल्हाळ शांततेच्या खुणा जोपासणारा हिवाळा

आमच्या लहानपणी साधारण ३०-३५ वर्षांपूर्वी असे अनेक घरंदाज म्हातारे हातात सागवानी नक्षीकाम केलेल्या मुठीची काडी घेऊन धुक्याचा पडदा बाजूला सारत शेत रस्त्यामध्ये ताठ मानेने चालत. प्रत्येक घराच्या दरवाज्याजवळ उभे असलेली नक्षीदार मुठीची काठी त्या घरातील वृद्धांचे अस्तित्व आपसूक अधोरेखित करत असत. ती काठी कोणत्या लाकडाची आणि किती बहुमोल नक्षीची आहे यावरून ती वापरणाऱ्या माणसाची पत त्या काळात ठरत असे. आजच्या काळात त्या काठीच्या आधाराने आपले म्हातारपण पेलावणे शक्य नाही या जाणिवेतून प्रत्येक वृद्ध आतून गेला आहे, त्याच्या हातातली काठी सशाच्या शिंगाप्रमाणे नष्ट झाली असून शहराच्या भिंतीआड श्वास कोंडून घेण्यापेक्षा वृद्ध मंडळी स्वतःच्या गावखेड्यात स्वतःला एकाकीपणाचा शाप उपभोगत दिवस मोजत आहेत.

हिवाळ्याची थंडी जितकी लाघवी तितकीच झोम्बणारी, शांततेची कोवळी वृष्टी, दव भिजली पहाट, उन्हात आळसावलेली दुपार, गर्द अंधारात गुडूप होणारी रात्र, आणि चमकणारे चांदणे रात्रभर जमिनीतून वर येणारे धुरकट वाफांचे सूक्ष्म तुषार सकाळच्या कोवळ्या सूर्याने उजळतात आणि सर्वत्र एक हलकी, मखमली थंड झड उतरते. झाडांची पाने हातभर दवाने ओथंबलेली-जणू झोपेतून उठलेल्या निर्मळ मनाच्या सुंदर स्त्रीच्या पापण्यांवर अजूनही स्वप्नांचे थेंब चिकटलेले असावेत.सुंदरतेला क्षणभगूरतेचा शाप असतो हे समजून घ्यायचे असेल तर दवांचे मोती हे एक चांगले उदाहरण ठरते.

निष्पाप डोळ्यात थांबलेला अश्रू आणि गवतावर आपल्या ऐपतीनुसार जागा अडवून बसलेले दवांचे मोती मला सारखेच वाटतात. धुक्याच्या पडद्यातून सूर्य बाहेर डोकावला की त्याचे प्रतिबिंब स्वतःच्या हृदयात सामावून घेण्यासाठी दवांचे उत्सुक असलेले थेंब ही हिवाळ्याची संपत्ती असते.

पर्वतांच्या कुशीतून धुके सावकाश उतरते. गावाच्या गल्ल्यांमध्ये अजून चूल पेटायची असते, पण धुक्याने सर्व आकाशातला प्रकाश चोरून नेलेला असतो. डोळयांसमोर नेहमीची असलेली वाट धुक लपवून ठेवते आणि आपण चकवा लागल्यागत निसर्गाचा हा खेळ डोळ्यात जतन करत चालत राहतो. कदाचित तेच आपल्या हातात असत. धुक्याच्या दाट वाटेवर दूर कुठे गुरांचा हलकासा आवाज, सावलीसारखे हालणारे झाडांचे खांदे, आणि त्या सगळ्यातून उमटणारा धुरकट श्वास. आणि घरासमोरच्या तुळशीबागेत दवाचं पाणी मोत्यांप्रमाणे गोळा झालेलं. बूटात पडणाऱ्या थंड जमिनीचा शिरशिरीत स्पर्श. मातीच्या श्वासाची ओल. ही सकाळ भिजलेली असत पणे पावसाने नाही, तर हवेनेच. एकदा सूर्यवर आला की हिवाळा स्वतःचा सर्वांत सुंदर पिसारा उघडून बसतो. होय मऊ, कोमट, सोनेरी ऊन. ते डोळ्यांना चटका देत नाही.ते हातांवर जळत नाही. ते फक्त हळूहळू अंगभर आणि अंगणभर पसरत राहतं.

कधी काळी हिवाळ्याच्या गोठलेल्या काळात मळ्यात कापूस सुकत असे, ओसरीवर आजी ऊन खात बसलेल दिसी, लहान मुलं सकाळच्या धुक्यातून बाहेर पळत येत ऊनात एकदम उभे राहत. आणि रस्त्याच्या कडेकडेला शेकोटी पेटलेली दिसे. हा अनुभव म्हणजे स्वर्गाची चादर असायची. दुपारी ऊन जरी असलं तरी मनात एक मौन गिळलेलं धुके असतंच. ओहोळं शांत, नदीचाही आवाज मंद.हळूच पाण्यातून बाहेर सूर मारणाऱ्या मासोळ्या आणि त्यांना टिपणारे पक्षी हे चित्र आजकाल पाहायला मिळत नाही पण तेही नदीचे वैभवशाली रूप असते. गावाबाहेरच्या पायवाटेवर झुडुपांमधल्या सावल्या दाटून येतात. जणू सूर्याने एकदा उजेड दिला आणि किरण म्हणतो, आता तुम्ही स्वतःची शांतता शोधा. हीच ती वेळ असते. जेंव्हा शेतात गव्हाच्या पिकाची हिरवी चादर सोनेरी तृणांमध्ये बदलण्याची वेळ आलेली असते. गार वाऱ्यात डोलणाऱ्या कणसांतून दूरवर कुठे बैलांची घुंगरं हळुवार वाजत राहतात. आणि त्या ऊन्हात भिजलेली, थकलेली दुनिया शांत बसलेली असते.



रात्रीच्या थंड हवेसारखाच हिवाळा येताना हलकेच पांघरूण ओढतो. आवाज न होता, पावले न उमटवता, इतकं निस्पृहपणे फक्त हिवाळाच आपला ठसा उमटवू शकतो. पावसाळा येईल तो पावसाच्या टपोऱ्या थेंबांचा आवाज घेऊन, आणि उन्हाळा येईल तो रणरणत्या उन्हात घोघावणाऱ्या वाऱ्याला घेऊन, फक्त हिवाळा तेवढा श्वासांची धुरकट वलयं मागे ठेवत, धुक्याच्या निशब्द लहरी मधून अलगद आपल्यासमोर येऊन उभा राहतो. जणू एखादा जून्या काळाचा पडदा बाजूला सारून घरंदाज वृद्ध भल्या पहाटे आपल्या निवासस्थानातून बाहेर पडतो ती त्याच्या खांद्यावर धूसर चादर, आणि दाढीच्या टोकांवर दवबिंदूंची चमक घेऊन.

हिवाळ्यात पाऊस नाही म्हणायला नसतोच, पण धुके आणि सूर्य यांचा एक मूक खेळ असतो.

कधी धुकं जिंकतं, संपूर्ण दुपारभर गाव मातीच्या गोठ्यासारखं दिसतं. कधी ऊन जिंकतं आणि आकाशात उभे राहते पारदर्शक निळाईची वीण. श्रावणातल्या इंद्रधनुष्य नसत हिवाळ्यात, पण दवबिंदूंमधला रंगोत्सव कायम असतो. हिवाळ्यातील हिरवे गवत म्हणजे सृष्टीचा नाजूक लुगड्याचा आपलेपण जपणारा हिरवा पदर. हलकं, थंड, आणि स्पर्श केल्यावर नकळत तुटून जायचं. दवाने भिजलेल्या गवतावर सकाळी गाय बांधली की तिच्य वासराच्याा पायाखाली चुरमुरलेला आवाज येतो. गावातल्या प्रत्येक वासराच्या तोंडात चघळणाऱ्या चाऱ्याचा आवाजही मोठा वाटतो. पानंही वाऱ्याला विचारूनच हलतात. धुकं ओसरीवर उतरलेलं असतं. जणू निसर्गाने पांढरी रंगीत शाल पसरून ठेवलीय. खरं तर कुठंमुठ दूर डोंगर उतारांवर गवत सुकायलाही लागतं आणि पिवळसरं झाकण, सोनेरी फुलोरा असा निसर्ग रंगाचा पडदा उलगडत जातो. गावालगतचे ओहोळ, झरे, धबधबे ह्यांचा आवाज मंदावतो.

श्रावणात गर्जणारे धबधबे आता जणू पुराणकथांतील गर्द हिरव्या सापासारखे शांत. ओहोळाचा झुळझुळ आवाज ऐकू येतो. पाणी थंड, हात घालावा आणि पटकन काढून घ्यावा अशी काटेरी थंडी. हिवाळ्याच्या शेतात हिरवाई असते, पण तिच्या सावलीत एक गंभीरत असतो.कापूस, हरभरा, गहू सगळे पिकांच्या मुकुटातल्या दगडांसारखे शांत, उतू जात नाहीत, डोलत नाहीत, फक्त रात्रंदिवस वाढत राहतात. आकाश मात्र इतकं निळं की डोळ्यावर निळसर झाक यावी.

निळ्या आभाळाची नवलाई पाहता पाहता हिवाळ्यातीलअंधारात चांदण्याची कोरडी रात्र मन वेधून घेते. हवेच्या काचेसारख्या पारदर्शक पटावरून चांदणं जमिनीवर उतरलेलं असतं. आणि गाव ठिपक्यांसारखा पसरलेला. कुत्र्यांचे सावलीतले बसणे, मध्येच सूर काढून केकावणारे मोर, पहाटेच्या वेळी दूर एखाद्या कोकिळेचा हलका सूर, आणि आभाळाच्या मध्यभागी थिजून बसलेलं चांदणं. बरं या ऋतूत फुलं जास्त मूक असतात.

पारिजातकाची थंड सुगंधी पांढरी पखरण, जास्वंदाचे लाल रंगातलं शांत नयन, मोगऱ्याचा मंद, लाजरा सुगंध ह्या सोबतच रानफुलंही तशीच नाजूक आणि वेल्हाळ. कडूभोपळा, वनलक्ष्मी, धुर्वा, ओंबळा.

खडकांवर उगवलेली निळसर पोरकट फुलं- जणू थंडीच्या कुशीतही आपली आग खास जपलेली असते. संत्र्याचा सुगंध गावभर उडत राहतो. बोरं, आवळे, चिकू, सीताफळ हे तर जणू तोंडात विरघळणारे हिवाळ्याचे जीवंत दागिने. हिवाळ्यात नद्या शांत, स्वच्छ, गंभीर.

पक्षी उब शोधत झाडांच्या जाड फांद्यांवर बसतात. बकऱ्या आणि गुरं सडेतोड अंगावर ऊन घेऊन बसतात. जंगलातही प्राण्यांचे आवाज आणखीन स्पष्ट ऐकू येतात आणि थंडीने हवेत नाद अधिक दूरवर जातो.

हिवाळ्यातील दुपारची ओसरी गजबजलेल्या गप्पांची असायची. कोमट ऊन आणि पुस्तक, लहान मुले आणि गरम भाकरीचा सुगंध. तुळशी विवाह, पौष पौर्णिमा, मकरसंक्रांत, हे सण हिवाळ्याच्या अंगावर उमटलेल्या हलक्या रंगासारखे. एकंदरीत हिवाळा म्हणजे आवाज नसलेली कविता. थंडी, धुके, कोरडे ऊन, शेतांची हिरवी ओल, दुपारी पसरत जाणारी शांतता, रात्रीची दवधारा- हे सगळं मिळून एक असा ऋतू उभा करतात की माणूस नकळत आपल्यातच थोडा जवळ जातो. शिल्लक उरतो उबदार दुलईतल्या उबदार थंडीच्या पडसादासारखा.



पान १ वरून

# राम मंदिर: संकल्प ते सिद्धी!

अभिमान वाटू लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हिंदूंमध्ये त्यांचा गमावलेला आत्मविश्वास पुन्हा उत्पन्न करण्यास प्रारंभ केला. मोदी यांनी स्वत: अनेक मंदिरांना भेटी दिल्या आणि तेथील देवतांची यथासांग पूजा केली. अनेक प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार केला. जनतेत धार्मिक पर्यटनाला पुन्हा चालना दिली. राम मंदिराची उभारणी हा त्यांच्या कारकिर्दीचा कळस अध्यायच. 'मंदिर वही बनाएंगे' या ध्येयाने सुरू केलेल्या रथयात्रेचे ते व्यवस्थापक होते. तिथपासून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास राम मंदिराचे भूमिपूजन व रामाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर, काल राम मंदिरावरील धर्मध्वजेच्या उभारणीने पूर्ण झाला. कळसावर डौलाने फडकणाऱ्या धर्मध्वजाला नमस्कार करताना थरथरणारे त्यांचे हात आश्वासनपूर्तीची आणि कृतकृत्यतेची भावना व्यक्त करीत होते.

न्यायालयाने जरी अयोध्येतील रामजन्मभूमीवर प्रभू रामाचे मंदिर उभारण्याच्या बाजूने निकाल दिला असला, तरी पंतप्रधानपदावर नरेंद्र मोदी होते, म्हणूनच हे मंदिर उभे राहू शकले, याबद्दल कोणाच्याच मनात शंका असता कामा नये. त्यावेळी केंद्रात दुसर्या कोणत्याही पक्षाचे वा आघाडीचे सरकार असते, तरी त्या सरकारने मोदी यांच्याप्रमाणे अयोध्येत झटपट भव्य राम मंदिर उभे करण्याचा प्रयत्न केला असता, याची खात्री देता येत नाही. त्यामुळेच आता दि. ५ ऑगस्ट २०२०, दि. २२ जानेवारी २०२४ आणि दि. २५ नोव्हेंबर २०२५ या केवळ तारखा राहिलेल्या नाहीत, तर हे भारतातील सनातन धर्माच्या पुनरुत्थानाचे महत्त्वाचे टप्पे ठरले आहेत. राम मंदिराचे भूमिपूजन, त्यानंतर त्यात झालेली प्रभू रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि काल या भव्य मंदिराच्या कळसावर डोलू लागलेला भगवा धर्मध्वज, हे भारत पुन्हा आपल्या सनातन मूल्यांकडे परतत असल्याचे चिन्ह आहे.

ध्वजारोहणाचा दिवस मंदिर निर्मितीसाठी आपल्या जीवनाची आहुती दिलेल्या प्रत्येकाच्या बलिदानाप्रति समर्पित आहे. मंदिरावरील धर्मध्वज हे धर्माचे, मर्यादा, सत्य, न्याय आणि राष्ट्रधर्माचे प्रतीक आहे. विकसित भारताच्या संकल्पनेचे प्रतीक आहे. गेल्या ५०० वर्षांत साम्राज्य बदलले, पिढ्या बदलल्या, पण आस्था अढळ राहिली. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली अयोध्या उत्सवांची जागतिक राजधानी बनत आहे. येथे जगण्याच्या प्रत्येक दिशेला रामराज्याची दिव्य अनुभूती होत आहे. श्रीराम मंदिराच्या शिखरावरील धर्मध्वजाने एकप्रकारे समाजाला संदेश देण्यात आला की, राम मंदिरात कोणताही बांधकामाचा भाग शिल्लक नाही. मंदिरनिर्माणाचा ५०० वर्षांपूव केलेला संकल्प सिद्धीस नेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात, 'राम हेच राष्ट्र आहे आणि राष्ट्र म्हणजेच राम' असे म्हटले, ते त्याचसाठी! भारतीय राज्यव्यवस्था आणि समाज हा याच चिरंतन मूल्यांवर उभा आहे. मंदिर आणि धर्मध्वजा ही त्या मूल्यांची प्रतीके आहेत. परकीय आक्रमकांनी भारतातील मंदिरांवर हल्ले करून ती नष्ट करण्याचे प्रयत्न केले, ते याचसाठी. कारण, ही मंदिरे भारतीयांना त्यांच्या खर्या धर्माची आणि मूल्यांची सतत आठवण करून देत. हा आत्मसन्मान मोडून काढण्यासाठीच आक्रमकांनी मंदिरांना लक्ष्य केले होते. आता ही प्रतीके भारतीयांना त्यांच्या खर्या धर्माची आठवण करून देत राहतील, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलेले भाषण हे त्यांच्या सर्वोत्तम भाषणांपैकी एक म्हणून गणले जाईल. त्यांनी केवळ या कार्यक्रमाचेच महत्त्व सांगितले नाही, तर या मंदिराचे भारताच्या पुनरुत्थानात काय स्थान आहे, तेही विशद करून सांगितले. 'राम हाच भारताचा केंद्रबिंदू आहे,' याची पुन्हा एकदा त्यांनी जाणीव करून दिली. मोदी यांनी या मंदिराच्या उभारणीमुळे शतकानुशतकाच्या वेदना भरल्या गेल्या आहेत, असे म्हटले. आपण जेव्हा आपली सांस्कृतिक ओळख विसरतो, तेव्हा आपण स्वत:ला हरवून बसतो, असे सांगून ते म्हणाले की, ही ओळख पुन्हा गवसते, तेव्हा राष्ट्राचा आत्मविश्वासही परतून येतो. आता भारताला पुढे प्रगती करायची असेल, तर भारतीयांना मानसिक गुलामगिरीचा त्याग करावा लागेल. 'लॉर्ड मेकॉले'ने घालून दिलेल्या या मानसिक गुलामगिरीच्या धोरणामुळे पाश्चिमात्य ते सर्वच चांगले आणि भारतीयांची व्यवस्था अगदी मागास अशी मानसिकता भारतीयांमध्ये निर्माण झाली. २०३५ मध्ये मेकॉलेच्या धोरणाला २०० वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा येत्या दशकभरात भारतीयांनी या मानसिक गुलामगिरीतून स्वत:ला मुक्त करावे, असे आवाहनही त्यांनी केले. ज्यांना हा भगवा ध्वज एक 'फडके' वाटले होते, त्यांना महाराष्ट्रातील जनतेने राजकारणातून तडिपार केले आहे. आगामी महापालिका निवडणुकीतही कुंभमेळ्यातील गंगाजलाला गटाराचे पाणी म्हणणार्यांना मतदार तेथेच फेकून देतील, यात शंका नाही. उत्तर प्रदेशात समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी यापूर्वी राम मंदिराची खिल्ली उडविली आणि प्रभू रामांचे दर्शन घेण्याचे टाळले. नंतर त्यांनी कुंभमेळ्याचीही टिंगल उडविली; पण या मेळ्याला त्यांच्याच राज्यातून जाणार्या जनतेचा अलोट ओघ पाहून, त्यांनाही शेवटी संगमात डुबकी मारावीच लागली. आता बिहारमधील निकालाने अखिलेश सिंह यांनाही भानावर आणले असून, त्यांनी आपण लवकरच राम मंदिरात दर्शनाला जाऊ, असे अप्रत्यक्षपणे सूचित केले आहे. राजकारणासाठी का होईना; पण सनातनद्वेष्ट्यांना आता राम मंदिर आणि सनातन धर्माबद्दल आदर दाखवावाच लागत आहे. त्यांचा हा पवित्रा राजकीय सोयीसाठी आहे की, ही त्यांची मनापासून भावना आहे, ते जनताच २०२७ मध्ये ठरवेल!

# दक्षिण आफ्रिकेत 'जी-२०' सहकार्याचे...

आता ते पुन्हा एकदा स्थिरस्थावर होत आहेत. माइक कार्नी यांनी कॅनडाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यानंतर त्यांनी स्थानिक राजकारणात भारताला ओढणे थांबवले आणि खलिस्तानवाल्यांना चार हात दूर ठेवले. सध्या दोन्ही देशांवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची वक्रदृष्टी पडल्याने त्यांच्यातील सहकार्याला विशेष चालना मिळाली आहे.

सध्याचे जग हे वादळी परिस्थितीतून जात आहे. प्रत्येक देश स्वतःच्या समस्यांवर स्वतःच मार्ग काढण्याचा प्रयत्न करत असल्याने आंतरराष्ट्रीय, तसेच विविध देशांच्या गटांमधील सहकार्याला मर्यादा आल्या आहेत. 'जी-२०'चा प्रवास विकसित देश ते आघाडीचे विकसनशील देश; ते आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील विकसनशील देश या दिशेने होत होता. अमेरिकेने त्यात खोडा घातला असला, तरी इतर देशांनी आम्ही एकत्र आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न किती यशस्वी ठरला, हे पुढील वर्षीच्या 'जी-२०' परिषदेत ठरणार आहे.

G20 SOUTH AFRICA 2025

कथा

रश्मी वाघमारे

# आणि गाथा तरली...

आज 'गाथा ॲन्ड डॉटर्स'च्या सातव्या आणि पुण्यातील दुसऱ्या मोठ्या शोरूमचे उद्‌घाटन होते. 'मायलेक बँड' धडाक्यात चालला होता. उद्‌घाटनाला नामांकित मंडळी उपस्थित होती. गाथाच्या मदतीला आता रिद्धी आणि सिद्धी या तिच्या दोन्ही मुलीही होत्या.

सध्याचा एथनिक ट्रेंड पाहता त्या तिघीही मायलेकी वेगळ्या पद्धतीच्या नऊवारीत सजल्या होत्या. रेशमी सळसळते वस्त्र, मोजकेच ठसठशीत जुन्या पद्धतीचे अलंकार, चेहऱ्यावर माफक दर्जेदार प्रसाधन, सोज्वळ सात्त्विक आरस्पानी चेहरा असलेल्या तिघीही उठून दिसत होत्या. गाथा जराशी टेकली आणि तिने डोळे मिटले. तिचा भूतकाळ जणू एखाद्या चित्रपटाप्रमाणे सरकू लागला; डोळ्यापुढे धुके पसरले. तेवढ्यातच सिद्धी धावत आली, ''आई, तुझ्या डोळ्यात पाणी? नको ना आठवू जुने दिवस.'' तिला आठवले विठोबा आणि रखमा हे वारकरी पंथातील तिचे आई-वडील. गळ्यात तुळशीमाळ, वारकऱ्याचा भक्तिभाव, कष्टकरी स्वभाव, सर्व कामे मनोभावे करणार. गाथा त्यांची एकुलती एक मुलगी. मराठमोळं खानदानी व्यक्तिमत्त्व, निमगोरा वर्ण, भावपूर्ण डोळे, सुबक बांधा, दाट केस आणि चेहऱ्यावर नितांत सोज्वळ भाव. किंचित अबोल, पण जणू नजरेनेच सर्व बोलणारी. आपल्या माई- अण्णांना सतत मदत करणारी गाथा जणू विठोबा आणि रखमेची लाडुली!

गाथाची वेशभूषा-केशभूषा सारेच अस्सल मराठी, काठापदराची सुती साडी, लांब बाह्यांचे ब्लाऊज, केसांचा एक लांब शेपटा, कानात बुगडी, गळ्यात बारीकशी जोंधळी पोत, नीटनेटका घेतलेला पदर आणि चेहऱ्यावरचे नितळ भाव. कधी कधी तिच्या दाट केसात मोगऱ्याचा गजरा असे, तेव्हा तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी बघत राहावेसे वाटे... तिच्या वागण्या- बोलण्यातले मार्दव बघून साऱ्या वडगावला तिचा अभिमान वाटत असे. गाथा आता गावातल्या कॉलेजमधून पदवीचे शिक्षण घेत होती. कॉलेजचे स्नेहसंमेलन; त्यात मुंबईच्या प्रमुख पाहुण्या आल्या. त्यांनी गाथाला पाहिले... पाहतच राहिल्या आणि विचारले,

''तुम्हाला आवडेल का आमच्या पारंपरिक वस्त्रांची जाहिरात करायला? आमची खूप मोठी शोरूम आहे. तिथे पारंपरिक कपडे व त्यावर शोभतील असे दागिने यांची जाहिरात करायला तुमचा चेहरा व एकूणच व्यक्तिमत्त्व साजेसे आहे. तुम्हाला आम्ही थोडे दिवस ट्रेनिंग देऊ, त्यानंतर तुम्हाला आमच्याकडे काम करता येईल.'' तिचे मायबाप फार शिकलेले नसले, तरी अनुभवाचे शहाणपण पुरेपूर असलेले होते. आपल्या एकुलत्या एक जेमतेम २० वर्षांच्या लेकीला मुंबईला पाठवायला त्यांचा जीव धजेना. तिथे कुठे आपली लेक डगमगली किंवा तिला भुरळ पडली तर... त्यांनी सरळ नकार दिला. कॉलेजच्या प्रिन्सिपॉल बाई आणि प्रमुख पाहुण्या राजसी मॅडम त्यांच्या घरी आल्या, समजूत घालायला. ''हे बघा अण्णा, तुमची काळजी कळते, पण सगळंच काही वाईट नसतं. योग्य वेळी जर योग्य ठिकाणी संधी मिळाली तर गाथासाठी यशाचं एक मोठं दालन खुलं होईल. तिथे कसे पदार्पण करायचे? काय शिकायचे याचे रीतसर शिक्षण देणार आहेत आमची मंडळी! तुमची लेक तुमचे नाव मोठे करणार. तिच्या राहण्याची व्यवस्था मी करेन...'' राजसी मॅडम म्हणाल्या. कसेबसे तयार झाले अण्णा आणि माई. पुढल्या गोष्टी भराभर घडल्या. राजसी मोहिते पाटील यांचे घर म्हणजे जुन्या आणि नवीन दोन्हीचा सुरेख संगम. शिक्षणाचे महत्त्व तसेच जुन्या मूल्याधिष्ठित संस्कारांचे वर्तन, रीतीरिवाज व परंपरांचा सुंदर मेळ. मुंबईची गर्दी, धावपळ घड्याळाच्या काट्यावर चालणारे आयुष्य आणि वडगावचे ते शांत रम्य वातावरण. गाथा थोडी बावरली, घाबरली आणि चिंतित झाली. आता तिला स्वतःला मार्ग निश्चित करीत चालायचे होते. आयुष्याचे एक नवीन दालन उघडणार होते, अगदी अनोळखी असे. गाथा हळूहळू सरावली आणि सहजपणे त्या महानगरीत वावरू लागली. तिचे ट्रेनिंग संपले. आता ती राजसी मॅडमकडे काम करू लागली... मोठ्या शोरूममधले सुंदर पारंपरिक वस्त्र, हातमागावरील रेशमी कलात्मक वस्त्र आणि पेशवेकालीन दागिने लेवून गाथा जणू सौंदर्याची खाण दिसत असे. तल्लख बुद्धी आणि लावण्य या दोन्हींचा अपूर्व संगम होता गाथा. मोठे कार्यक्रम आणि उद्‌घाटन समारंभ असले की गाथाला तिथे हमखास निमंत्रण असे. प्रताप म्हणजे खानदानी देखणा गडी. चेहऱ्यावर बेफिकीर भाव, राजसी मॅडमचा सुपुत्र. शिक्षण संपवून मायदेशी परतला, एका मोठ्या बिझनेस स्कूलमधून पदवी घेऊन. राजसी मॅडमने ओळख करून दिली,

''प्रताप, ही गाथा.'' ''अच्छा... हीच का ती? तू नेहमी सांगत असतेस तिच्याबद्दल फोनवर, हिच्या बरोबर मला फोटो शूट करायचे आहे ना आपल्या नवीन ब्रँडचे?'' त्याने विचारले. ''हो...'' मॅडम म्हणाल्या. राजसी मॅडमने एका दिमाखदार सोहळ्यासाठी दोघांना पारंपरिक वेशात फोटोशूटसाठी तयार केले आणि काय आश्चर्य, प्रताप आणि गाथाची जोडी जाहिरातीच्या जगात अनुपम ठरली. समाज माध्यमांवर त्यांच्या जोडीचे फोटो झळकू लागले. गाथाच्या मनात प्रतापविषयी सुरुवातीला कोणत्याही विशेष भावना नव्हत्याच; मात्र प्रतापच्या मनात तिच्या एकूण सौंदर्याचा, वागण्या-बोलण्यातील मार्दव, कामातील सुसूत्रता या साऱ्याचा प्रभाव पडत होता. एकमेकांच्या सहवासाचे हलकेसे आकर्षण वाटू लागले होते. प्रतापने गाथाला मागणी घातली......आणि एका सुमुहूर्तावर आपली गाथा... सौ. गाथा प्रताप मोहिते पाटील झाली. शाही विवाह, मोठा थाट. लक्ष्मीनारायणासारखी जोडी. मुंबईसारख्या महानगरीमध्ये चर्चेला उधाण आले. खरं तर तिचे असे काम करणे मनापासून पसंत नव्हतेच त्याला. पण... कालचक्र आपल्या गतीने फिरत राहिले. गाथाला नवनवीन कल्पना सुचू लागल्या. आता तर ती राष्ट्रीय पातळीवर काम करू लागली. तिची कामाची-व्यवहाराची पद्धत, सचोटी पाहून तिच्याकडे लोक सहज आकृष्ट होत. कहाणी इथपर्यंत परीकथेसारखी छान चाललेली होती. मात्र, अचानक एक भयंकर आघात झाला. परदेशाहून येताना राजसी मॅडमच्या विमानाला जबरदस्त अपघात झाला आणि त्यात त्यांचं निधन झालं. गाथा आणि प्रतापवर दुःखाचा डोंगरच कोसळला. दुःखाचे सावट थोडे कमी झाले होते; कारण गाथा आता आई होणार होती. ती आपल्या कामावर रुजू झाली. मात्र प्रतापचे लक्षण काही ठीक दिसेना. तो हळूहळू वाहवत चालला. त्यात त्याला पिण्याची सवय लागली.

गाथा त्याला सांभाळण्याचा अतोनात प्रयत्न करी; मात्र ती निष्फळ ठरे. यथावकाश गाथाला जुळ्या मुली झाल्या. गोड, सुंदर, कुरळ्या केसांच्या. ती सुखावली. रिद्धी आणि सिद्धीभोवती ती आनंदाने फिरू लागली. आता संघर्ष वाढला. स्वतःचे काम, अत्यंत बेजबाबदार असा सहचर आणि दोन लहान मुली. मुली, त्यातही जुळ्या झाल्यामुळे प्रताप आणखी बिथरला. त्याला वंशाचा दिवा हवा होता. आता तर त्याने ताळतंत्र सोडला होता. पिण्याचे प्रमाणही वाढत चालले होते. गाथा आपल्या मुलींना एका मदतनीसाच्या साहाय्याने घरी ठेवून काम सुरू ठेवण्याची धडपड करीत होती. मुली मोठ्या होत होत्या. त्यांनाही आपल्या बाबाचे बेताल वागणे दिसत होते. एक दिवस प्रताप नशेत घरी आला. त्याने मुलींसमोर एक मोठी बाटली उघडली आणि मुलींना सांगितले, ''जा ग्लास घेऊन या...'' त्या दिवशी मात्र कडेलोट झाला गाथाच्या सहनशक्तीचा. तिने निक्षून सांगितले, ''आता यापुढे आपण एकत्र राहणार नाही. मी घरातल्या वरच्या मजल्यावर राहीन, मुलींना घेऊन!'' गाथाचा संघर्ष अत्यंत कठीण होता. दोन लहान मुली, त्यांची आजारपणं, मोठे होणे, शाळा, एक ना दोन; मात्र तिने हिंमत हारली नाही. (पान ६ वर)

# एकांताचे सुख जडले जिव्हारी, वीट परिचारी बरा आला

संत

प्रकाश एदलाबादकर

उज्जयिनीचा मुक्काम अजून संपला नव्हता. महेश्वरला गेल्याशिवाय कसा बरे संपेल? माळव्यातील थंडीचा अनुभव घेत माता नर्मदेच्या किनाऱ्यावर आलो.घाटाच्या पायऱ्यांवर बसलो. शांत वातावरण. पक्षी घरट्याकडे जात होते. सूर्यास्तापूर्वीचा साधारण सव्वा-एक तास. आकाशातील ढगांवर लाली पसरली असली, तरी त्यांच्या पांढऱ्या-रुपेरी कडा शिल्लक होत्या. वाऱ्याची हलकी झुळूक आणि त्यामुळे होणारी झाडांच्या पानांची सळसळ हलकेच कानावर पडत होती. अत्यंत नीरव पण प्रसन्न शांतता. समोर महेश्वरच्या नर्मदेचे एका लयीत वाहणारे प्रौढ, प्रगल्भ, प्रसन्न आणि विस्तीर्ण पात्र. तिचा लाटांचा हलकेच होणारा नाद हा पानांच्या सळसळीत मिसळून जात होता.

अनाहताचा नाद असाच असतो का? घाटाच्या अगदी शेवटच्या पायरीवर बसून नर्मदेच्या प्रवाहाकडे स्थिरचित्त होऊन बघता बघता, आपलेच अस्तित्व हळूहळू विरत जात असल्याची जाणीव होत होती. पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी निर्मिलेल्या राजराजेश्वराच्या मंदिराचा प्राकार पाठीशी होता. अशी ही कातरवेळ म्हणजेच शंभुनाथाची वेळ. हा एकांत हवाहवासा वाटत होता. रेवामाईच्या लाटांवर हळूहळू अंधाराची साय पसरत चालली. हे क्षण संपूच नये, असे वाटत असतानाच, हिची हाक आली, ''अहो किती वेळ असे बसणार आहात? सगळे वाट बघताहेत तिकडे. घरी परतायची वेळ झाली आहे.'' मी भानावर आलो. कुठून कुठून फिरून आलो होतो मी त्या एकांतात! जड पावलांनी घाटाची एकेक पायरी चढताना मला शायर कतिल शिफाईच्या ओळी आठवल्या...

**'बज्म-ए-अंजुम से नजर घूम के लौट आई है**
**फिर वहीं मैं हूँ, वही आलमे तनहाई है**
**क्या तमाशा है कि आप अपना तमाशाई है**
**मेरा एहसास है या लाला-ए-सहराई है'**


त्या काही क्षणाच्या एकांतात मी अख्ख्या तारांगणाचा प्रवास करून आलो. भानावर आलो तेव्हा पुन्हा मी आणि माझी वेदना तळमळ सोबत होतीच; पण तो अनुभव अविस्मरणीय होता. रखरखलेल्या वाळवंटात दृष्टीला पडलेल्या एखाद्या आर्द्र-हरित स्थानासारखा! आपल्या प्रपंचाचे वाळवंट करायचे की त्याची बाग फुलवायची, हे ज्याच्या त्याच्या कर्तृत्वावर आणि काहीसे प्रारब्धावर अवलंबून असते, असे मानले जाते. कसेही असले, तरी आपल्यासारख्या सामान्य साधकाला इतके टक्क-टोणपे खावे लागतात की, कुठेतरी एकांतात बसून अंतरंगात डोकवावेसे वाटते. उदासपणाची एक विचित्र छाया अवघ्या व्यक्तिमत्त्वावर साकळते. समर्थांचाच शब्दात सांगायचे झाले तर...

**'घरे सुंदरे सौख्य नाना परीचे । परी कोण जाणेल ते अंतरीचे ।**
**मनी आठवीतांची तो कंठ दाटे ।**
**उदासीन हा काळ कोठे न कंठे ।।**
**बळे लाविता चित्त कोठे जडेना ।**
**समाधान ते काही केल्या घडेना ।**
**नव्हे धीर नैनी सदा नीर लोटे । उदासीन हा काळ कोठे न कंठे ।।'**

परंतु, ही उदासीनताच समर्थांच्या कार्याला प्रेरक ठरली.

एकांतात बसून 'चिंता करितो विश्वाची' असे म्हणणारा हा राष्ट्रगुरू, केवळ चिंताच नाही करीत बसला. विश्वकल्याणाच्या वाटा शोधायला बाहेर पडला. एकांतात बसून अंतर्यामी डोळसपणे पाहिले तर आपल्यालाही अशा प्रपंच कल्याणाच्या वाटा शोधता येऊ नये? नक्कीच येतील, परंतु अंतर्मुख होऊन, चित्त एकाग्र करून, सर्व वृत्तींचा लोप करून, आपले अस्तित्व 'त्या'च्या ठायी क्षणभर तरी विसर्जित करून बघा. काळ्या ढगांनी आक्रमिलेल्या आभाळात केवळ आणि केवळ निमिषमात्र चकाकून जाणारी वीज अवघे विश्व उजळून टाकते, तशी अंधारलेल्या मनाला उजळून टाकणारी आत्मतेजाची वीज निमिषमात्र चकाकते. तो क्षण साफल्याचा, साक्षात्काराचा! उदासीनता याचा अर्थ प्रपंचाविषयी, व्यवहाराविषयी अलिप्तता. ही अलिप्तता मग आत्मचिंतनाला उद्युक्त करते... असा एकांत अभ्यासाला आणि स्वात्मसाधनेला अत्यंत अनुकूल ठरतो. मानवी वृत्ती विरागी बनते. आपल्यातील देवत्व जागे होते. प्रेमळपणाचा पाझर फुटतो. हा एकांतच माणसाचा सखा होतो, स्वतःला समजून घेण्याची योग्यता अंगी येते. जगद्गुरू संत तुकोबारायांनीदेखील एकांतवासाला महत्त्व दिलेले आहे.

एकान्तावाचून परमार्थ मुरत नाही आणि वृत्ती निवळत नाही. स्वतःच स्वतःशी संवाद साधता येतो. तुकोबाराय म्हणतात...



**'खेळों मनासवे जिवाच्या संवादे। कौतुके विनोदें निरंजनी।।**
**पची पडिले ते रुचे वेळोवेळा। होतसे डोहळा आवडीसी।।**
**एकांताचे सुख जडले जिव्हारी। वीट परिचारी बरा आला।।**
**जगाऐसी बुद्धी नव्हे आता कदा। लंपट गोविंदा झालो पायी।।**
**आणिक ते चिंता नलगे करावी। नित्य नित्य नवी आवडी हे।।**
**तुका म्हणे धडा राहिला पडोन। पांडुरंगी मन विसावले ।।'**

एकांताचे सुख जिव्हारी जडले, असे तुकोबाराय म्हणतात. आपल्यालाही असे सुख प्रयत्नपूर्वक मिळवावे लागते. मनाच्या सर्व उपाधी नष्ट होऊन मन एकचित्त होते. तुकोबाराय म्हणतात, या एकांतवासात मला कसलीही चिंता वाटत नाही.

आपणही अशा एकान्तवासाची सवय लावली पाहिजे. आपण तसे प्रापंचिक आहोत. एकदम असा सर्वसंग परित्याग करून आपल्याला अरण्यवास करता येत नसतो. परंतु प्रपंचातही असा एकांत शोधला तर आपलीच आपल्याला नव्याने ओळख होते. आपल्या समोर उभ्या राहणाऱ्या प्रापंचिक आणि व्यावहारिक समस्या सोडविण्याचे धैर्य येते.

मनाची निर्लेपता येते. यासाठीच संतांनी नामस्मरणाची महती सांगितली आहे. येथे आठवण येते ती जनाबाईची. नामयाची जनी म्हणजे एकांत नामसाधनेचा सर्वोच्च आदर्श आहे. ही नामसाधना जपाची नसे, ती अभंगांची असे. आपण गात असताना प्रत्यक्ष पांडुरंग आपल्या सोबत गातो, ही तिची नुसती श्रद्धा नव्हती तर तिचा विश्वास होता.

**'एकलीच गाणे गासी । दुजा शब्द उमटे पाशीं ।**
**कोण गे तुझ्या बरोबरी । गाणे गाती निरंतरी ।।'**

दुःखाचे ओझे मनावर लादून एकट्यात बसणे वेगळे आणि मन निर्लेप करून एकांतात राहणे वेगळे! हा खरा एकांत. लोकांतात राहूनही साधलेला. या अवकाशात आपण आपले असतो. आपल्याला हवे तसे असतो. जाणीव आणि नेणीव पातळीवर सहजपणे वावरत असतो. आपल्याच मनाशी जवळीक साधून बोलतो. या साऱ्या धबडग्यात कुणीतरी आपल्या पाठीवरून हात फिरवून धीर द्यावा असे वाटते ना? मग तो हात या एकांतातच मिळतो. उदासीनता हीच एकांताची जननी असते. आपल्या उदासीला सूर सापडतो, तिच्या स्वरांना लय मिळते ती मात्र अंतर्मुखतेने. आपल्या जगण्याचा अर्थ उमगतो. आपल्याच एकलेपणाशी एकरूपता साधण्याची ही साधना जमली पाहिजे. मग आपलेही एकांत-गीत श्रेष्ठ आनंदाचा प्रत्यय देते. काय हवे आणि काय नकोची निवड करता येते. त्या दिवशी नर्मदेच्या काठावर बसलो असतानाही मला ग्रेसच्या एका कवितेच्या काही ओळी स्मरल्या...

**'गंगे गंगे जान्हवी गे, माझे पाय ओढून घे**
**तुझ्या खोल डोहामधली एक भूल मला दे**
**गंगे गंगे जान्हवी गे माझ्या कळ्या विखरून टाक**
**पाठीमागे सूर्य गेला तरी नाही माझी हाक**
**गंगे गंगे जान्हवी गे पैलतीरावर काय**
**उतू गेल्या दुधावरची मला नको साय...'**

प्रबंधांची बीजे

श्रीरंग हिर्लेकर



# गुरुकुलातील शिक्षण

भारतीयांविषयी एक आक्षेप नेहमी घेतला जातो की, ते भौतिक ज्ञानापेक्षा अध्यात्माला प्राधान्य देतात. आपण अपेक्षाविरहित कर्म, मृत्यूनंतरचे काल्पनिक अस्तित्व, पुनर्जन्म, पापपुण्याच्या भ्रामक कल्पना, सहिष्णुता, नीती, धर्म, न्याय, आत्म साक्षात्कार या सर्वांच्या अतिरेकी विचाराने व्यवहार विसरतो. प्राप्त भोग स्वीकारून पुरुषार्थ दुर्लक्षित करतो. दैववादाच्या कल्पनेमुळे निष्क्रियता बळावून-

'ठेविले अनंत तैसचि रहावे।
चित्ती असावे समाधान।'

हेच जणू आपले धोरण आहे. मध्ययुगीन इतिहासाकडे बघितल्यावर आपण पूर्वीपासून असेच आहोत, असा भास होतो. हे सर्व आक्षेप आपली जीवनमूल्ये समजून न घेतल्यामुळे असतात. आपली धर्मकल्पना नैतिकतेवर आधारित आहे. भीष्म युधिष्ठिराला सांगतात...

'न राज्यं न राजासीत्,
न दण्डो न च दाण्डिकः
धर्मेणैव स्वयमेव प्रजाः
सर्वा रक्षन्ति स्म परस्परम्।'

फार पूर्वी कोणताही कायदा, नीती, नियम, राजा, राज्यव्यवस्था अस्तित्वात नव्हती आणि तरी सर्व लोक सम जुतीने, परस्पर सामंजस्य व सहकार्याने वागत असत. कालांतराने धर्म आणि राज्यव्यवस्था निर्माण झाली.

तीसुद्धा 'नास्ति सत्यात् परो धर्मः।' याच तत्त्वावर. ब्रह्मरूप समाजाच्या धारणेसाठी क्षत्रीयांचे शासन, व्यवहारासाठी वैश्य आणि समाजोपयागी सेवांसाठी शूद्र याप्रमाणे वर्गीकरण करून या व्यवस्थेच्या नियमनासाठी-

'धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः। धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणः।'

अशा दशलक्षणी धर्माला प्रतिष्ठा प्राप्त झाली. धर्माची लक्षणे सांगताना-

'जगतःस्थितिकारणम्
साक्षात् अभ्युदयनिः
श्रेयसहेतुःस धर्मः।'

म्हणजे इह आणि परलोकी कल्याणाचे मार्गदर्शन करतो तो धर्म असे म्हटले. इहलोकी कल्याण करावयाचे तर अर्थप्राप्ती आणि काम यांचे महत्त्व नाकारता येत नाही. मनुष्याला शारीरिक आणि मानसिक गरजा असण्यात अनैसर्गिक काही नाही. तेव्हा त्यांना त्याज्य न मानता संयमित भोगाला पुरुषार्थ म्हणून गौरविले गेले. जीवनातील काही काळ तरी अर्थ आणि काम ही जोडी साधनासोबत साध्यही आहेत. पण हे करताना अलिकडे धर्म आणि पलीकडे मोक्ष ही या दोन बिंदूंचे भान ठेवत अर्थप्राप्ती आणि विविध सुखोपभोगांच्या साधनेसाठी भौतिक शिक्षणाची आवश्यकता आहे.

चार पुरुषार्थाप्रमाणेच चार आश्रमांची व्यवस्था करण्यात आली. यातही ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि शेवटी संन्यासाश्रम असाच विशिष्ट क्रम निर्माण झाला. स्वतःसोबतच समाजालाही पोषक व उपयुक्त अशा भावी आयुष्याची उभारणी ज्यावर अवलंबून आहे तो ब्रह्मचर्याश्रम फार महत्त्वाचा आहे. अनुशासन असेल तरच शरीर, बुद्धी आणि मन उन्नत होईल. आपण तेजोपासक आहोत. भा म्हणजे तेज आणि त्यात रत, अशी भारत शब्दाची व्याख्या आहे. म्हणून या काळातील पूजन कोणाचे करावे तर अग्नीचे आणि प्रार्थना करावयाची तर ती 'अग्ने नया सुपथा राये अस्मान्' अशी. पसायदान काय मागावयाचे तर 'तमसो मा ज्योतिर्गमय' किंवा 'सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो' आणि गायत्रीची प्रार्थना कशी तर 'कलंक मतीचा झडो' आम्हाला ब्रह्मवर्चस्व प्राप्त होवो.

**उद्देश:** आपला जन्म होतो त्या घराण्याचे पितृऋण वंशसातत्य कायम ठेवून आपल्याला चुकवायचे असते, ज्या संस्कृतीत आपण जन्म घेतो, वाढतो तिचे देवऋण, ज्ञान, विद्या आणि कला मिळवतो ते ऋषिऋण अशा काही जबाबदाऱ्या आपल्यावर असतात. त्यातून मुक्त होण्यासाठी बलवान, शील आणि चारित्र्यसंपन्न, कर्तव्यदक्ष, सत् विचारी आणि आचारी असा आदर्श नागरिक होण्यासाठी ब्रह्मचर्याश्रमातील भौतिक विद्याग्रहणाचे महत्त्व आहे. याप्रकारे शारीरिक आणि मानसिक बलोपासना करून आपण मिळवू ते विद्याधन कसे तर- 'सा विद्या या विमुक्तये।'

ब्रह्मचर्याश्रमात आपल्या आवड आणि क्षमतेनुसार कोणाच्या सान्निध्यात जीवनोपयोगी शिक्षण घ्यावयाचे तर ते 'आदानं हि विसर्गाय' अशी ज्यांची निःस्पृहता, त्या ज्ञान, शील, वैराग्यसंपन्न, तपःपुनीत आयुष्य आचरणाऱ्या आचार्यांजवळ आणि तेही आणि 'शिष्यस्तेऽहं शाधी मां त्वा प्रपन्नम्' अशा श्रद्धेने. आचार्य म्हणजे 'आचिनोति स आचार्यः' म्हणजे स्वतः आचरण करेल तो आचार्य. अशा आचार्यांप्रति समाज आणि राजसत्तेलाही आदरच होता.

आचार्यांची भेट घ्यावयाची तर राजाने स्वतः त्यांच्याकडे जायचे. आश्रमाजवळ येताच तेथील शांतता बिघडू नये म्हणून दुष्यंत राजा आपला लवाजमा लांब अंतरावरच ठेवून प्रवेश करीत असल्याचा उल्लेख शाकुंतलात आहे.

**गुरुकुल:** म्हणजे निवासी विद्यापीठ. असमान आर्थिक, सामाजिक, प्रतिष्ठित, शैक्षणिक परिस्थितीतून आलेले कमी-जास्त वयाचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनीसुद्धा या ठिकाणी सहभावाने राहत. येथील अनौपचारिक वातावरणात त्यांना भावी आयुष्याचे पाठ मिळत. ४ वेद, ६ शास्त्रे, १४ विद्या, जीवनोपयोगी ६४ कला यात पारंगत असे अनेक अध्यापक निसर्गाच्या सान्निध्यात ज्ञानोपासकांवर ज्ञानाचा अखंड विसर्ग करण्यास तत्पर असत. आधुनिक काळातील शांतिनिकेतनाच्या उदाहरणावरून याची किंचित कल्पना येईल. सातत्याने विद्वत्सभा व ज्ञानसत्रांचे आयोजन होई. वसिष्ठ, शाकुंतलातील कण्व, धौम्य, सांदीपनी यांची गुरुकुले सर्वांना माहीत आहेत.

**आचार्य कुल पुत्र प्रायपरिजन परिवार:** गुरुशिष्यांतील नाते पितापुत्रसमान असे. ते आईच्या ममतेने आणि बापाच्या शिस्तीने शिष्यांवर संस्कार करत त्यांचा सांभाळ करीत. यामुळे ज्याला आपले गोत्र ठाऊक नाही तो आचार्यांचे गोत्रनाम धारण करत असे. ज्येष्ठ शिष्य कनिष्ठांना थोरल्या भावासारखे वाटत. म्हणूनच अशा आश्रमांचे वर्णन बाण कवीने आचार्यपरिवार असे केले आहे. राजपुत्र असो की, सामान्य नागरिकाचा पुत्र, सर्वांना समान वागणूक व समान शिक्षण मिळे. यातूनच भावी काळातील कृष्ण आणि सुदामा तयार होतात. सर्वांना घरच्यासारखी आश्रमातील सर्व कामे करावी लागत.

'सुखार्थिनः कुतो विद्या,
कुतो विद्यार्थिनः सुखम्।'

निसर्गाच्या सान्निध्यात सत्याच्या शोधात, वेदांच्या ऋचा आणि उपनिषदांच्या पठन-चिंतनात पारलौकिकांसोबत लौकिक विषयही अभ्यासिले जात. पुस्तकी पंडित निर्माण करण्यासाठी नसून गृहस्थाश्रम ातील योगक्षेमासाठी विद्या शिकवल्या जात असत. अध्यात्मविद्या विद्यानाम् हे तर खरेच, त्यासाठी वेदादिकांचे अध्ययन होत असे आणि त्यासोबत समाजधारणेसाठी सर्व प्रकारच्या लौकिक शिक्षणाची उत्तम व्यवस्था असे.

शिक्षणाच्या या विद्यापीठांना राजाश्रय असला, तरी राजसत्ता शिक्षणात व तेथील व्यवस्थेत ढवळाढवळ करीत नसे. खऱ्या अर्थाने ही विद्यापीठे स्वायत्त होती. इतकेच नव्हे, तर राजा चुकला तर त्याचा कान धरायला आचार्य मागेपुढे बघत नसत. शिक्षकांनी कसे शिकवावे यासाठी आज जसे बीएड, डीएड हे अभ्यासक्रम आहेत तसे त्याकाळी आचार्य विद्या हाही विषय असे. विद्यादान कोणाला करावे यासंबंधीही संकेत होते. अशिष्याय न देयं, हा अथर्वशीर्षातील संकेत सर्वत्र पाळल्या जात असे.

बौद्धिक विकासासाठी श्रवण, निरीक्षण, शिकलेल्या भागाचे आकलन, स्मरण, योजना म्हणजे ॲप्लिकेशन, प्रसंगानुरूप निर्णयक्षमता या सर्वांचा अंतर्भाव शिक्षणात असे. श्रवण, पठन, मनन, संवाद, चर्चा,

(पान ६ वर)

**ब्रिटिशांनी भारतमातेला पारतंत्र्याच्या साखळदंडात कैद केले आणि हे साखळदंड तोंडण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी शर्थीने प्रयत्न केले. या पारतंत्र्याच्या काळात भारतीयांची सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक एवढेच काय तर बऱ्याच प्रमाणात भाषिक सुद्धा; अशी सर्व साधने ज्यामधून भारतीयांचा वैभवशाली इतिहास संगळ्यांसामोर येईल ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नजर कैदेत किंवा बंद कुलूपात धुळखात पडली होती. त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. तसे झाले नसते तर आपला सत्य इतिहास समोर आलाच नसता व युरोपीयन लोकांनी लिहिलेला साम्राज्यवादी पूर्वग्रह दूषित इतिहास आपल्या अनेक पिढ्यांना शिकवला गेला असता त्याच बरोबर आपले भाषाविज्ञान, आयुर्वेद, महान व्यक्तिमत्वे, राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, कला, विज्ञान, गणित या सर्वांचा विसर आपल्याला पडला असता. परंतु असे घडू न देण्याचा ठाम निश्चय त्या काळच्या जाणत्या नेतृत्वाने केला आणि त्यासाठीचे बैठक सत्र सुरू करून काही विद्वान युवा व तरुण यांना प्रेरित करण्याचा धडाका महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर अशा जाणत्यांनी चालविला. अशा सुरुवातीच्या क्रांतिकारी इतिहास संशोकांच्या यादीत पहिले नाव घेता येईल ते रावबहादूर दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचे.**

प्रासंगिक

श्रीकांत जोशी
भ्र. ७३९७९२६७००

# क्रांतिकारी इतिहास संशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस



न्या. महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर ते स्वतः उत्तम लेखक व संशोधक होते. परंतु त्यांनी ज्याप्रमाणे आद्यक्रांतिगुरु लहुजीवस्ताद साळवी यांनी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात आखाडे व तालिम चालवून वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक यांच्या सारखे कसलेले पैलवान नेतृत्व तयार केले तसाच काहीसा प्रकार त्याच जुलमी सत्तेच्या विरोधात वरील नेतृत्वाने बौद्धिक क्षेत्रात केला. त्यांनी मांडलेल्या बैठक शृंखिला या एक प्रकारे ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात बौद्धिक पैलवान निर्माण करणारे आखाडेच होत्या. अशा सुरुवातीच्या क्रांतिकारी इतिहास संशोकांच्या यादीत पहिले नाव घेता येईल ते रावबहादूर दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचे. त्यांनी प्रयत्नपूर्वक महादेव गोविंद रानडे यांच्या सहाय्याने पुण्याच्या पेशवे दप्तरात कैद असलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांना ब्रिटिशांच्या नजरकैदेतून मुक्त करण्याचा धडाका लावला. अनेक कागदपत्रे अभ्यासून त्यांना मोडीतून देवनागरी लिपीत आणली व पुण्याच्या डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी द्वारे प्रसिद्ध केली. अठराव्या शतकाच्या मराठी सत्तेच्या व भारताच्या इतिहास लेखनासाठी ही कागदपत्रे अभ्यासकांना खूपच महत्वाची ठरली. ती कागदपत्रे 'वाड डायरी' या नावाने सुद्धा ओळखली जातात.

दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचा जन्म २७ नोव्हेंबर १८७० रोजी सातारा जिल्ह्यातील बोरगाव या गावी झाला. त्यांच्या लेखनाच्या, वाचनाच्या आणि इतिहासाच्या छंदामुळे शालेय जीवन संपल्यावर महाविद्यालयीन जीवनाला राम राम ठोकावा लागला. त्यांनी वयाच्या सतराव्या वर्षी 'सुभाष्य चंद्रिका' नावाचे पहिले हस्तलिखित मासिक काढले. १८८९ साली त्यांच्या 'महाराष्ट्र कोकीळ' या मासिकाने तर त्यांचे जीवनच बदलून टाकले. या मासिकाने त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. याच काळात त्यांनी 'किर्तीमंदिर' नावाचे पुस्तक लिहिले. १८९१ साली पारसनीस यांचा परिचय लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांच्याशी झाला. लोकमान्य टिळकांच्या प्रभावात त्यांनी नागपूर येथील राष्ट्रीय सभेचा वृतान्त 'भारत भाग्योदय व राष्ट्रमहोत्सव' या ठिकाणी लिहिला. १८९२ साली पारसनीस यांचे नाव सर्वोमुखी करून महाराष्ट्र कोकीळ या नियतकालिकाने विश्राम घेतला. १८९३ साली त्यांनी ए. ओ. ह्युम हे पुस्तक लिहिले. ४ नोव्हेंबर १८९४ साली द. ब. पारसनीस यांनी 'झाशीची महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचे चरित्र' हे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकाने त्या काळातील एक महान व्यक्तिमत्व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे प्रभावित झाले आणि त्यांनी पारसनीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर पारसनीस यांनी जो इतिहास संशोधनाचा व लेखनाचा जो उद्योग सुरू केला तो आयुष्यभर टिकला. भारतवर्ष, इतिहास संग्रह ही नियतकालिके पारसनीस यांच्यासाठी मैलाचा दगड ठरली. द. ब. पारसनीस यांनी भारतीय इतिहासाचे सत्यशोधन केले. महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास तर त्यांनी केलेल्या संशोधना शिवाय केलाच जाऊ शकत नाही. १८१८ ते १९२५ या काळात ब्रिटिश अधिकारी किंकेड याच्या सोबत त्यांनी 'हिस्टरी ऑफ द मराठा पिपल' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांनी सातारा येथे शासनाच्या मदतीने एक मोठे वस्तु संग्रहालय स्थापन केले. त्यांनी केसरी, मराठा आणि सुधारक या वृत्तपत्रातून लेखन केले. इतिहास संशोधनात इतिहासलेखनशास्त्राला अनन्य साधारण महत्व आहे. त्यांनी त्या काळात पाश्चात्य जगात चाललेल्या वैचारिक चळवळींचा बारकाईने अभ्यास केला आणि आपली मते परखडपणे मंडळी. त्यांचे अनेक संस्थानिकांशी मैत्रीचे संबंध होते. कोल्हापूरचे राजर्षि शाहू महाराज त्यांचे विशेष स्नेही होते. त्यांचबरोबर ते इंग्लंड वारी सुद्धा करून आले. या प्रवासात त्यांनी अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांशी संपर्क करून इतिहास लेखनाची साधने जमा केली. स्थानिक इतिहासलेखन, स्त्रीवादी इतिहासलेखन, वंचित घटकांच्या इतिहासाचे वर्णन, तत्कालीन राष्ट्रीय चळवळीची माहिती, प्राशासकीय इतिहास, राजघराण्यांचा इतिहास अशा विविध पैलूंचा अभ्यास पारसनीस यांनी केला. बायजाबाई शिंदे, होळकर संस्थान, दिल्ली, महाबळेश्वर, सातारा, ब्रम्हेंद्रस्वामी, उत्तरेतील व दक्षिणेतील अनेक सरदार यांचे चरित्र यांचे लेखन व संपादन असे हजारो पानांचे व लाखों मोडी फारसी कागद पत्रांचे व शेकडो पुरातत्त्वीय साधनांचे संकलन त्यांनी केले.

२६ नोव्हेंबर पारसनीस यांचा जन्म दिवस आहे त्या निमत्ताने त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण महत्वाचे ठरते. त्यांचा मृत्यू ३१ मार्च १९२६ साली झाला. यंदाचे वर्ष हे पारसनीस यांच्या स्मृति दिनाच्या शताब्दीचे वर्ष आहे. पारसनीस हे एक राष्ट्रवादी इतिहास संशोधक होते. राजवाडे, रावबाहदूर रियासतकार सरदेसाई आणि सर जदुनाथ सरकार या संशोधकांच्या समकालीन पारसनीस होते. रावबाहदूर दत्तात्रय बळवंत पारसनीस यांच्या संदर्भात काही महत्वाची तथ्ये जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरावर सावरकर यांचे पुस्तक ज्या काळात प्रसिद्ध झाले त्याच काळात त्याच विषयावरील झाशीच्या राणीचे चरित्र प्रसिद्ध झाले होते. परंतु दोन्हीतील भाव हा देशभक्ती व विषय सुद्धा १८५७ चे स्वातंत्र्य चळवळ असे असूनही स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुस्तकावर बंदी आणली गेली परंतु पारसनीस यांच्या पुस्तकाचा काही भाग मात्र ब्रिटिशांच्या शालेय विभागा मार्फत अभ्यासक्रमात होता. एक प्रकारे पारसनीस यांनी सावरकरांचेच कार्य ब्रिटिशांच्या पोटात शिरून चालवले . क्रांतिकारक सावरकर मात्र उघड उघड त्यांचे शत्रूच होते. दोघांचेही गुरु लोकमान्य टिळक होते.रावबहादूर हा किताब रियासतकार सरदेसाई यांना ही मिळाला होता आणि द.ब. पारसनीस यांना सुद्धा असे आलेतरी राष्ट्रवादी इतिहासकार असूनही सरदेसाई यांनी जेम्स मिलच्या पावलावर पाऊल टाकीत त्यांचा इतिहास लिहिताना धर्म, भाषा, स्थान यांचा वापर करीत इतिहास कालाचे विभाग मराठी, मुसलमानी व ब्रिटिश असे विभाजन केल्याचे दिसते. परंतु पारसनीस यांनी तसे केले नाही तर त्यांनी कायम ब्रिटीशांचे मवाळ भाषेत कान टोचले असे असूनही त्यांच्या बौद्धिक व भाषिक कौशल्याचा; त्यांच्या अंगी असलेल्या इतिहास लेखनशास्त्राच्या पारंगततेचा फायदा हवा असल्या कारणाने त्यांच्याशी व्यवहार केला. भारताचे परराष्ट्र धोरण आखणाऱ्यांनी पारसनीस यांचे धोरण अभ्यासले तर त्याचा त्यांना निश्चितच फायदा होईल. (लेखक डेक्कन एज्युकेशन सोसायटी येथे शिक्षक असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून द. ब. पारसनीस यांची संकलित प्रकाशित व अप्रकाशित ऐतिहासिक साधने, इतिहास संशोधन व लेखनावर संशोधन करीत आहे.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २३ नोव्हेंबर ते शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✼ **रविवार, ३० नोव्हेंबर-** कृष्णा नदी उत्सव सांगली, श्री महालक्ष्मी उत्सव कोकीसरे, मुकुंद महाराज पुण्यतिथी चांदे, विजयदुर्ग जत्रा, केरी ज्योतिर्लिंग भंडारा गारवडे ✼ **सोमवार, १ डिसेंबर-** गीता जयंती, मोक्षदा एकादशी, मौनी एकादशी (जैन), माणिकप्रभू उत्सव हुमणाबाद, जागतिक एड्स निर्मूलन दिन, श्री निनादेवी यात्रा कोकरूड ✼ **मंगळवार, २ डिसेंबर-** भौमप्रदोष, राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन, जनार्दनस्वामी (मौनगिरी) पुण्यतिथी बेटकोपरगाव (जि. नगर), भिताडे महाराज पुण्यतिथी भिवडी (पुरंदर) ✼ **बुधवार, ३ डिसेंबर-** जागतिक दिव्यांग दिन, महाराजा यशवंतराव होळकर जयंती, देव ब्राह्मण जत्रा आकेरी ✼ **गुरुवार, ४ डिसेंबर-** श्री दत्तात्रेय जयंती, कुलधर्म, आग्रहायणी, श्री यल्लमा देवी यात्रा डोकं बाबळगाव, रेणुका यात्रा सौदंती, गणपती पंचायत संस्थान, अल्लू दत्तात्रेय साखळी रावेर, श्रीधर स्वामी जयंती, श्री योगेश्वरी यात्रा आंबेजोगाई ✼ **शुक्रवार, ५ डिसेंबर-** गणेश यात्रा वारणा कापशी, बाळोबा यात्रा राहू (ता.दौड), भानोबा यात्रा कुसेगाव (ता. दौड), यल्लमादेवी यात्रा मानेगाव (ता. सांगोला) ✼ **शनिवार, ६ डिसेंबर-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, क्रांतिसिंह नाना पाटील पुण्यदिन, यल्लमादेवी यात्रा कमलापूर, श्री हरभटशास्त्री पुण्यतिथी गणपतीपुळे.

**मुहूर्तः-** ✼ **साखरपुडा-** ३० नोव्हेंबर, २, ५ डिसेंबर ✼ डोहाळ जेवण- २, ५ डिसेंबर (१२ नंतर) ✼ **बारसे-** ३० नोव्हेंबर, ✼ **जावळ-** ९ सप्टेंबर, २ डिसेंबर ✼ **गृहप्रवेश-** ३० नोव्हेंबर, ५ डिसेंबर

### मेष :- स्थावर प्रश्न मार्गी

भाग्येश, व्ययेश गुरु शुक्रवारी रौप्य पादाने तृत्तीयात येत आहे. फल शुभ आहे. शनिवारचा बुध- गुरु त्रिकोण योगही आर्थिकदृष्ट्या लाभदायक आहे. योजलेली कामे मनासारखी होतील. प्रारंभात कौटुंबिक जीवनात सौख्यदायी घटना घडतील. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. भुलथापांना बळी पडू नका. शुभ ता. २, ५

### वृषभः- अपेक्षित घटना घडतील

अष्टमेश, लाभेश गुरु सुवर्णपदाने धनस्थानी येत आहे. फल चिंता आहे. मनातील एखादी चिंता सप्ताह अखेरीस बुध-गुरु त्रिकोण योगामुळे दूर होईल. मनासारखे एखादे काम यशस्वी होईल. स्वमताग्रह टाळावा. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. सप्ताह अखेर विशेष लाभदायक ठरेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ३, ६

### मिथुनः- सुख स्वास्थ लाभेल

सप्तमेश, दशमेश गुरु शुक्रवारी लोहपदाने राशीत येत आहे. फल कष्ट आहे. शनिवारी येणारा बुध- गुरु त्रिकोण योग लाभदायक ठरेल. नव्या कामांना गती मिळेल. सप्ताह अखेरीस एखादे आर्थिक काम मनासारखे होईल. कार्यसिद्धीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. प्रतिकूलतेवर मात कराल. अपेक्षित संधी लाभतील. आनंदी आशादायी रहावे. सुख स्वस्थ लाभेल. शुभ ता. २, ६

### कर्कः- दूरचे प्रवास घडतील

षष्ठेश, भागेश गुरु शुक्रवारी सुवर्णपदाने बारावा होत आहे. फल चिंत आहे. पंचमात रवि मंगळादी ग्रह आहेत. त्यामुळे अचानक धनलाभाच्या नादी लागू नका. गुढशास्त्रात प्रगती होईल. दूरचे प्रवास घडणार आहेत. संततीच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष घालावे. महत्त्वाचे व्यवहार पूर्ण विचारणे करावेत. पूर्वार्धात एखादी घटना मनासारखी होईल. शुभ ता. ३, ६

### सिंहः- आर्थिक स्थितीत सुधारणा

पंचमेश, अष्टमेश गुरु शुक्रवारी ताम्रपदाने लाभस्थानी येत आहे. फल श्रीप्राप्ती आहे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या कामांना गती मिळेल. फार धावपळ करू नका. समस्यातून मार्ग निघत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात चांगली प्रगती करता येईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. शुभ ता. ३०, ३

### कन्याः- अडचणींवर मात कराल

सुखेश, सप्तमेश गुरु शुक्रवारी रौप्यपादाने दशमात येत आहे. फल शुभ आहे. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. उत्साहवर्धक घटना घडतील. कमिशनवर चालणार्या व्यवसायात अनुकूलता वाढेल. भावंडाशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. गायन वादनादि कलेत चांगल्या संधी लाभतील. फार चिंता करू नका. अडचणींवर मात कराल. शुभ ता. ३, ५, ६

### तुलाः- अनावश्यक खर्च

तृत्तीयेश, श्रेष्ठेश गुरु लोहपदाने भाग्यस्थानी येत आहे. फल कष्ट आहे. धनस्थ रवि मंगळामुळे अनावश्यक खर्चाला सामोरे जावे लागेल. बुध, गुरु त्रिकोण व्यवसायात अपेक्षित प्रगती करणारा ठरेल. समस्या आल्या तरी त्यावेळीच सुटल्या जातील. फार चिंता करू नका. घाईने निर्णय घेऊ नका. अपेक्षित कामे चिकाटीने होतील. शुभ ता. ३, ५

### वृश्चिकः- वादाचे प्रसंग टाळावेत

धनेश, पंचमेश गुरु ताम्रपादाने आठवा होत आहे. फल श्रीप्राप्ती आहे. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावेत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. पूर्वार्धात महत्त्वाचे व्यवहार होतील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. वादाचे प्रसंग टाळावेत. विद्या अभ्यासात मंद गतीने प्रगती होईल. गुंतवणूक विचाराने करावी. दगदग टाळावी. शुभ ता. २, ६

### धनुः- आर्थिक समस्या

राशी स्वामी गुरु सुवर्णपदाने सप्तमात येत आहे. फल चिंता आहे. व्ययात रवि-मंगळादी ग्रह आहेत. त्यामुळे आर्थिक समस्या संभवतात. परिश्रमाने कार्यसिद्धी होईल. डोळ्याच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. फार दगदग करू नका. विश्रांतीची गरज भासेल. छोटी साडेसाती चालू आहे. शुभ ता. ५, ६

### मकरः- अडचणींवर मात कराल

तृत्तीयेत व्ययेश गुरु रौप्यपदाने षष्ठात येत आहे. फल शुभ आहे. कार्यक्षेत्रात महत्त्वाचे बदल घडतील. योजलेली कामे मार्गी लागल्याने समाधान लाभेल. धार्मिक कार्य होतील. नव्या योजना साकार करता येतील. अडचणींवर मात कराल. नव्या विचारांना चालना मिळेल. सुसंधी लाभतील. प्रगतीच्या घटना घडतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २, ६


### कुंभः- कष्टाचे चीज होईल

धनेश, लाभेश गुरु लोहपदाने पंचमात येत आहे. फल कष्ट आहे. कर्मस्थ रवि-मंगळामुळे कार्यक्षेत्रात विचाराने रहावे घाईने निर्णय घेऊ नका. यांत्रीक क्षेत्रात प्रगती होईल. शिक्षण अनुभवातून चांगले मार्गक्रमण करू शकाल. अडचणींची फार चिंता करू नका. विनाकारण फार धावपळ करू नका. कष्टाचे चीज होणार आहे. प्रगती घडेल. शुभ ता. ३, ६

### मीनः- समस्यांवर मात

राशी स्वामी गुरु ताम्रपदाने सुखस्थानी येत आहे. फल श्रीप्राप्ती आहे. नोकरी व्यवसायात अनुकूलता राहील. नव्या संधी लाभल्याने समाधान वाटेल. व्यवहार कौशल्यामुळे विविध समस्यांवर मात करू शकाल. सौख्य लाभेल. भाग्यातील बुध-शुक्रामुळे कलागुणांचा विकास होईल. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. गुरुकृपा लाभेल. अपेक्षित प्रगती घडेल. शुभ ता. २, ६

!! शुभ भवतु !!



## दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

नीरा नदीच्या खोऱ्यातील हिरडस मावळ भागात असलेला रोहिडा किल्ला सह्याद्रीच्या डोंगररांगेतील प्रसिद्ध किल्ला आहे. भोरपासून महाबळेश्वरपर्यंतचा नयनरम्य परिसर पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. पुणे जिल्ह्यातील महाबळेश्वर डोंगररांगेत वसलेला रोहिडा सुमारे ३७०० फूट उंचीचा देखणा गिरिदुर्ग आहे. रोहिडा किल्ला भोरच्या दक्षिणेस सुमारे १० किलोमीटर अंतरावर आहे. रोहिड्याला विचित्रगड किंवा बिनीचा किल्ला म्हणूनही ओळखले जाते. नीरा नदीच्या खोऱ्याच्या काही भागात रोहिडेखोरे वसलेले आहे. पुणे आणि सातारा जिल्हा उसाच्या पिकासाठी प्रसिद्ध आहे.

सहकारी साखर कारखाने, दूध योजना यामुळे येथील प्रत्येक गावापर्यंत बस, वीज व इतर सुविधा पोहोचल्या आहेत. भोर, वाई, महाबळेश्वर येथून या परिसरात पोहोचता येतं. मुंबई, पुणे, सातारा किंवा महाड येथून भोर गाठून रोहिड्याला जाण्यासाठी किल्ल्याच्या पायत्त्याशी असलेल्या बाजारवाडी गावात पोहोचावे. गाडीतून उतरल्यावर पश्चिमेकडे तटबंदी आणि बुरुजांनी नटलेला रोहिडा दृष्टीस पडतो. रोहिडा किल्ला खड्या चढणीचा असून येथे फरसबंदी वाटेचे अवशेष दिसून येतात. किल्ल्याला तीन मुख्य दरवाजे आणि एक चोर दरवाजा आहे. सह्याद्रीत पावसाळ्याच्या दिवसात गड चढताना सोबतीला प्रचंड वारा असतो. इतर दिवसातही रोहिडा चढताना वाऱ्याचा वेग अनुभवायला मिळतो. रोहिड्याला बाजारवाडीच्या बाजूने तीन बुरुज आहेत. त्यातील मधल्या बुरुजापासून उतरत येणाऱ्या डोंगरधारेने रोहिडा चढण्यास सुरुवात करावी. थोडे वर गेलात की, अजून एक वाट बाजूच्या हातनुशी गावातून वर येते आणि आपल्या वाटेला येऊन मिळते. थोडं वर चढल्यावर गडाच्या पहिल्या उत्तर दरवाज्यातून गडप्रवेश होतो. दरवाज्यावर मंगलसूचक गणेशपट्टी असल्याने त्याला गणेश दरवाजा म्हणतात. पहिल्या दरवाज्यातून आत गेल्याबरोबर पाण्याचे एक भुयारी टाके आहे. दुसऱ्या दरवाज्यावर दोन्ही बाजूस सिंह आणि शरभ ही यादवकालीन चिन्हे कोरलेली दिसतात. रोहिडा हा यादवकालीन किल्ला आहे, असे दर्शविणारे अनेक चिन्हे गडावर पाहायला मिळतात.

दरवाज्यातून आत गेल्यावर कातळात खोदलेले टाके आहे. या टाक्यात बारमाही थंडगार पाणी उपलब्ध असते. रोहिडा चढायला सुरुवात केल्यापासून साधारण दोन तास चढून गेलात की तिसऱ्या दरवाज्यापाशी आपण पोहोचतो. हा दरवाजा छान सुबक बांधणीचा आहे आणि तोही चांगल्या अवस्थेत ठामपणे उभा आहे. या पूर्वाभिमुख बुलंद दरवाज्याच्या दोहोबाजूंनी गजमुखांची शिल्पे आहेत तसेच एका बाजूस मराठी आणि दुसऱ्या बाजूस फारसी भाषेतील शिलालेख आहेत. १६५६ साली कोरलेल्या या शिलालेखावरून मुहंमद आदिलशहाच्या कारकीर्दीत हा दरवाजा बांधला आणि त्याने गडदुरुस्ती केली, असे अनुमान निघते. शिवाजी महाराजांना रोहिडा स्वराज्यात सामील करायचा होता, पण बांदल देशमुख काही हट्ट सोडीत नव्हते. त्यांचा उद्धटपणा दिवसेंदिवस वाढतच होता. त्यात बाजीप्रभू देशपांडे आणि फुलाजी देशपांडे यांच्यासारखे स्वामिनिष्ठ तसेच पराक्रमी सरदार बांदल देशमुखांच्या साथीला होते. अनेक वेळा निरोप पाठवूनदेखील काही होत नाही, हे पाहून महाराजांनी रात्रीच्या अंधारात रोहिडा गाठला आणि आपले काही मावळे किल्ल्यात घुसविले. त्या मावळ्यांनी पहारेकऱ्यांना फितवून गडाचा दरवाजा उघडला आणि शिवाजी महाराज सैनिकांसह गडावर दाखल झाले. गडाच्या इतक्या कडेकोड बंदोबस्तात शिवाजी आलेच कसे, हे बाजीप्रभूंना कळलेच नाही. हातघाईची लढाई झाली. युद्धात बांदल देशमुख मारले गेले आणि शिवाजी महाराजांनी रोहिडा स्वराज्यात सामील करून घेतला. कृष्णाजी बांदल मारले गेले; मात्र देशमुखांचे कारभारी असलेले बाजीप्रभू देशपांडे लढतच होते; ज्यावेळी महाराज आणि बाजीप्रभू समोरासमोर आले तेव्हा महाराजांनी तलवार म्यानात ठेवून दिली. त्यांनी बाजीप्रभू देशपांडे यांना स्वराज्याचे महत्त्व पटवून दिले. तुमच्यासारखी ज्येष्ठ तसेच स्वामिनिष्ठ माणसे आम्हाला हवी आहेत, असे कळकळीने सांगितले. बाजीप्रभूंना महाराजांच्या डोळ्यातील सत्य समजले. त्यांनी होकार दिला. महाराजांनी त्यांना स्वराज्य कार्यात सामील करून घेतले. त्यानंतर मात्र बाजीप्रभूंनी शिवाजी महाराजांची साथ कधीच सोडली नाही. पन्हाळ्याच्या वेढ्यात बाजीप्रभू देशपांडेंनी महाराजांना भक्कम साथ दिलीच; मात्र वेढ्यातून निसटताना शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचेपर्यंत बाजीप्रभूंनी पावनखिंडीत दाखविलेला पराक्रम आपणा सर्वांना माहिती आहेच. शिवाजी महाराज सुखरूप राहावे यासाठी दोन्ही हातांनी लढणारे बाजीप्रभू देशपांडे स्वराज्याचे शिलेदार होते. आज स्वार्थासाठी अशा लोकांना, जातीच्या बंधनात बांधून त्यांच्या पराक्रमाचा अपमान केला जातो तेव्हा मनाला वेदना होणे स्वाभाविक आहे. धन्य होते त्यावेळचे सर्व शूरवीर; जे देशकार्यासाठी प्राणपणाने लढले आणि कुठलीही शंका मनात न ठेवता शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या पवित्र कार्यात सहभागी झाले. देशकार्य करीत असताना संघटित असणे गरजेचे असते. मिर्झा राजे जयसिंग शक्तिशाली होते. त्यांनी शिवाजी महाराजांची साथ दिली असती तर स्वराज्याचा निश्चितच फायदा झाला असता, पण तसे घडले नाही. पुढे महाराजांना पुरंदरचा तह करावा लागला; त्यात २३ किल्ले मुघलांना द्यावे लागले. त्यात पुन्हा रोहिडा किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला. रोहिड्याकडे महाराजांची नजर मात्र कायम होती. १६७१ मध्ये महाराजांनी रोहिडा पुन्हा स्वराज्यात सामील करून घेतला. किल्ल्याचा इतिहास आठवत आपण रोहिड्याच्या तिसऱ्या दरवाज्यातून आत गेल्यावर आपल्याला सदरेचे आणि किल्लेदाराच्या वाड्याचे अवशेष दृष्टीस पडतात. थोडं पुढे गेलात की रोहिडमल्लाचे म्हणजेच भैरवाचे मंदिर आहे तिथे दर्शन घेऊन, थोडी विश्रांती करून पुढील गड पाहण्यास निघावे. मंदिराच्या बाजूला खडकात खोदलेले टाके असून मंदिरात रात्री ८ ते १० लोकांच्या मुक्कामाची सोय होईल इतकी जागा आहे. मंदिराच्या उजवीकडे अजून काही पाण्याची टाकी आहेत. त्याच्या बाजूच्या तटाने भोरच्या दिशेने चालत गेलात की, आपण वाघजाईच्या बुरुजावर पोहोचतो. खालच्या बाजूला चुन्याच्या घाणी आणि चुन्याचा दगड दृष्टीस पडतो. पूर्वी बांधकाम करताना चुना वापरला जाई त्यामुळे अशा चुन्याच्या घाणी अनेक पुरातन बांधकामाच्या जागी पाहावयास मिळतात. गडाची तटबंदी भक्कम आहे आणि गडावर बांधलेले सातही बुरुज गडाची बुलंदी दर्शवितात. सातही बुरुजांना समर्पक अशी नावे आहेत- सदरेचा बुरूज, सर्जा बुरूज, वाघजाई बुरूज, फत्ते बुरूज, पाटणे बुरूज, दामगुडे बुरूज, शिरवले बुरूज. यापैकी गडाच्या उत्तरेकडील वाघजाई बुरूज आणि दक्षिणेचा शिरवले बुरूज हे भव्य बांधणीचे, आकर्षक बुरूज आहेत. बुरुजाच्या वर जाण्यासाठी पायऱ्या केलेल्या आहेत. सर्जा बुरुजाकडून वाघजाई बुरुजाकडे जाताना वाटेत एक चोर दरवाजा दिसतो. गडावर पाण्याचे दोन तलाव आणि नऊ- दहा टाकी आहेत. गडावरील टाकी डोंगरउतारावर खोदली असल्याने डोंगरावरून पावसाचे पाणी वाहत येऊन आपोआप टाक्यात साचते. टाकी एकमेकाला विशिष्ट उंचीवर जोडली असल्याने एक टाके भरले की पाणी दुसऱ्या टाक्यात जाऊन एकापाठोपाठ टाकी भरतात. गडाचे तीन दरवाजे पार करून पुढे गेलात की कातळ आहे. किल्ला उजवीकडे ठेवून दक्षिणेकडून उतरणाऱ्या डोंगरधारेवरून उतरलात तर खाली नाझरे गाव आहे. नाझरे गावाच्या पाठीमागे लांबलचक डोंगर पसरला आहे; यालाच रायरेश्वराचे पठार म्हणतात. नाझरे गावाच्या पलीकडे आहे आंबवणे गाव. येथे नागेश्वराचे सुंदर देवालय आहे. १७०० मध्ये भोर संस्थान शंकराजी नारायण सचिव यांना मिळाले. पुढे रोहिडा संस्थान विलीन होईपर्यंत मराठ्यांकडेच होता. संस्थापक पंत सचिव शंकराजी नारायण यांची समाधीही याच आंबवणे गावात आहे. रोहिड्यावरून रायरेश्वराला जायचे असल्यास हा मार्ग उत्तम अन्यथा आलो त्या मार्गाने बाजारवाडीला उतरून परतीच्या वाटेला लागावे. दुर्ग भटकंती करणाऱ्या लोकांसाठी एका गडावरून दुसऱ्या गडावर जाणे आणि त्या डोंगररांगेतील सर्व गडकिल्ले फिरणे, हे आव्हानच असते. असे एकत्रित कार्यक्रम आखणे आणि ते पूर्ण करणे यामुळे काहीतरी सर केल्याचे केल्याचे समाधान मिळते.





## आई फक्त एक नाते असते...

आई एक नाते असते?
हो... तुम्ही ऐकले ते खरे आहे!
आई फक्त एक नाते आहे!
नात्यातील रक्त कधीच गोठले आहे!
लहानपणी हे नाते गाते असते.
जेव्हा ते माय लेकराचे असते,
तेव्हा
आईत अवघे विश्व असते!
काय घडते - कसे घडते?
गजबजलेल्या घरात
सगळे असून वाट्याला
एकटेपण येते
पाटल्या, बोरमाळ कोणाला?
कोणाच्या नावावर सातबारा?
गजबजलेल्या मनात
हेच प्रश्न दाटतात!
कसले संस्कार आणि कसले काय!
हिशेब सारा कोणाला दिले काय?
अन् आम्हाला काय देऊन जाणार...
तेवढे फक्त सांग माय...!
आई केवळ धागा
संपत्तीतला वाटा वाढवणारा!
तिला काय हवे, नको
कोणाला करायचे काय ?
नात्यातले रक्त गोठते
तिचीच निर्मिती तिला मोडीत काढते .
आई... फक्त एक नाते उरते..
असेही कधी कधी घडते!

अरुंधती वैद्य

## बाप माणूस

काळीज फाटून ऱ्हायलं, जेव्हा बाप माहा दिसे,
वीज कडाकळी तव्हा, जणू बापू माहाच असे ।
डोयांमधी झरी पाणी, काळीज तुटे तवा,
कष्टाच्या दलदलीत, बाप माहा बूडे जव्हा ।
वीज कडाळीसनं जणू, आकाशाले फाडे,
तसंच निधडं जोरबाजपण, बापाच्या देहात भेटे।
ईजेची ती दाहकता, तईशी त्याची कठोरता,
पन आत दडयेली, मायेची निबरता ।
शेणा मातीचा मी अन् बाप माहा पहिला गुरू,
घडविल मले त्यानं, आता सांग ऋण कसं फेडू?
कसं वागावं दुनियेत, त्यानंच मले शिकवलं,
सत्याची वाट सोळू नको, हाच धडा त्यानं दिला ।
त्याच्या घामाच्या थेंबात, घर माहा उभं ऱ्हायलं,
मी तुहाच अंश बावा, हेचं न्हाय विसराचं ऱ्हायलं ।
बाप माहा माणूस न्हाय, बाप माहा देव विठू पंढरीचा,
सांभाळून घेई मले, भोला भंडारी काशीचा ।

अमोल तपासे

## वसंत

होता वसंत तेव्हा, ती वेळ भारलेली
ऐकू तिला न आली, मी साद घातलेली.
कोकिळ गात होता, धुंदीत यौवनाच्या
ती शीळ मीलनाची, चाहूल वाटलेली.
ती दूर राहुनीही, माझ्या समीप होती
प्रीती अनाम ज्योती, प्राणात पेटलेली.
होता जरा दुरावा, संभ्रांत मी जरासा
ती भेट लोचनांची, चोरून घेतलेली.
गेला वसंत सरूनी, संतप्त ग्रीष्म आला
जाणीव खोल माझ्या, रंध्रात गोठलेली.

डॉ. रमेश जलतारे

पान ४ वरून

## आणि गाथा तरली...

डगमगली नाही. तिने अव्याहत कष्ट केले. काळ पुढे सरकत राहिला... ती पुढे जात राहिली. तो मात्र अजून गर्तेत जात होता. तिने सांगितले की, 'ती कधीही घटस्फोट घेणार नाही आणि आपल्या कर्तव्याला चुकणार नाही.' तिने उत्तरांचलमधील एका लहान गावातील व्यसनमुक्ती केंद्रात प्रतापला पाठवायची व्यवस्था केली. दोन मदतनीस ठेवले काळजी घ्यायला आणि स्वतःला कामात झोकून दिले.

'मायलेकी' हा ब्रँड परंपरागत पोशाखाची ओळख होत गेली. पारंपरिक वस्त्रांना व दागिन्यांना आधुनिकतेचा साज चढवलेले नवीन स्वरूप लोकप्रिय झाले. आज सुप्रसिद्ध नृत्यांगना कलामालिनीच्या हस्ते उद्घाटन सोहळा होता.

कला मालिनीने राजसी मॅडमच्या भव्य पूर्णाकृती प्रतिमेचे अनावरण केले आणि 'गाथा ॲन्ड डॉटर्स'च्या नव्या शोरूमचे विधिवत उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. त्या पूर्णाकृती प्रतिमेतील राजसी मॅडमचे आश्वासक डोळे व मंद स्मित गाथाला नवीन ऊर्जा देत होते.

पान ५ वरून

## गुरूकुलातील शिक्षण

वादविवाद केल्या जाई. शिक्षण व्यक्तिपातळीवर असावे की, सामूहिक यावर विचार करून विद्यार्थी व अध्यापक यांच्यात समतोल सांभाळला जात असे. व्रतबंधानंतर गुरुकुलात प्रवेश होई. अर्थ न समजता, पाठांतर न सांगता व्याकरण आणि शब्दव्युत्पत्तीवर भर देऊन विषयाच्या मुळापर्यंत जाणे, ग्रंथ लावणे शिकविले जाई.

अभ्यासाची गोडी लावून विचारप्रवृत्त करणे यांत गुरूंचे कौशल्य तर शिष्याच्या जिज्ञासेचे समाधान करता न येणे हे अपयश मानले जात असे. असे क्वचित झालेच तर गुरू स्वत: त्या विद्यार्थ्याला इतरत्र पाठवत. नवीन ठिकाणीसुद्धा 'यत्ते कश्चिगब्रवीत्तच्छृणवाम्' म्हणजे तुला आतापर्यंत काय समजले ते सांग म्हणत त्याच्या पूर्वतयारीची चाचपणी करून मगच प्रवेश मिळे. अर्धवटाच्या मागे लागून गुरूंचा वेळ व्यर्थ वाया जाऊ नये हा हेतू असे. अध्यापन पद्धतीतील एकेक अंगावर लिहिण्यासारखे अजून भरपूर आहे. तो पुन्हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल. तैत्तिरिय उपनिषदांत अध्ययन पूर्ण करून आता गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या शिष्यांनी भावी आयुष्यात कसे वागावे ते सांगणारा उपदेश आहे:

'सत्यं वद। धर्मं चर।
स्वाध्यायान्मा प्रमदः।
आचार्याय प्रियं धनमाहृत्य।
प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः।
सत्यान्न प्रमदितव्यम्।
धर्मान्न प्रमदितव्यम्।
कुशलान्न प्रमदितव्यम्।
भूत्यै न प्रमदितव्यम्।
स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्।'

म्हणजे सत्य बोल, धर्मपालन कर, स्वाध्याय चुकवू नकोस, आचार्यांना संतोष होईल असे धन देऊन वंशवृद्धीकरिता गृहस्थाश्रम स्वीकार, सन्मार्ग सोडू नकोस, विद्येने उन्मत्त आणि ऐहिक सुखाने प्रमत्त होऊ नकोस, स्वत:चे अध्ययन आणि इतरांना अध्यापन यात अनमान करू नकोस.

'जे जे आपणांसी ठावे । ते ते दुसऱ्यासी द्यावे ।' यानंतर आचरणाविषयी अनेक प्रकारे मार्गदर्शन आहे. उदा. मातृ देवो भव, पितृ देवो भव आणि शेवटी एषः आदेशः। एषः उपदेशः। हेच वेदरहस्य. त्यामुळे हेच कर असा आग्रहही आहे. यात सकारात्मक आणि नकारदर्शक अशा दोनही प्रकारच्या सूचनांचे सुयोग्य प्रमाणात मिश्रण आहे आणि हे साहजिकच आहे. अध्ययन पूर्ण केलेला शिष्य आता व्यावहारिक जगात प्रवेश करणार आहे.

तो प्रवास निर्वेध असणार नाही म्हणून संभाव्य परिस्थितीत त्याने सन्मार्ग तर सोडू नये; पण प्रसंगी कोणते मोह टाळावेत याकरिता हे मार्गदर्शन आहे.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# सुखाचा अंतहीन शोध




हवं ते मिळालं की मिळणारा आनंद, सुख तात्पुरतं असतं, एक तात्कालिक उत्तेजक असते हे कधी ध्यानी आलंय कां? काही वेळाने आपलं मन पूर्वस्थितीला येतं. पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी आणि नव्या टप्प्याचा शोध. चांगलं नाटक पाहिलं, चांगला चित्रपट बघितला, आवडते गाणे ऐकले किंवा पसंतीची खरेदी केली, आपण सुखावतो पण क्षणिक. ते फारकाळ टिकत नाही. लगेच पुढच्या पावलाचा शोध सुरु होतो. शाश्वत सुख म्हणजे हवं होतं ते साध्य करणं किंवा अधिक काही मिळण्याच्या मागे लागणं नसतं. जे आहे, त्याबद्दल कृतज्ञ असणं यातून अधिक सुख मिळत जातं. ध्येय, उद्दिष्ट्ये यांचा पाठलाग सोडणं असाही याचा अर्थ होत नाही. शाश्वत म्हणजे अर्थपूर्ण उपक्रमांमधून स्वतः चा शोध, आपल्या नीतिमूल्यांशी सुसंगत काम आणि यशाच्या बाह्य निर्देशांकांकडे दुर्लक्ष!

या संकल्पनेला मानसशास्त्रात हेडोनिक ट्रेडमिल (सुखाचा अंतहीन शोध) म्हणतात. ट्रेडमिलवर जसे कितीही पावले टाकली, चालले तरी माणूस त्याचजागी परततो तसे सुखाच्या शोधाचे होते. आयुष्यात कितीही सुखाचे किंवा दुःखाचे प्रसंग आले तरी मन शेवटी त्याच भोज्यापाशी येऊन ठेपते. याला हाताळायचे असेल तर आपल्याला अर्थपूर्ण उपक्रमांमध्ये सतत गुंतणे आवश्यक असते आणि मनात सतत कृतज्ञभाव बाळगावा लागतो. आयुष्याला ऐहिक सुखाच्या पलीकडे नेता आले तर दृष्टिकोनात सकारात्मकता येते. इतरांशी भक्कम नातेबंध विकसित केले आणि स्व-विकासाचा वाट धरली की शाश्वत सुखाचे दर्शन होते, अनुभूती येते. मग तात्पुरत्या समाधानाचे चक्र भंग पावते.

नवा कोट, हँडबॅग, वाहन, पदोन्नती, कामातील समाधान अशा कितीतरी गोष्टींची आस मनात बाळगून आपण जगत असतो. पण एकदा ते साध्य झाले की त्या मिळकतीचा खराखुरा आनंद होतो कां? आणि तो किती टिकतो? कारण अशा घटनांचे आपल्या स्वास्थ्यावर, समजावर दीर्घकालीन परिणाम होत असते तर आपला आनंद, सुख वाढत्या श्रेणीने उंचीवर गेले असते. आणि सुखाची किमान पातळी सतत विकसित झाली असती. पण प्रत्यक्षात तसे नसते. या अंतहीन चक्रात आपण अडकतो, त्यामुळे सकारात्मक अनुभव आले किंवा हवं ते मिळाले तरी समाधान होत नसते. एखाद्या लहान बाळाला खेळणे, खाऊ मिळाला तरी त्याला अजून जास्त हवे असते दुसऱ्याच्या हातातील खाऊ/खेळणे हिसकावून घ्यायचे असते. आपले सुख स्थिर पातळीवर परतते.

असं काही असतं का की आपली व्यक्तिगत सुखाची सीमा ठराविक असते आणि त्यानंतर काहीही खरेदी केलं किंवा साध्य केलं तरी त्यात बदल होत नाही? हा विचारच सामान्यतः अस्वस्थ करणारा असतो. ही ट्रेडमिल टाळता येते कां आणि त्याविनाही आनंद, मनःस्वास्थ्य जपता येते कां ? शास्त्राकडे, विज्ञानाकडे याची उत्तरे सापडतात.

**सुखाच्या शोधाची गाथा-**

अनुभवजन्य पुरावे असं अधोरेखित करतात की आपण आयुष्यातील सकारात्मक आणि नकारार्थी घटनांशी जुळवून घेतो. यातून पूर्वी अस्तित्वात असलेल्या सुखाच्या पातळीवर आपण परततो. इयान म्यकइवान आपल्या १९९७ सालच्या एन्ड्यूरिंग लव्ह या कादंबरीत याला आनंदाचा पाया मानतो. त्याचे म्हणणे आहे - माणसे किती पटकन असाध्य असलेलं मिळालं की त्याला सामावून घेतात. आपण जुळवून घेण्यात पटाईत आहोत. अपेक्षित गोष्टी मिळाल्यावर सहजपणे भूतकाळात रूपांतरित करतो आणि पुढे पाऊल टाकतो.

१९७१ साली ब्रिकमन आणि कॅम्पबेल यांनी या विषयावर एक पेपर प्रसिद्ध केला. यासाठी त्यांनी आपोआप (स्वयंचलित) अभ्यासाचे प्रारूप वापरून प्रेरक मानसशास्त्राचा वापर केला. यामध्ये त्यांनी असं सिद्ध केलंय. आनंदातील अल्पकालीन अनुभवाचा पाया बहुधा सकारात्मक घटना असतात ( उदा. लॉटरी जिंकणे). पण स्वाभाविकपणे आपल्या सुखाची पातळी जुन्या (घटनेच्या आधीची) स्थानी येते.

उदा- स्वप्नातील कार विकत घेणे प्रत्यक्षात घडले तर आनंद अत्युच्च पातळीवर पोहोचते. नवी गाडी चालविताना, दरवेळी स्टिअरिंगवर हात ठेवला की ती सुखाची सर परतून येते.

कालौघात नावीन्य ओसरते आणि ती कार दैनंदिनीचा भाग बनून जाते. आता ती झिंग परतून येत नाही आणि कार घरी आणल्याच्या दिवसा-चा आनंद उणावतो. ब्रिकमन आणि कॅम्पबेल यांनी लॉटरी विजेत्यांच्या गटाचा अभ्यास केला आणि तसेच अपघातानंतर पूर्ण आयुष्य बदलून गेलेल्या लोकांच्या गटाचाही अभ्यास केला. त्यांनी असू नमूद केलं की दोन्ही गटांची मूळ स्थानावर येण्याची प्रवृत्ती काही महिन्यांनी परतते.

भौतिक वस्तूंचा संग्रह किंवा बाह्य परिस्थितीचा परिणाम दीर्घकालीन आनंद वाढवत किंवा घटवत नाही. शेल्डन आणि लुकास यांनी २०१४ साली सुखवादाचा मागोवा घेताना अशी व्याख्या केली की प्रेरकाचा, उत्तेजकाचा भावनिक परिणाम एकदा झाला की तो तितक्याची तीव्रतेचा पुन्हा होत नाही. थोडक्यात एका उत्तेजकाचा परिणाम हा अनुभवाच्या गुणवत्तेला आणि आपल्या प्रतिसादाला बदलवतो.

वेगवेगळी विचारसरणी या सुखवादाच्या तळाशी असते. त्यांत सर्वाधिक लोकप्रिय आहे आकलनाची जुळवून घेण्याची प्रक्रिया. फ्रेडरिक आणि लोएवेन्स लॉयवेन्स्टियन यांनी १९९९ सालच्या आपल्या संशोधनात असं नमूद केलंय की आपली स्वप्ने, अपेक्षा आपण सद्य परिस्थितीनुरूप वाकवत असतो, तडजोड करत असतो. पटकन आपले हट्ट मागे घेऊन हातात निमूटपणे समोर येईल ते स्वीकारतो. सामाजिक तुलना या संकल्पनेनुसार आपल्याला इतरांशी तुलना करण्याची खोड असते आणि त्यामुळे व्यक्तिगत कल्याणाची, स्वास्थ्याची मोजपट्टी कायम बदलत राहते, ती स्थिर नसते. विल्स यांच्या १९८१ सालच्या संकल्पनेला म्हणूनच जगभर स्वीकारले गेले.

पूर्वग्रह आपली भूतकाळातील घटना आठवण्याची पद्धत बदलतात. पीक-एंड नियम आपल्या आठवणी अनुभवाच्या सर्वात तीव्र क्षणांभोवती आणि तो अनुभव कसा संपतो यावर भाष्य करतो.

उदा.- तुमची अलीकडची/शेवटची सुट्टी! तुम्हाला काय आठवते? डोंगरमाथ्यावरून दिसलेलं सुंदर दृश्य, कुटुंबियांसमवेत घालविलेली परिपूर्ण सकाळ, कदाचित पासपोर्ट हरवणे किंवा घरापासून दूर असताना नेमकं आजारी पडणे. आठवणी आनंदाच्या असोत किंवा दुःखाच्या, तुमच्या सुट्टीतील काही क्षणांचा प्रभाव कायम मनात असतो. अनुभवांच्या कालावधीपेक्षा काहनेमन १९९३ साली नोंदवतात तसे शेवटचे क्षण आपल्या अनुभवांना आकार देत असतात. भावनिक अस्थिरता (लहानसहान गोष्टींवरून जास्त काळजी करणे किंवा तणावाखाली असणे अशी मनोवस्था) किंवा बहिर्मुखता सारखी स्वभाववैशिष्ट्ये आपल्या सुखाच्या अतिरिक्त शोधावर प्रभाव टाकीत असतात.

आपल्या आयुष्यातील अनुभव आपण घटनांच्या संपूर्ण यादीपेक्षा क्षणचित्रांच्या मालिकेच्या रूपाने लक्षात ठेवतो. आपले मन आपल्या आठवणींमधील सर्वात जास्त जाणवणाऱ्याक्षणांची सरासरी काढते आणि भूतकाळाबद्दल आपले मत तयार करते. एखाद्या अनुभवाचे सर्वात भावनिकदृष्ट्या तीव्र मुद्दे आणि त्या अनुभवाचा शेवट आपण एखाद्या घटनेला कसे आठवतो यावर खूप विसंबून असते.

**सुखवादाच्या या यात्रेतील आणखी घटक-**

आपली जुळवून घेण्याची प्रवृत्ती, घटनेचा कालावधी आणि वारंवारिता यावर अवलंबून असते. आयुष्यातील घटनांचा प्रभाव त्यांच्या तीव्रतेवर, कालावधीवर आणि अपूर्वाईवर ठरविला जातो हे डीएनेर यांनी २००६ साली सिद्ध केलं. संशोधनात व्यक्तिगत गुणविशेषांचा होणारा परिणाम, भवताल आणि सामाजिक- आर्थिक परिस्थिती यामधून सुखाचा शोध कसा संभवतो यावर अधिक भर दिला जातो. अलीकडे क्लुसन यांनी २०२२ साली सादर केलेल्या पेपरमध्ये सुखवादाशी संलग्न असलेले काही विचार मांडले. त्यांनुसार उत्प्रेरक बरेचदा जाणवणाऱ्या आणि न- जाणवणाऱ्या अनुभूतींवर अवलंबून असतात असं मानलं जातं.

सुखवाद क्लिष्ट आणि वैविध्यपूर्ण असतो आणि म्हणून त्यांत मनःस्वास्थ्याचा विचार प्रामुख्याने व्हावा असं सूचित केलेलं आहे. निवडक लक्ष देणे, पार्श्वभूमीची निवड, समाजाचा आधार, निवडीमधील स्वायत्तता, अभिव्यक्ती असे विविध घटक या संकल्पनेत गृहीत धरले जावेत असं अभिप्रेत आहे. अंतिमतः ट्रेडमिलची संकल्पना कितपत संयुक्तिक आहे यांवरही पुनर्विचार व्हावा अशी विचारधारा अंग धरत आहे. अंतहीन चक्रात गुंतणे, प्रयत्नांना यश न येणे याचाही कोठेतरी विचार व्हायला हवा. तसेच सुखाची किमान रेषा आपल्या व्यक्तिमत्वावर, आपल्या जनुकांवर अवलंबून असते का याचाही अदमास घ्यायला हवा. कारण त्यावर आपली कार्यक्षमता, मानसिक बल ठरविले जाते. जर पातळी आधीच ठरलेली असेल तर उगाच प्रयत्न कां करायचे?

**सुखाच्या शोधाचे प्रारूप-**

वरील प्रश्नांनी अस्वस्थ होऊन संशोधक आता सुखवादाच्या मूळ सिद्धांतालाच आव्हान देताहेत. सुखवादाला प्रतिबंध करणारे प्रारूप शेलडन आणि स्चकड यांनी २००५ साली सुचवले. त्यानुसार सुखवादाला टाळण्याचे प्रयत्न प्रत्यक्षात सकारात्मक अनुभवांचा कालावधी वाढवतात. सुखाची अनुभूती वाढवायची असेल तर सकारात्मक घटनांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा असं आता मांडलं जातंय.

**हे प्रारूप तीन गृहीतकांवर आधारलेलं आहे.**

**१) अनुवंशिक कल-**

उदा- एखाद्या व्यक्तीच्या जनुकांमुळे विशिष्ट आरोग्य स्थिती किंवा रोगाचा धोका असतो. काही विशिष्ट जनुकांमुळे स्तनाच्या कर्करोगासारख्या रोगाचा धोका वाढू शकतो, याला आनुवंशिक पूर्वस्थिती म्हणतात. म्हणून आनुवंशिकता आपल्या सुखाच्या संकल्पनेशी जोडलेली असते असं हे प्रारूप सुचवतं. पर्यावरण, जीवनशैली, जन्मजात जीवनाकडे बघण्याची वृत्ती यामुळे आपण सुखवादाचा पाठलाग करत नाही. अर्थात सर्वंकष आनंदाचा हा केवळ एक हिस्सा असतो आणि तो बदलत नाही. म्हणून या प्रारूपानुसार आपल्या नियंत्रणात असलेल्या, कह्यात असलेल्या घटकांवर लक्ष केंद्रित केलं तर आपलं स्वास्थ्य टिकून राहतं.

**२) हेतुपूर्वक/ जाणीवपूर्वक केलेले उपक्रम-**

या प्रारूपात जाणीवपूर्वक केलेल्या कृतींवर अधिक भर दिलेला आहे.

उदा- कृतज्ञता व्यक्त करणे, सहृदयता जोपासणे आणि अर्थपूर्ण उद्दिष्ट्ये ठरविणे अशा उपक्रमांमधून आनंद, समाधान वाढते. या प्रारूपातील आणखी एक मुद्दा म्हणजे हाती घेतलेल्या उपक्रमांमधील वैविध्य. यामुळे निरसपण जाते. नवनवे प्रयोग सातत्याने केले आणि वैविध्य आणले तर एकसूरीपण टाळता येते. त्यांतून सुखाची पातळी टिकवता येते आणि जुळवून घेण्याचे प्रसंग टाळता येतात.

**३) प्रासंगिकता -**

परिस्थितीजन्य घटक आपल्या सुखाच्या संकल्पनेवर प्रभाव टाकीत असतात. दरवेळी त्यांची तीव्रता, वारंवारिता बदलत जाते.

उदा.- आंब्याच्या मोसमात हापूस आंबे अनपेक्षितपणे मिळाले तर अवर्णनीय आनंद होतो. अनपेक्षितपणे एखादे आवडते गाणे कानी पडले तर मन स्मृतींमध्ये तल्लीन होऊन जाते. तसेच मित्राची भेट, आवडता चित्रपट/कार्यक्रम सुखाची पातळी उंचावतो. पण हे सामाईक नसते. हे त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून असते. दरवेळी त्याच टोकाचे, तीव्रतेचे सुख प्राप्त होईल असे ठामपणे सांगता येत नाही. आयुष्यावर प्रभाव टाकणाऱ्या घटना, मनाचे पर्यावरण आणि समाजातील घटकांशी असलेले नाते सुखाचे मोजमाप ठरवितात. काहीवेळा परिस्थिती आपल्या हातात नसते मग तिलाच बदलायचा प्रयत्न करावा असे हे प्रारूप सुचविते. हे सगळं संवेदनशील वाटते पण या प्रारूपाच्या मूळाशी असते फक्त कृतज्ञतेची सवय. कृतज्ञ राहण्याची सवय हा जीवनाचा सर्वात मोठा घटक आहे आणि तो सुखाच्या अंतहीन पाठलागातून सोडवणूक करू शकतो.

ल्युबोमिरस्की यांनी २००५ साली एक देखणे भाष्य या विषयावर केलं आहे. परिस्थितीचा, घटनेचा नकारात्मक परिणाम घटवून कृतज्ञतेचे विचार मानवाची ताणतणावातून सुटका करतात आणि कालौघात सकारात्मकतेमधील विचारांचा परिणाम कमी होऊ देत नाहीत.

**सुखी कसे व्हावे? राहावे?**

हा सनातन प्रश्न मानसशास्त्र आपल्या पद्धतीने सोडविते आणि ट्रेडमिलच्या सापळ्यातून कसे सुटायचे याचे वैश्विक मार्ग दाखवून देते. यासाठी पुरावेजन्य रणनीती आखणे सहजशक्य आहे-

**(१) सहृदयता-** रोज दिवसातील काही वेळ बाजूला काढून इतरांचे कौतुक करणे आणि ज्या गोष्टींबद्दल आपण कृतज्ञ आहोत यांची नोंद रोजनिशीत करणे. इमोन्स आणि मॅक्लफ यांचे २००३ सालचे संशोधन याला पुष्टी देते. ते म्हणतात, कृतज्ञता आयुष्याच्या सकारात्मकतेकडे लक्ष केंद्रित करते.

**(२) अर्थपूर्ण संबंध जपणे-** कुटुंबियांशी, मित्रांशी आणि बाहेरच्या परिघातील समाजाशी भरणपोषण करणारे संबंध विकसित करणे, गरज असेल तेव्हा मदतीचा हात पुढे करणे हा दीर्घकालीन कल्याणाचा मार्ग आहे. वेळ आणि ऊर्जा यांची गुंतवणूक करून सखोल नाते विकसित करणे, अर्थपूर्ण संवाद साधणे, एकमेकांना आधार देणे याचा आनंदावर भरीव परिणाम होतो.

**(३) माणुसकी, दयाळूपणा, अनुकंपा दैनंदिन जीवनात अवलंबिणे -** दयाळू वागणूक केवळ आपले सुख वाढवित नाही तर इतरांनाही आवश्यक असलेली मदतीची रसद पुरविते. स्वयंसेवक बनून काही उपक्रमांमध्ये (रक्तदान, वाहतूक नियमन, वृद्धाश्रमात जाऊन श्रमदान इ.) सक्रीय सहभागी झालेल्यांना दिवसाखेरी समाधानाची अपार जाणीव होते. कारण माणुसकी ही कृतीच सकारात्मक भावनांची जोपासना करते आणि सार्थकतेची जाणीव निर्माण करते.

**(४) मनानुभूती आणि स्व-निगा -** ध्यानधारणा आणि स्व-निगा सततच्या अस्वस्थतेमधून आणि असमाधानाच्या चक्रातून सुटका करते. आनंददायी उपक्रम, सवयी- संगीत ऐकणे, स्वतःच्या सहवासात रममाण होणे, दीर्घश्वसन आपल्यासाठी आरामदायी ठरते. वर्तमानात जगणे म्हणजे तणाव कमी करणे असे केंग यांनी २०११ साली सप्रमाण सिद्ध केले.

**(५) स्व-विकास आणि निरंतर अध्ययन-** मनुष्य जन्मभर विद्यार्थी असतो हे विधान शंभर टक्के सत्य आहे. स्वतःची ध्येये ठरवून नीतिमूल्यांशी त्यांची जुळणी करणे यातून स्वानंदाचा उपभोग घेता येतो. स्वतः ला सातत्याने आव्हान देणे, आपल्या मर्यादा ताणणे, नवी कौशल्ये आत्मसात करणे आणि विकासाचे मार्ग शोधत राहणे यातून परिपूर्णतेच्या हव्यासापेक्षा प्रगतीवर एकाग्रतेने काम करणे अधिक सुखकर असते.

**(६) हाव मर्यादित ठेवणे -** भौतिक सुखे तात्पुरती आनंद पुरविणारी असतात, पण तितकीच तात्कालिक त्यामुळे सुखांमध्ये त्यांचा हिस्सा किमान असतो. हा बाह्य शोधाचा सापळा टाळता आला पाहिजे. अधिक मिळणे किंवा भरपूर साध्य करणे हे सुखाचे चिरकालीन गुपित कधीच नसते.

आपल्या गाठोड्यात आधीच काय आहे याबद्दल आभार मानण्यातला आनंद काही औरच असतो. याचा अर्थ आपल्या ध्येयांचा विसर असा नाही. ऐहिकाच्या पाठलागातून अर्थपूर्ण असे फारसे काही हाती लागत नाही, पण ही जाणीव योग्य वेळी होत नाही. म्हणून अनुभवांचे प्राधान्यक्रम ठरवावेत, ऐहिकाच्या साठ्यापेक्षा स्वतःचा विकास महत्वाचा मानावा आणि मनःपूर्वक आनंद घ्यावा.

**(७) मनःपूत आस्वाद-** आनेवाला पल जानेवाला हैं हे कायम ध्यानी ठेवले तर आस्वादशक्ती वाढते. दैनंदिन जीवनात सुखाचे इवले क्षण शोधणे, वेग कमी करून रस्त्याच्या किनारी उमललेली उत्फुल्ल फुले बघणे, इंद्रियांचा सहभाग वाढवणे आणि धमाल करणे यातून सुखाचे अवर्णनीय शोध लागतात. आवडत्या उपक्रमांत स्वतःला गुंतवून ठेवण्यातील, त्यांत बुडून जाण्यातील गंमत काही और असते आणि ती केवळ आस्वादायची असते.

सत्य इतकेच आणि संशोधनानेही त्याची पुष्टी केलीय. स्वतःला हवे तितकं सुखी होऊ शकतो आणि त्या जाणिवेचा कालावधी लांबवू शकतो. आपल्या नियंत्रणात असलेल्या कृतींवर ध्यान केंद्रित केले तर ट्रेडमिल पासून सुटका शंभर टक्के शक्य आहे. एकदा या तंत्राची जाण आली की अग्रक्रम ठरविता येतात, सुखाची अनुभूती वाढविता येते आणि जीवन कृतार्थ होते. शेवटी चक्र पाठ सोडते हे महत्वाचे.

# अतिवृष्टीनंतर आता शीतलहर

**भारतातीलअनेक राज्यांमध्येयावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. आता 'ला-नीना'चा प्रभाव पडायला लागला आहे. उत्तर भारतात अनेक राज्यांमध्ये जोरदार थंडी पडू लागली आहे. नोव्हेंबरच्या मध्यातच अनेक भागांमध्ये १० अंशापेक्षा कमी तर काही ठिकाणी ५ अंशापेक्षा कमी तापमान आहे. अनेक ठिकाणी उणे तापमान जाण्याची शक्यता असल्याने मानवी आरोग्य आणि पिकांवरही प्रतिकूल परिणाम होणार आहे.**

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

भारतीय हवामान खात्याने सप्टेंबरमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा परिणाम सप्टेंबरच्या सुरुवातीलाच दिसून आले. अनेक राज्यांमध्ये पाऊस आपत्तिजनक होता. शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आता हवामान शास्त्रज्ञांनी इशारा दिला आहे की, या वर्षाच्या अखेरीस 'ला-नीना' परिस्थिती येऊ शकते. त्यामुळे यावर्षी भारतात तीव्र थंडीचा अनुभव येऊ शकतो. काही ठिकाणी तर हा इशारा प्रत्यक्षात येऊ लागला आहे.

'ला-नीना'चा प्रभाव जाणवण्याची शक्यता ७१ टक्के आहे. त्याची सुरुवात झाली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला आलेल्या लघु 'ला-नीना'प्रमाणे ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपण्याची अपेक्षा आहे. 'ला- नीना' ही पॅसिफिक महासागरातील समुद्राचे पाणी थंड करण्याची स्थिती आहे. त्यामुळे उत्तर भारतात सामान्यपेक्षा अधिक थंडी पडू शकते. 'लानीना' हे 'ला-निनो' दक्षिणी दोलन चे थंड स्वरूप आहे. हे पॅसिफिक महासागराचे पाणी थंड करते आणि जागतिक हवामानावर परिणाम करते. भारतात ते अतिथंड हिवाळ्याशी संबंधित आहे. भारतीय हवामान विभागाने आपल्या अहवालात म्हटले आहे की, 'ला-नीना'चा परिणाम भारतातील हिवाळ्याशी संबंधित असतो. परिणामी यावर्षी भारतात कडक हिवाळा येऊ शकतो. हवामान बदलामुळे उष्णतेच्या लाटांचा परिणाम काही प्रमाणात कमी होऊ शकतो; परंतु 'ला-नीना'चा प्रभाव असणाऱ्या वर्षांमध्ये हिवाळा सामान्यतः सामान्यपेक्षा जास्त थंड असतो. त्यामुळे हे वर्ष सर्वात उष्ण वर्षांपैकी एक मानले जाणार नाही. कारण मान्सूनच्या पावसाने आधीच तापमान कमी केले आहे. 'स्कायमेट वेदर'चे अध्यक्ष जी. पी. शर्मा यांनी सांगितले की, पॅसिफिक महासागर आधीच सामान्यपेक्षा जास्त थंड आहे. २०२४ च्या अखेरीस अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. नोव्हेंबर ते जानेवारीदरम्यान 'ला नीना'सारखी एक संक्षिप्त स्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर तटस्थ स्थिती परत आली. पॅसिफिक महासागरात सुरू असलेल्या शीतलहरीचा जागतिक हवामानावर परिणाम होऊ शकतो. 'ला-नीना' आल्यास अमेरिका आधीच कोरड्या हिवाळ्यासाठी सतर्क आहे. भारतात याचा परिणाम विशेषतः उत्तर भारत आणि हिमालयीन प्रदेशात जाणवेल. यामुळे डोंगराळ राज्यांमध्ये तीव्र थंडी आणि जोरदार बर्फवृष्टी होऊ शकते. भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था, मोहाली आणि ब्राझीलच्या राष्ट्रीय अंतराळ संशोधन संस्थेने केलेल्या अभ्यासातून दिसून आले आहे की, २०२४ मध्ये उत्तर भारतातील तीव्र शीतलहरीत 'ला-नीना'ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

अभ्यासानुसार, 'ला-नीना'च्यादरम्यानकमीपातळीच्या वाऱ्यांमधील बदल उच्च उंचीवरून भारतात थंड हवा आणतात, म्हणूनच शीतलहरी आणि त्यांचा कालावधी 'ला-नीनो' आणि सामान्य वर्षांपेक्षा 'लानीना'च्या वर्षांमध्ये जास्त असतो. उत्तर प्रदेशमध्ये आता थंडीचे परिणाम वेगाने वाढत आहेत. सकाळी, संध्याकाळी आणि रात्री थंडी जाणवत आहे. लोक रस्त्यावर उबदार कपड्यांचे अनेक थर गुंडाळून वावरताना दिसतात. दुपारच्या सूर्यप्रकाशामुळे काही प्रमाणात दिलासा मिळत असला, तरी सूर्यास्त होताच पारा वेगाने खाली येऊ लागतो. त्यामुळे थंडी वाढते. अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाले आहे. ग्रामीण भागात लोक शेकोटी पेटवून उबदार राहण्याचा प्रयत्न करत आहेत तर शहरांमध्ये लोक हीटर, रजई आणि ब्लँकेट बाहेर काढत आहेत.



राजस्थानमध्ये तर परिस्थिती जास्त वाईट आहे. हवामान खात्याचा अंदाज आहे की, तापमानात अशीच घसरण सुरू राहिल्यास राज्यात लवकरच थंडीची लाट येऊ शकते. सध्या राज्यभर हवामान स्वच्छ आणि कोरडे आहे. सकाळी आणि रात्री थंडीची तीव्रता वाढली आहे, तर दुपारच्या उबदार सूर्यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळत आहे. लोकांनी आता उबदार कपड्यांसह ब्लँकेट वापरण्यास सुरुवात केली आहे. हवामान खात्याने अद्याप पावसाच्या किंवा थंडीच्या लाटेबाबत कोणताही इशारा जारी केलेला नाही. तथापि, हलक्या वाऱ्यांमुळे किमान तापमानात आणखी घट होऊ शकते. सकाळी ग्रामीण भागात व्यापक धुके पडू लागले आहे. उत्तर प्रदेशमध्ये थंडीचे आगमन झाले असून येत्या काही दिवसांमध्ये त्याची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. यामुळे तापमान कमी होईल. धुके आणि शीतलहरी येतील. भारतीय हवामान विभागाने डिसेंबर ते जानेवारीदरम्यान तापमान सामान्यपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. याचे कारण 'ला-नीना' ही हवामानातील घटना आहे, जी प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात घट झाल्यामुळे उद्भवते. दिल्ली, पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशमध्ये हा हिवाळा सर्वात तीव्र राहील. डिसेंबर ते जानेवारी दरम्यान तापमान सामान्यपेक्षा दोन अंश सेल्सिअसने कमी होऊ शकते.

जम्मू- काश्मीर, हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टीमुळे मैदानी भागात थंड वारे आणि धुके आणखी वाढतील. भारतीय हवामान विभागाने इशारा जारी केला आहे की, येत्या दोन महिन्यांमध्ये दाट धुके, शीत लहरी आणि किमान तापमानात तीव्र घट होण्याची शक्यता आहे. 'स्कायमेट वेदर सर्व्हिस'च्या मते, 'ला-नीना'चा परिणाम कमकुवत असला, तरी थंडीच्या तीव्रतेवर त्याचा परिणाम स्पष्टपणे दिसून येईल. या काळात उत्तर आणि मध्य भारतात पश्चिमी विक्षोभ अधिक सक्रिय असतील. त्यामुळे बर्फवृष्टी वाढेल आणि रात्री थंड होतील. अलिकडेच राजस्थानमधील सिकर आणि झुनझुनू येथे हंगामातील सर्वात थंड रात्रीची नोंद झाली तर भोपाळ, इंदूर आणि राजगड येथे तापमान सात अंशांपर्यंत पोहोचले. बिहार, पंजाब आणि हरयाणामध्येही तापमान सातत्याने कमी होत आहे. हवामान विभागाने अंदाज वर्तविला आहे की, मध्य प्रदेश, दक्षिण हरयाणा, ईशान्य राजस्थान आणि छत्तीसगडच्या काही भागात शीतलहरीची स्थिती कायम राहू शकते. हवामान खात्याच्या मते, जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि मुझफ्फराबादमध्ये अनेक ठिकाणी किमान तापमान ७ ते १० अंश सेल्सिअसदरम्यान राहील. पंजाब, हिमाचल प्रदेश, हरयाणा, उत्तराखंड, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशमध्येही तापमानात घट होत आहे. 'ला-नीना'चा प्रभाव केवळ तापमानापुरता मर्यादित राहणार नाही. पाऊस आणि वाऱ्याच्या पद्धतींवरही त्याचा परिणाम होईल. हिवाळ्यात थंड वारे तीव्र होतात. त्यामुळे धुके आणि शीतलहरींचे प्रमाण वाढते. वाहतूक आणि आरोग्यावर धुक्याचा परिणाम होऊ शकतो. दृश्यमानता कमी झाल्यामुळे दाट धुक्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतूक विस्कळीत होऊ शकते. या काळात श्वसन आणि हृदयरोगांचा धोका वाढतो. हवामान शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की, यावर्षी हिवाळा लवकर सुरू झाला आहे आणि त्याचे परिणाम फेब्रुवारीपर्यंत कायम राहू शकतात. यावर्षी व्यापक थंडीचा अंदाज आहे, जो अनेक वर्षांचे रेकॉर्ड मोडण्याची शक्यता आहे. हवामान शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, या वर्षीचा हिवाळा तीव्र असण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर सुरू होताच थंडीचे आगमन झाले आहे. प्रशांत महासागरातील 'ला-नीना' परिस्थितीमुळे या वर्षी पाऊस चांगला पडला तर आता थंडीची शक्यता वाढली आहे. नोव्हेंबरमध्ये तापमान इतक्या लवकर कमी होण्याची पाच वर्षांमधील ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी २०२० मध्ये नोव्हेंबरमधील किमान तापमान ११ अंशांच्या आसपास होते. यंदाचा हिवाळा जास्त काळ टिकू शकतो. परिणामी सामान्यजनांनी कडक थंडीसाठी सज्ज राहण्याची गरज आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

आकलन

विजय कुलकर्णी




# 'कॉप ३०' : जग एकत्र आले, पण पुढे काय?

**ब्राझीलमधील ॲमेझॉनच्या जंगलाशेजारी बेलेममध्ये दोन आठवड्याच्या मंथनानंतर 'कॉप ३०' परिषदेचा नुकताच समारोप झाला. त्यानिमित्ताने या परिषदेच्या फलश्रुतीचे आकलन करणारा हा लेख...**

खरे तर अशा पर्यावरणीय आणि हवामानबदलांच्या परिषदा जगासाठी अजिबात नवीन नाहीत. १९७९ च्या जिनेव्हामधील अशा पहिल्या परिषदेपासून ते नंतर क्योटो, पॅरिस, बाकू परिषदेपर्यंत हवामानबदलावरून वेळोवेळी जागतिक मंथन झाले. जागतिक तापमान वाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे लक्ष्यही वेळोवेळी निर्धारित करण्यात आले. पॅरिस करारानुसार, जागतिक तापमान १.५ अंश सेल्सिअसची मर्यादा ओलांडणार नाही, यावरही एकमत झाले; परंतु विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या चढाओढीत यासंबंधीच्या प्रत्यक्ष उपाययोजनांचा म्हणावा तितका सकारात्मक परिणाम दिसून आला नाही. कारण, ही जागतिक तापमानाची पातळी राखायची असेल, तर २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जनाची मर्यादा ही तब्बल ५० टक्क्यांनी कमी करण्याची गरज आहे. त्यामुळे २०१६ साली स्वीकारलेल्या 'पॅरिस करारा'चे कटाक्षाने पालन करण्यावर यंदाच्या ब्राझीलमधील 'कॉप ३०' परिषदेतही एकमताचे सूर उमटलेले दिसले.

विशेष म्हणजे, या परिषदेत सर्वसहमती झालेल्या कराराच्या दस्तऐवजाला 'The Global Mrvirao: Uniting hrmaniry in a global mobiliration againrt blimate bhange' असे संबोधण्यात आले. यामध्ये 'Mrvirao' हा पोर्तुगीज- ब्राझिलियन शब्द असून, त्याचा अर्थ होतो 'एकत्र येणे.' अशाप्रकारे या परिषदेत १९० पेक्षा जास्त देशांनी एकत्र येत उपस्थिती नोंदवली असली, तरी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी परिषदेवर बहिष्कार टाकला आणि तोच कित्ता त्यांनी द. आफ्रिकेतील जोहान्सबर्गच्या 'जी २०' परिषदेतही गिरवला.

असो. तर या परिषदेत 'पॅरिस करारा'तील निहित लक्ष्याचे पालन करण्याबरोबरच इतर काही मुद्द्यांवर झालेली सहमतीदेखील निश्चितच स्वागतार्ह. यामध्ये प्रामुख्याने क्लिष्ट वाटाघाटींऐवजी आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर हवामानबदलाचा विचार करणे, परिषदेत सहमतीच्या विषयांच्या अंमलबजावणीसाठी 'ग्लोबल इम्प्लिमेंटेशन एक्सलरेटर'ची स्थापना, वर्षावनांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र निधी, हवामानबदलांपासून संरक्षणाच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी एक स्वयंसेवी व्यासपीठ स्थापन करणे, हवामानबदलांशी लढा देताना मानवाधिकारांचे पालन करणे यांसारख्या काही प्रमुख मुद्द्यांवर एकमत झालेले दिसून आले. यावेळी भारतानेही 'कॉप ३०'च्या प्रमुख मुद्द्यांबद्दल समाधान व्यक्त केले, ज्यामध्ये न्याय्य संक्रमण यंत्रणेची स्थापना ही सर्वांत महत्त्वाची कामगिरी होती, ज्यामुळे जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर समता आणि 'क्लायमेट जस्टिस' कार्यान्वित होण्यास मदत होईल, असे भारताने म्हटले आहे.

'कॉप ३०' परिषदेला असे सकारात्मकतेचे कोंदण लाभले असले, तरी काही मुद्द्यांवरून मात्र सर्वच देशांमध्ये एकमत होऊ शकले नाही. यापैकी कळीचा मुद्दा म्हणजे, जीवाश्म इंधनाचा वापर. जीवाश्म इंधनाकडून इतर ऊर्जास्रोतांकडे वळणे या पर्यायाला परिषदेत जरी स्वीकृती मिळाली असली, तरी कोळसा, तेल, गॅस यांचा वापर विशिष्ट प्रमाणात कमी करण्याबाबत मात्र विकसित आणि विकसनशील देशांचे एकमत होऊ शकले नाही. तसे पाहता, जीवाश्म इंधनाच्या दहनातून सर्वाधिक कार्बन उत्सर्जन होते.

२०२३ मध्ये हे प्रमाण ३७ अब्ज मेट्रिक टन इतके प्रचंड नोंदवण्यात आले होते; परंतु जीवाश्म इंधनाचा वापर कमी करण्याबाबत सौदीसारख्या तेलप्रधान देशांनी नकारघंटा वाजवली. इतकेच नाही तर, 'आम्ही आमचे ऊर्जाधोरण आमच्या राजधानीत तयार करतो, तुमच्या नाही!' असे सौदीच्या शिष्टमंडळाने बंददाराआड आयोजकांना सुनावल्याच्या बातम्याही झळकल्या. मग, काय ब्राझीलनेही जंगलतोड आणि जीवाश्म इंधनाचा मुद्दा 'कॉप ३०'च्या कक्षेबाहेर नेत, त्यासाठीचे केवळ 'रोडमॅप' काय ते जाहीर केले.

दुसरा कळीचा मुद्दा म्हणजे, 'क्लायमेट फायनान्स'चा. विकसनशील देशांना २०३० ते २०३५ या कालावधीत हा निधी तिपटीने वाढवण्याबाबत प्रगती झाली असली, तरी हा वित्तपुरवठा आवश्यक पातळीपर्यंत वाढवण्याबाबत सर्व देशांचे एकमत मात्र झाले नाही. युरोपीय देशांमध्ये हा कर वरील उत्पादनांवर आकारला जातो; परंतु भारत, चीन, सौदी अरब जे युरोपला यापैकी सर्वाधिक वस्तूंची निर्यात करतात, त्यांना हा 'बॉर्डर टॅक्स' मान्य नाही. त्यावर 'आम्हाला 'बॉर्डर टॅक्स' द्यायचा नसेल, तर तुमच्या देशातील अशा प्रदूषणकारी उद्योजकांकडून 'इंडस्ट्रियल इमिशन फी' आकारा,' असा सल्ला युरोपने विकसनशील राष्ट्रांना दिला.


एकूणच काय तर, 'कॉप ३०' परिषदेत काही मुद्द्यांवर जागतिक सहमती झाली असली, तरी काही कळीचे मुद्दे हे तुलनेने अनुत्तरितच राहिले. अशा परिषदांमध्ये तासन्तास चर्चा झडतात, अंतिम करारातील भाषा, शब्द, त्यांचे व्याकरण याचाही अगदी कीस पाडला जातो; परंतु परिषदेत जे जे कागदावर उमटले, ते ते प्रत्यक्षात उतरणार का? विकसित राष्ट्रे कधीतरी विकसनशील राष्ट्रांचा सहानुभूतीपूर्वक विचार करणार का? हे प्रश्न कायम आहेत. म्हणूनच केवळ जगाचे असे नुसते 'एकत्र येणे' पुरेसे नाही, तर 'एकत्र येऊन, एकदिलाने हवामानबदलाच्या संकटाचा सामना करण्यासाठी प्रत्यक्ष कृती आराखड्याचे पालन करायचे आहे' यावर ज्या दिवशी सर्व राष्ट्रांकडून शिक्कामोर्तब होईल, तो खरा वसुंधरेसाठी सुदिन म्हणावा!



समाजभान

शंतनू चिंचाळकर

# नोकरी टिकविण्याचे वाढतेय आव्हान



**पूर्वी नोकरी मिळविणे हे अवघड मानले जायचे. आता आहे ती नोकरी टिकविणे हे तरुणाईसमोरील नवीन आव्हान मानले जात आहे. परिणामी, सदोदित नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे, त्याच्याशी जुळवून घेऊन उत्पादन क्षमता वाढविणे हाच तरुण पिढीसमोर उभा ठाकलेला अनिवार्य पर्याय आहे. कशी सामोरी जात आहे तरुणाई या आव्हानाला? तरुण पिढीसमोर उभ्या ठाकलेल्या समस्यांचा हा मागोवा....**

परवा सोसायटीमधले एक गृहस्थ मित्र ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. शाल आणि श्रीफळ स्वीकारून निरोप घेताना त्यांचे डोळे पाणावले. नोकरी व्यवस्थित पार पडल्याचे समाधान होतेच; पण मनाला स्वस्थता नव्हती. कारण त्याच काळात त्यांच्या मुलाला अवघ्या ३६ महिन्यांमध्ये सक्तीची निवृत्ती स्वीकारावी लागली होती.

खरे तर तो चांगल्या परदेशी आयटी कंपनीत ७५-८० हजार पगारावर नोकरीला होता. कंपनीचे ब्रीदवाक्य होते, 'वुई कम्प्लिट परफेक्ट ड्रीम्स.' 'आम्ही परिपूर्ण स्वप्ने पूर्ण करतो' असा त्याचा मराठीत अर्थ होतो. नोकरीत रुजू होताना कंपनीचे ब्रीदवाक्य अचूक वाटावे अशाच प्रकारे नावारूपाला आलेली ती कंपनी होती. अचानक त्या कंपनीत काय उलथापालथ झाली आणि या तरुणाची स्वप्ने सत्यात उतरण्याआधीच मोडून पडली, ते माहीत नाही. त्याच्या जागी कमी पगारावर काम करायला तयार असलेला माणूस कंपनीने घेतला. त्यातही १५ तास ड्यूटी करणारा! मग काय, तीन वर्षांमध्ये नोकरीत कायम होणारा हा मुलगा अचानकच निवृत्त झाला. त्यामुळे सशक्त आणि सुदृढ तब्येतीच्या आमच्या मित्राला रक्तदाबाची व्याधी जडली. मुलाला नोकरी नाही, म्हटल्यावर त्याच्या मनातही न्यूनगंड निर्माण झाला. कायम असलेली नोकरी गेली; आता लग्न कसे जमणार, या चिंतेने मुलगा झुरू लागला.

२०-२५ वर्षांपूर्वीपर्यंत जीवन तसे सोपे होते. किमान पदवीपर्यंत शिक्षण घेतले की दोघांचा संसार चालेल एवढी नोकरी नक्की मिळायची. तिथे नोकरीत ठरावीक काळात पर्मनंट होण्याची शाश्वती असायची. साजेशी मुलगी मिळून लग्न जमायचे आणि संसाराची गाडी हळूहळू सुरळीत चालू व्हायची. कोणत्याही अडीअडचणींशिवाय सरळ मार्गाने किमान १२-१५ वर्षे नोकरी चालायची. मग वाढलेला परिवार, मुलं- बाळं, शिक्षण, मनोरंजन यांच्या सुखाने तर कधी आजारपणासारख्या संकटांना तोंड देत तरुणांची गाडी निवृत्तीपर्यंत सुरळीत चालायची. नोकरीचा एकंदर प्रवास सुरळीत आणि सुखरूप पार पडायचा. निवृत्ती स्वीकारताना काही चांगल्या तर काही वाईट अनुभवांची शिदोरी बरोबर असायची. कारण स्पर्धा आणि कार्यक्षमता या नोकरीतील महत्त्वाच्या अंगांचा अतिरेक नव्हता. उत्पादक कंपन्या मर्यादित असल्याने स्पर्धाही मर्यादित होती. विक्री व्यवस्थापनात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांवर आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर मर्यादेपेक्षा जास्त भार येत नव्हता. येत नव्हता म्हणण्यापेक्षा टाकला जात नव्हता असे म्हणणे उचित ठरेल, असा तो काळ होता. हल्ली बहुतेक क्षेत्रांमध्ये उमेदवारांना, विशेषतः कामगारांना नोकरीत कंत्राटी पद्धतीने रुजू करून घेतले जाते. अधिकारी वर्गाची नोकरी कायम होऊ नये म्हणून अधूनमधून कामावरून कमी केले जाते. त्यामुळे लग्न हीसुद्धा जोखीमच होऊन बसली आहे.

मुलीचे लग्न करून देताना पालक फार काळजीपूर्वक विचार करू लागले आहेत. कारण नवऱ्याची नोकरी अचानक सुटल्याने मुलीच्या अंगावर घराची आणि संसाराची जबाबदारी पडते. आजकाल हाच विचार करून पालक आपल्या मुलीला किमान पदवीपर्यंत शिक्षण देऊन आपल्या संसाराच्या किमान गरजा भागवता येतील अशा पगाराची नोकरी ती करू शकेल, ही खबरदारी घेताना दिसतात. काही पालक तर दोन वर्षे नोकरीचा अनुभव आल्याशिवाय मुलीचे लग्न करून देत नाहीत. हल्ली सरकारी क्षेत्र सोडले तर कुठल्याही क्षेत्रात नोकऱ्यांच्या बाबतीत काय परिस्थिती उद्भवेल, हे सांगता येत नाही. कुठल्याही नोकरीवर रुजू होताना सुरुवातीला दोन- तीन वर्षे तुमचा प्रशिक्षण कालावधी असतो. कार्यक्षमता तपासून नंतर काही वर्षे कॉन्ट्रॅक्ट केले जाते अन्यथा टर्मिनेट केले जाते.

कंपन्यांची हीच पॉलिसी असते. त्यामुळेच नोकऱ्या, विवाह, संसार आणि परिवार कशाचीही शाश्वती नसते. खरे तर सोसायटीमधल्या त्या मित्राच्या मुलाची नोकरी व्यवस्थितसुरू असती तर त्यानेही एखाद्या वधू- वर सूचक मंडळात नाव नोंदवून लग्न जमवले असते. अर्थात तेही आता सोपे राहिलेले नाही. पत्रिकेतील ग्रहदशा, आर्थिक स्थिती, उभयतांच्या आवडीनिवडी हे सगळे जमूनही नोकरीची शाश्वती नाही म्हणून लग्नासाठी धड होकार नाही अथवा नकारही नाही अशा कात्रीत तारुण्य सापडते. आमच्या मित्राने नोकरीचा कालावधी पूर्ण करून निवृत्ती स्वीकारली म्हणून संसार सुखाचा झाला. पण मुलाच्या चिंतेने त्यांची काळजी दिवसेंदिवस वाढतच चालली होती.

'रक्तदाब माझा घात करण्याआधी मुलाचे लग्न जमावे म्हणजे झाले' हे वाक्य त्याच्या तोंडी एके दिवशी आलेच. मित्राचा मुलगा मात्र नोकरी नाही म्हणून अस्वस्थ किंवा अपसेट वगैरे नव्हता. कारण त्याच्या मते हल्ली करीअरचे एखाद्या क्रिकेट सामन्यासारखे झाले आहे. जशी सामन्याच्या अंतिम क्षणापर्यंत कशाचीच शाश्वती नसते, तशी नोकरीही कधी झोपडीतून महालात आणि महालातून रस्त्यावर आणूनसोडेल, हे सांगता येत नाही. दोन्ही ठिकाणची वाट तशी फार बिकट आहे. दोन्ही क्षेत्रांमध्ये क्षणोक्षणी चढउतार होत असतात.

थोडक्यात, नव्या पिढीने ते स्वीकारले आहे. पण एक प्रकारची धाकधुक आणि अनिश्चितता भविष्यकाळाकडे फार आशादायी म्हणून पाहू देत नाही. भविष्यात एकच गोष्ट निश्चित आहे ती म्हणजे अनिश्चितता! त्यामुळे थोड्या काळानंतर नवीन नोकरी बघणे, पहिली सोडणे, नवीन नोकरी मिळविताना आधीपेक्षा जास्त पगाराची मिळवायची आशा बाळगणे, हे सहज घडत जाते. तरुणांच्या मते यात धोका नसून तो रूटीनचा भाग होऊन बसला आहे. दरवेळी पहिल्या नोकरीला रामराम करून नवीन नोकरी बघणे याला भाकरी फिरवणे म्हणता येईल.

हल्ली तरुणाईला ते नोकरीच्या रूटीनइतके नित्याचे वाटते. त्यामुळे बरीच वर्षे एकाच नोकरीच्या ठिकाणी राहण्याला 'याला दुसरीकडे कुणी विचारत नाही' असा अर्थ घेतला जातो. पूर्वीच्या पिढीचा नोकरीचा संपूर्ण काळ हा पूर्णपणे निर्धोक आणि सुरक्षित गेला. सध्याच्या प्रौढ व्यक्तींच्या नोकरीतला काळही शेवटची काही वर्षे सोडल्यास बराचसा चांगला गेला आणि पुढच्या नवीन पिढीला तो निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे. कारण सध्याच्या तरुणांचा काळ सतत स्वतःला चांगल्या पद्धतीने सिद्ध करण्याचा आहे. इतरांपेक्षा तुम्ही वेगळे काय देता या प्रश्नाला सामोरे जाण्याचा आहे.

नवीन युग हे मार्केटिंगचे आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. हा काळ रोज आधुनिकतेने बदलत जाणाऱ्या तंत्रज्ञानाबरोबर स्वतःला अपटूडेट ठेवण्याचा आहे. आमच्या मित्राच्या काळात विभागांतर्गत बदली होण्यासाठी अनेक वर्षे लागायची तेव्हा अशा बदलीमुळे रोजच्या कामाच्या दिनचर्येत बदल होण्यानेही कर्मचारी नाराज व्हायचे. आता अनेकांना कार्यालयाच्या कामासाठी आज इथे तर उद्या परराज्यात, काहींना तर विदेशात जावे लागते. सोसायटीतले मित्र म्हणतात, 'तरुण पिढीची जीवनशैली समजून घेताना आपल्याला चक्करल्यासारखे होते.' टॅबपासून ॲपपर्यंत कैक नवनवीन शोध या पिढीने शोधून काढले आहेत आणि त्यांचा बहुपयोगी वापर आत्मसात केला आहे.

धकाधकीच्या जीवनात प्रत्येक जण आपापल्या परीने कार्यरत आहे. संस्थेची उद्दिष्ट्ये पूर्ण करणे, प्रगती करणे आणि त्याबरोबरीने वैयक्तिक विकास यासाठी सतत कार्यरत राहणे हेच त्यांचे ध्येय आहे. आता आधीच्या शिक्षणाचा उपयोग करून नोकरी मिळायची; मग ती टिकविण्यासाठी सतत नवनवीन गोष्टी शिकत राहायचे. त्यात भावनांचे व्यवस्थापन, वेळेचे व्यवस्थापन आणि संवादकौशल्याच्या साहाय्याने उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी असंख्य कौशल्ये आत्मसात करावी लागत आहेत.

तरुणाईकडे अतिरिक्त वेळ नाही, स्वतःसाठी वेळ द्यायला सवड नाही. गती हेच एक अस्त्र आणि नावीन्याची उत्साही झिंग चढली आहे. त्यातून आलेल्या गतिशीलतेने आयुष्य जोरात धावत सुटले आहे आणि खरे जगणे मात्र राहून जाते आहे.

# महोत्सवाचे दिवस

आपल्याकडे गणपती, नवरात्र आणि दिवाळी हे उत्सव संपले की, चित्रपटप्रेमींना चित्रपट महोत्सवांचे वेध लागतात. भारतात १९५२ पासून सुरू झालेली आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची संस्कृती आता आपल्याकडे चांगलीच रुजली आहे. नोव्हेंबर महिन्यात कोलकाता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, त्यापाठोपाठ गोव्यात आयोजित केला जाणारा भारताचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, नंतर लगेच केरळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, मुंबईतील थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव, पुण्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि संभाजीनगरचा अजिंठा-एलोरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव असे विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दरवर्षी नियमितपणे आयोजित केले जातात.

इटलीमध्ये १९३२ पासून सुरू करण्यात आलेला व्हेनिस चित्रपट महोत्सव हा जगातील पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव! प्रभात फिल्म कंपनीच्या 'संत तुकाराम'ने या महोत्सवात हजेरी लावली. त्यानंतर कान- फ्रान्स, बर्लिन, जर्मनी येथे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित केले जाऊ लागले. भारताचा पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मुंबईत आयोजित केला होता. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी चित्रपटसृष्टीने आपले बस्तान मुंबईत थाटल्यामुळे आणि बहुतांशी कलावंत मुंबईत असल्याने मुंबईत या महोत्सवाचे आयोजन होणे स्वाभाविकच होते. त्यातूनच पुढे 'पाथेर पांचाली'- दिग्दर्शक सत्यजित राय, 'दो बिघा जमीन- दिग्दर्शक बिमल रॉय, 'बूट पॅलिश'- दिग्दर्शक प्रकाश अरोरा, निर्माता राज कपूर या अभिजात भारतीय चित्रपटांची निर्मिती झाली. १९८० च्या दशकात भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये 'इंडियन पॅनोरमा' हा विभाग समाविष्ट करण्यात आला. १९७०-८० च्या दशकात भराला आलेल्या समांतर चित्रपटांना यामुळे अधिकच प्रोत्साहन मिळाले. चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ न शकलेले अनेक चित्रपट 'इंडियन पॅनोरमा'मुळे प्रेक्षकांसमोर आले. याच काळात चित्रपट महोत्सवांना नियमितपणे हजेरी लावणारा एक उच्चभ्रू प्रेक्षक वर्गदेखील उदयास आला. सर्वसामान्य प्रेक्षक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांकडे फारसा फिरकत नसतं. फेस्टिव्हलच्या फिल्म्स म्हणजे कलात्मक, बोजड, न समजणाऱ्या फिल्म्स असा एक समज या प्रेक्षकांमध्ये होता. त्यात तथ्य नव्हतं असंही नाही, पण गीत-संगीत, मेलोड्रामा या चाकोरीत अडकलेल्या प्रेक्षकांमध्ये महोत्सवाचा सिनेमा आपल्यासाठी नाही, हे समीकरण पक्क रुजलेलं होतं. मात्र, गेल्या २५ वर्षांत हे चित्र बदलले आहे.

जागतिकीकरणामुळे खुल्या झालेल्या चित्रपट क्षेत्रात याच सुमारास तरुण दिग्दर्शक वेगवेगळे प्रयोग करू लागले होते. व्यावसायिक गणितांच्या पलीकडे जाऊन निर्माण केलेल्या या चित्रपटांना महोत्सवांमुळे हक्काचं व्यासपीठ उपलब्ध झालं. केवळ भारतातच नव्हे, तर आता जगभरात जवळपास प्रत्येक आठवड्याला एक या प्रमाणात चित्रपट महोत्सव आयोजित केले जात आहेत. त्यामुळे तरुण होतकरू दिग्दर्शकांच्या प्रयोगशील चित्रपटांना जगभरातील प्रेक्षक उपलब्ध झाला आहे. चित्रपट प्रदर्शनानंतर होणाऱ्या प्रश्नोत्तराच्या सत्रात दिग्दर्शक आणि कलाकारांकडून त्या चित्रपटाच्या निर्मितीची प्रक्रिया ऐकण्यासाठी प्रेक्षकांनी आवर्जून थांबणे हे दृश्य चित्रपट महोत्सवाच्या यशाची पावती असते.

चित्रपट महोत्सवाची व्याप्ती केवळ चित्रपट प्रदर्शनापुरता मर्यादित नाही. या महोत्सवात असलेल्या 'फिल्म बाजार' या विभागात निर्माते, वितरक, फेस्टिव्हल संचालक अशी मंडळी उपस्थित असतात. याचा फायदा नवीन चित्रपट करू इच्छिणाऱ्या लेखक-दिग्दर्शकांना होऊ शकतो. या तज्ज्ञ मंडळींच्या बरोबरीनेच देश-विदेशातील निर्मिती, वितरण संस्था, चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देणाऱ्या सरकारी आणि खाजगी संस्थांची अधिकारी मंडळीदेखील इथे असतात. एकूणच चित्रपट निर्मितीला चालना देण्यासाठी जे जे प्रयत्न करता येतील, दिग्दर्शकांच्या अनोख्या संकल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्यासाठी जी मदत करता येईल ती या विभागातर्फे केली जाते. चित्रपट माध्यमाच्या भविष्यासंदर्भात वेगवेगळ्या विषयांवरील चर्चा, परिसंवाद आणि दिग्गज कलावंतांचे अनुभव कथन अर्थातच 'मास्टरक्लास' हा चित्रपट महोत्सवाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. गेल्या काही वर्षांत तरुण प्रेक्षकांचा मास्टर क्लासकडे सर्वाधिक ओढा दिसतो. आपण ज्यांचे काम पडद्यावर पाहतो, त्यांच्या तोंडून त्यांच्या संघर्षाची, कामाची गाथा ऐकणे हे तरुणांसाठी प्रेरणादायी असते. आता देशातील विविध शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांची सुरुवात होत आहे. शक्य असेल त्यांनी महोत्सवाला हजेरी लावून या परंपरेमध्ये सामील व्हायला हवे.

डॉ. संतोष पाठारे